# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०/०४/२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक २०/०४/२०१२ रोजी (का.प.क्र.४०) मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार कै.केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.१० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४. स.स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
८. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
९. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खिल्लारे ज्योती रमेश
१६. स..स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्रीमती उर्मिला नितीन चित्ते
२२. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२३. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२४. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२६. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२७. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास

२८. स.स.श्रीमती जरीना म.जावेद

२९. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

३०. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान

३१. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग

३२. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार

३३. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ

३४. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र

३५. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये

३६. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल

३७. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

३८. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान

३९. स.स.श्री.अफसरखान यासीन खान

४०. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान

४१. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन

४२. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

४३. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग

४४. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल

४५. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद

४६. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान

४७. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी

४८. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

४९. स.स.श्री.खान आगा मिया खान

५०. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल

५१. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान

५२. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर

५३. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे

५४. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण

५५. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

५६. स.स.श्रीमती काळे शोभा पुखराज
५७. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५८. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
५९. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
६०. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
६१. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
६२. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
६३. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६४. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६७. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६८. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६९. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
७०. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
७१. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
७२. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७४. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७५. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
७६. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
७७. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
७८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७९. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
८०. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
८१. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
८२. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

०४.	स.स.श्री.अभिजित भास्करराव देशमुख
०५.	श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.संजय जोशी	:श्री.बसैय्ये बंधु यांच्या आई यांचे दु:खद निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

मा.महापौर	:ठीक आहे सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे.

या वेळी श्री. बसैय्ये बंधु यांची आई यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

**चर्चा:-**

श्री.मीर हिदायत अली	: मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार आरसीएच कर्मचारी यांचे संदर्भात २ दिवसात अहवाल देणार होते अहवाल आला का?

मा.महापौर	: अहवाल आलेला नाही.

श्री.मीर हिदायत अली	: अहवाल दिला नसेल तर संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी ८ महिन्यापासून त्या कर्मचा-यांना पेमेन्ट नाही.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी: वेतनाबाबत या कर्मचा-यांचे देयके लेखा विभागाकडे सादर केले आहे.६ महिन्याचे वेतन होते.लेखी अहवाल दोन दिवसात दिला जाईल.

श्री.प्रमोद राठोड	:अहवाल का थांबविला.

श्री.संजय कनेकर	:आरसीएच-२ कशाची स्कीम, किती दिवसासाठी आहे याचा खर्च कोण करते यांना सेवेत ठेवू शकतो का प्रकल्प व्यवस्थापन व यांना पगार देणे बंधनकारक आहे का याचा पदसिध्द सचिव कोण आहे नियम काय, सर्व खुलासा करावा.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी:राज्य शासनाच्या आदेशानुसार हा कार्यक्रम राबवितो. सन-२००७ ते २०१२ पर्यंतचा कार्यक्रम राबविण्यासाठी जानेवारी २००७ मध्ये सर्वसाधारण सभेची यास मंजूरी घेतली शासनाने आरोग्य सेवेची गरज आहे ॲक्शन पॉईन्ट करून दिले होते त्यानुषंगाने ९ केंद्र सुरू केले त्यामध्ये कर्मचारी काम करतात.३१ मार्च २०१२ पर्यंत ह्या प्रकल्पाची मुदत होती.

श्री.संजय केनेकर	:आता यांना पेमेन्ट कोण देणार.

प्र.आरोग्य वैद्य. अधि.	:शासन आता पगार देणार नाही महापालिकेला दयावा लागेल तसा ठराव मंजूर केलेला आहे.या कर्मचा-याचे पगार देयके लेखा विभागात पाठविली. आरोग्य वैद्य. अधिकारी पदसिध्द सचिव असतो.

श्री.संजय केनेकर	:किती बैठका घेतल्या माझ्या माहिती प्रमाणे ३-३ महिने बैठका झाल्या नाही.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी:मार्च मध्ये बैठक झाली आहे.

श्री.नारायण कुचे	:त्यांना कायम सेवेत ठेवावे शासनाचे बंधन आहे का, महिन्याला किती खर्च लागणार आहे.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी:शासनाला महापालिकेने कमिटमेंन्ट दिली त्यानंतर हा प्रकल्प मंजूर केलेला आहे.

श्री.संजय केनेकर	:शासनाने दिलेली मुदत संपली आरसीएच प्रमाणे शासनाने दिलेले इतर प्रकल्प ज्यात कर्मचारी आहे तो ही पुढे नेण्याचा प्रयत्न करावा. हा

प्रकल्प कशा पध्दतीने ताब्यात घेतला होता मागील जी भरती झाली ती चुकीच्या पध्दतीने झाली.सर्व प्रकल्प शासनाच्या नियमानुसार राबवावे.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी:त्या नियमानुसार ही पदे भरायची होती पदास मंजूरी नव्हती.

श्री.त्रिंबक तुपे :कर्मचा-यांचा मानधनाचा विषय आहे, वेतन देण्यात यावे.

प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी: जेंव्हा या पदाला मंजूरी मिळाली तेंव्हा एप्रिलमध्ये बील लेखा विभागास सादर केले. पे बील झाले. चेक मिळाल्यानंतर त्यांचा लगेच पगार होईल.

मा.महापौर :यानंतर वेळेवर पेमेन्ट करावे.

श्री.मिलींद दाभाडे :माझ्या वार्डात ९९ टक्के लोक टॅक्स भरतात पाणी मिळत नाही टॅंकरने पाणी आणावे लागते. पत्र दिले कार्यवाही होत नाही खुलासा करावा.

श्री.अमीत भुईगळ :माझ्या वार्डातही पुरेसे पाणी नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :सर्वच वार्डात पुरेसे पाणी येत नाही प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.सविता घडमोडे :माझ्या वार्डातही पाणीपुरवठा होत नाही.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.बाळासाहेब मुंडे :अनेक भागात पाणीपुरवठा होत नाही नियोजन करावे.

कार्य.अभियंता(पापू) :स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांचे पत्र माझेपर्यत आले नाही तरी सुध्दा त्यांचे वार्डातील पाण्याची समस्या लवकरच सोडविली जाईल.

श्री.प्रमोद राठोड :एन-४ येथील ओपनस्पेस जागेवर अतिक्रमण झाले मागील बैठकीत चर्चा केली कार्यवाही केली नाही.संबधीत व्यक्ती यांनी मा. न्यायालयात प्रकरण दाखल केले त्यावर स्टे आला असे सांगितले जाते. स्टे आला का? खुलासा घ्यावा.

मालमत्ता अधिकारी :सदर सिडकोची जागा असेल व त्यावर अतिक्रमण झाले असेल तर तपासणी करून निर्णय घ्यावा लागेल.

श्री.प्रमोद राठोड : महापालिकेची जागा आहे अतिक्रमण केले संबधीत विभागाचा अभिप्राय आहे.लिगल विभागाकडे योग्य म्हणणे मांडले नाही त्यावर स्टे असल्याचे सांगितले जाते सिडकोची जागा होती हस्तांतर झाले महापालिकेकडे आली ३ कोटीची जागा आहे. वेळीच कार्यवाही होत नाही.

मालमत्ता अधिकारी :अतिक्रमण केले असेल तर कार्यवाही होईल.

श्रीमती सविता सुरे :मयुर पार्क येथील ओपनस्पेसच्या जागेवर बांधकाम परवानगी देण्यात आली. चौकशी समिती नेमली होती त्या समितीने काय अहवाल दिला व कार्यवाही केली?

मालमत्ता अधिकारी :मयुरपार्क येथील जागेवर बांधकाम परवानगी देण्यात आली मागील सभेत यास स्थगिती देण्यात आली व त्यानुसार संचिका मा.आयुक्तांकडे सादर केली सदर नागरीकांची सुनावणी घेवून कार्यवाही होईल.

श्रीमती संविता सुरे :असे उत्तर अपेक्षीत नाही. बांधकाम परवानगी रद्य करावी.

श्री.समीर राजूरकर :चर्चा जास्त वेळ न होता विषय पत्रिकेला सुरूवात केली पाहिजे.

श्री.संजय चौधरी	:चिकलठाणा येथील पोल्ट्री फॉर्मचे बांधकाम चालू आहे दोन वेळेस आदेश केले कार्यवाही का केली नाही?पत्र दिले दखल घेतली जात नाही बांधकाम चालू आहे.

श्री.त्रिंबक तुपे	:२-२ महिने होते तरी कार्यवाही होत नाही नेहमीच तेच ते विषय मांडण्याची वेळ येते संबधीत अधिकारी यांचेवर प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे.३-४ सदस्यांनी अतिक्रमणाचा विषय मांडला यापूर्वीही मांडला होता कार्यवाही का झाली नाही.

श्री.संजय केनेकर	:स.सदस्यांनी केलेल्या प्रश्नाचा खुलासा व त्याविषयीची कार्यवाही होत नाही. इ.निरीक्षक पैशाची मागणी करतात कार्यवाही करीत नाही त्यामूळे विकास कामावर चर्चा न होता स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर पुन्हा चर्चा होते याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री. बाळासाहेब मुंडे	:अनधिकृत बांधकाम होते इ.निरीक्षक यांना फोन केला बांधकाम पुर्ण होते तरी तेथे येत नाही.

श्री.मीर हिदायत अली	:महापालिकेचे सहा ठिकाणी शॉपींग मार्केट आहे.या सभागृहाने निर्णय घेतला तेथे बीओटीवर शॉपींग मार्केट करणार ते न करता जे लोक होते ते डिपॉझीट,ॲडव्हास देण्यास तयार आहे ७ दिवसात खाली करावे म्हटले त्यांचे कडून डिपॉझीट ॲडव्हॉन्स घ्यावे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.नासेर खॉन	:बीओटीवर देणार एक एक मार्केट करणार परंतु सगळयांना नोटीसा का देत आहेत.

मा.महापौर	:या संदर्भात सोमवारी बैठक घेवून योग्य तो निर्णय घेवू.

प्रशासकीय अधिकारी	:चिकलठाणा येथील बांधकाम बाबत संचिका मा.आयुक्ताकडे सादर केली २ दिवसात कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे	:प्रश्न १०९ नुसार माहिती विचारली दिनांक १८-२-२०१२ च्या सभेत शिलाई मशीन खरेदी करण्याचा ५८६ क्र. विषय होता त्यावेळी मी या मशीन ब्रॅडेंड कंपनीच्या असाव्या असे म्हटले तरीही विषय मंजूर केला. हे खरेदी करतांना शासनाने काही निर्देश दिले आहे आरसी दिली त्यानुसार खरेदी न करता बाहेरून खरेदी का केले.तिसरा प्रश्नात या प्रकरणी शासन निर्णयाच्या प्रतिसह मी पत्राद्वारे आक्षेप घेतल्यानंतर शिवणयंत्र खरेदी संदर्भात चौकशी समिती गळीत करण्यात आली चौकशी समितीच्या अहवालानुसार मनपाचे एकूण ९,६३,८२०/- इतके नुकसान होणार होते अक्षेप घेतला नसता तर खरेदी झाली असती व वरील प्रमाणे महानगरपालिकेचे नुकसान झाले असते तर याची जबाबदारी काय निश्चित केली, काय कार्यवाही केली.

उपआयुक्त (प्र)	:पिको फॉल शिवणयंत्र खरेदीचा प्रस्ताव दिं. ११-१-२०१२ च्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आला ती सभा तहकूब होवून दि.१८-२-२०१२ रोजी झाली. दि.११-१-२०१२ च्या नंतर शासनाचे आर सी दि.१३-२-२०१२ रोजी आलेले आहे.या दरम्यान मा.आयुक्तांनी या संदर्भात चौकशी समिती नियुक्त केली. त्या समितीने ९ लक्ष पेक्षा जास्त

नुकसान होत असल्याचे म्हटले. त्यानुसार याचे टेंडर रद्द करून आर सी दराने ज्याची आरसी होती त्यांना कार्यादेश दिलेला आहे.यात महापालिकेचे कोणतेही नुकसान झाले नाही.

श्री.राजू शिंदे :मी ऑब्जेक्शन घेतले शासनाचे आर सी प्रत लावली त्यानंतर मा.आयुक्तांनी चौकशी समिती नेमली. नुकसान होते समितीचा अहवाल आला त्यानंतर टेंडर रद्द केले. परंतु दिनांक २५-३-२०११ रोजी टेंडर काढले त्यानंतर दिनांक ६-४-२०११ रोजी सोलापूर सुपर इंजिनिअरींग वर्क चे पत्र आले की शासनाचे आरसी जीआर माझ्याकडे आहे त्याप्रमाणे खरेदी का करीत नाही त्यावर दिनांक १२-५-२०११ रोजी महिला व बाल कल्याण समितीने ही आर सी प्रमाणे खरेदी करण्यास हरकत नसावी असे म्हटले असे असतांना दिनांक १८-५-२०११ रोजी उपआयुक्त (प्र) यांनी निविदा उघडल्या व आरसी पेक्षा कमी दर असेल तर खरेदी करावे किंवा आरसी पेक्षा जास्त दर असेल तर आर सी प्रमाणे खरेदी करण्यास्तव लेखा विभागाकडे पाठविले. पुढील कार्यवाहीस्तव लेखा विभागाकडे पाठवून दिले. बैठकीत प्रस्ताव आला त्यावेळी पैसे वाढतील या लोकांना गरज आहे म्हणून मंजूर केले.२०११ मध्ये टेंडर ओपन केले नाही दिनांक १५-६-२०११ मा.आयुक्तानी आरसी प्रमाणे खरेदी करावी मान्यता दिली असे असतांना त्याप्रमाणे खरेदी का होत नाही.२१-६-२०११ रोजी शासनाला पत्र देवून यात शासनाच्या निर्णयाची अमलबजावणी करण्यात येईल व यात मनपाचे हित असल्याचे म्हटले होते. मा.आयुक्त यांनी सुध्दा मुख्य लेखापरीक्षकाचे अभिप्राय घेण्याचे म्हटले होते.दिनांक २७-६-२०११ रोजी मा.आयुक्त यांनी मुख्य लेखापरीक्षक विभागाचा अभिप्राय घेण्यास सांगितले त्यानंतर पुन्हा मान्यता दिली तरी सुध्दा टेंडर ओपन केले, आर सी प्रमाणे कार्यवाही केली नाही कक्ष प्रमुख महिला व बाल कल्याण यांनी सुध्दा २९,७४०००/- इतका खर्च अपेक्षित निविदा रद्द झाल्याचे निविदा धारकास कळविणे योग्य असल्याचे म्हटले.असे असतांना निविदा रद्द का केली नाही. दिनांक ३०-६-२०११ रोजी आर सी ची मुदत संपत असल्यामूळे खरेदी करणे योग्य नाही असा अभिप्राय दिला त्यानंतर दिनांक १४-११-११ रोजी उपआयुक्त (प्र) यांनी **खर्च** महापालिकेच्या उत्पन्नातून खर्च होणार असल्याने आर सी प्रमाणे खरेदी करणे बंधनकारक नाही असे पत्र दिले. शासनाच्या पत्रात म्हटले आहे की जे कोणी चुक करेल त्यांचेवर कार्यवाही करावी, पुन्हा त्याच पध्दतीने टेंडर काढण्यात आले, चुक झाली असेल तर त्यांचेवर जबाबदारी फिक्स करावी. १० हजाराचे काम होत नाही अशी परीस्थिती सध्या असतांना असे चुकीचे काम करणे योग्य नाही याची दखल घेण्यात यावी.शासनाने दिलेल्या आर सी प्रमाणे घेणार नसेल तर तसे शासनास कळवावे लागते त्यानंतर शासन मान्यता देईल तरच टेंडर मागवून कार्यवाही करता येते.

उपआयुक्त (प्र.) :आर.सी.प्रमाणे घेणे बंधनकारक नाही असे म्हटले आहे. आर.सी. दरापेक्षा जास्त दर असतील तर आर.सी. प्रमाणेच घ्यावे लागणार असे म्हटले आहे या प्रकरणात चौकशी समिती नेमली होती, अहवाल दिला त्यात ९.६३ लक्ष रूपये नुकसान होणार होते. टेंडर रद्द केले.

श्री.राजू शिंदे :मी मुद्दा मांडला त्यावेळेस ती खरेदी झाली नाही नुकसान झाले नाही. पुन्हा त्याच पध्दतीने टेंडर काढण्यात आले या बाबत मा.आयुक्तांनी चौकशी करावी व संबधीतावर कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :आत्ताच जो मुद्दा मांडला त्या विषयी प्रशासनाने नियमाप्रमाणे चौकशी करून कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ६७२:-**

दिनांक ०७.०९.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

श्री.गिरजाराम हळनोर :इतिवृत्त बरोबर आहे मंजूर करावे.

मा.महापौर :मंजुर.

**ठराव**

दिनांक ०७.०९.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक:-६७३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र. २०११/गृहशाखा/विधी/सिआर/०७१/कावि/२९० दिनांक १७/०३/२०१२ अन्वये विभागीय व जिल्हा भष्ट्राचार निर्मुलन समितीवर महिला लोकप्रतिनिधी गटातून २ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी दोन महिला पालिका सदस्यांच्या नावांची शिफारस करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद:-**

श्री.गिरजाराम हळनोर :भ्रष्टाचार निर्मुलन समिती मध्ये या सभागृहातील दोन महिला सदस्यांची नावे द्यायची आहे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने मी स.श्रीमती रेखा दिनकर पाटील यांचे नाव सुचवित आहे.

डॉ.जफर खॉन :संयुक्त लोकशाही आघाडीतर्फे स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया यांचे नाव सुचवित आहे.

मा.महापौर :वरिल दोन्ही नावे दिल्यानुसार त्याप्रमाणे शिफारस करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभागीय व जिल्हा भष्ट्राचार निर्मुलन समितीवर महिला लोकप्रतिनिधी गटातून २ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी स.सौ.रेखा दिनकर पाटील व स.सौ.हेमलता प्रकाश मुगदीया यांचे नावाची शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६७४**

महानगरपालिका शाळेच्या पट पडताळणी अहवालासंदर्भात झालेल्या बैठकीत काही शाळांमध्ये खुपच कमी विद्यार्थी संख्या आहे. अशा शाळा नजीकच्या महानगरपालिका शाळांमध्ये वर्ग करणे बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येतो.

१. प्राथमिक शाळा पहाडसिंगपुरा येथे एकुण विद्यार्थी संख्या ४५ असुन शाळेकरिता इमारत भाडे तत्त्वावर घेण्यात आलेली आहे व ही शाळा मराठी माध्यमाची असुन या शाळेत २ शिक्षक कार्यरत आहेत. पुरेसे विद्यार्थी नसल्यामुळे सुमारे एक कि.मी. अंतरावरील केंद्रीय प्राथमिक शाळा बेगमपुरा येथे स्थंलातरित करण्यात यावी.
२. प्राथमिक शाळा वसंतभवन व प्राथमिक शाळा औरंगपुरा या दोन्ही शाळा जिल्हा परिषदेच्या इमारतीत भरते. प्राथमिक शाळा वसंतभवन शाळेतील विद्यार्थी संख्या व प्राथमिक शाळा औरंगपुरा शाळेतील अशी मिळून ४१ विद्यार्थी संख्या असून कार्यरत शिक्षक ३ आहेत. ही इमारत मोडकळीस आलेली आहे. त्याकरिता या दोन्ही शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक पैठणगेट जवळच्या सादिया मार्केटच्या हॉलमध्ये स्थंलातरित करण्यात यावी. या हॉलमध्ये पार्टीशन करुन वर्ग खोल्यांची व्यवस्था व्हावी तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था व्हावी. याबाबत स.न.श्री.अनिल मकरिये यांची मागणी आहे.
३. प्राथमिक शाळा किराडपुरा नं. २ साठी भाडे तत्त्वावर घेतलेली इमारत असुन इमारत मालक वारंवार इमारत रिकामी करुन देण्यासाठी तगादा लावत असल्याने शाळेसाठी सदरील भागातच भाडेतत्त्वावर किंवा मनपाचे रोषन फंक्शन हॉल करुन देणे योग्य.
४. प्रा.शा.गणेश कॉलनी (मराठी) सदरील शाळेत विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे ही शाळा शताब्दीनगर येथे स्थलांतरित करण्यात आलेली आहे. करिता कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.
५. प्रा.शा.विश्रांतीनगर येथे एकूण ११२ विद्यार्थी संख्या असून ही शाळा प्रा.शा. जयभवानीनगर येथे स्थलांतरित केल्यास इमारत भाडयात बचत होईल व शाळा व्यवस्थापन करणे सुलभ होईल. जयभवानीनगर ते विश्रांतीनगर या दोन शाळांमधील अंतर साधारणतः १ कि.मी. पेक्षा कमी आहे.
६. प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर (उर्दु) ही शाळा भाडयाच्या इमारतीत भरते तसेच इयत्ता १ली ते ३री पर्यंत वर्ग आहे. हजेरी पटावर ४३ विद्यार्थी असून ही शाळा जवळच असणाऱ्या मनपाच्या समाज मंदिरात किंवा केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर येथे स्थलांतरित करावी.
७. के.प्रा.शा. बायजीपुरा या केंद्रातील प्रा.शा. जिन्सी व प्रा.शा. रेंगटीपुरा या दोन्ही शाळा एकाच इमारतीत भरत असल्यामुळे या दोन्ही शाळा मिळून एकच नामकरण असावे व एकच मुख्याध्यापक असावा.
८. प्रा.शा. पैठण गेटची शाळा भाडयाच्या इमारतीत भरते. ती जागा अतिशय अपुरी असून विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे सादीया मार्केटच्या वरच्या मजल्यावर अथवा या परिसरात शाळा इमारत बांधल्यास शाळा सुरळीत चालेल. भाडयाची इमारत व सादीया मार्केट यात फक्त अर्ध्या कि.मी. चे अंतर आहे.

करिता वरीलप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद:-</u>**

श्री.प्रफुल्ल मालाणी :सविस्तर खुलासा घ्यावा.

प्र.शिक्षणाधिकारी :मनपाच्या एकूण ७८ शाळा त्यापैकी १६ भाडयाच्या इमारतीमध्ये यावर वर्षाला ८.५९ लक्ष खर्च होतो.मा.आयुक्तांशी चर्चा विनिमय करून

प्रस्ताव ठेवला. त्यात पैठणगेट येथील प्राथमिक शाळा ही भाडयाचे इमारतीमध्ये भरते तेथील खोल्यामध्ये अधांर आहे.व्हेप्टीलेशन नाही जागा पुरेशी नाही म्हणून ही शाळा सादिया मार्केटच्या वरच्या भागात इमारत बांधली तर तेथे स्थलातंरीत करावी असा प्रस्ताव. तसेच किराडपूरा नं.२ शाळेची इमारत मोडकळीस असून भाडयाने आहे तेथे स्वतंत्र शौचालय नाही. म्हणून रोषणगेट येथील मनपाचा हॉल तेथे शिफ्ट करण्याचा प्रस्ताव आहे.विश्वांतीनगर येथील शाळा इमारत भाडयाने आहे ती जयभवानीनगर येथे स्थलांतरीत करणार परंतु स.श्री. बाळासाहेब मुंडे यांनी पत्र देवून ही शाळा स्थलातंरीत करू नये विनंती केली.तसेच पहाडसींगपूरा येथील शाळा केंद्रीय प्राथमिक शाळा बेगमपूरा येथे स्थंलातरीत करण्यात येणार ही इमारत मोठी आहे. प्रियदर्शनीनगर येथील शाळा मनपाच्या समाज मंदिरात किंवा केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी,इंदिरानगर येथे स्थलांतरीत करणार तेथे शौचालयाची, पाण्याची व्यवस्था आहे.या शाळा भाडेच्या इमारतीमध्ये असून महापालिकेच्या इमारतीमध्ये शिफ्ट करावा असा प्रस्ताव आहे. प्रा.शाळा वसंतभवन व औरंगपूरा येथील दोन्ही शाळा पैठणगेट जवळ सादिया मार्केटच्या हॉलमध्ये स्थलांतरीत करायची आहे.गणेश कॉलनी येथील प्रा.शाळेत मुले कमी असल्यामूळे ती शाळा शताब्दीनगर येथे शिफ्ट करणार आहे के.प्रा.शा बायजीपूरा या केंद्रातील प्रा.शा जिन्सी व प्रा.शा रेंगटीपूरा या दोन्ही शाळा एकाच इमारतीत व एकच नामकरण असावे असा प्रस्ताव आहे.महापालिकेच्या इमारतीमध्ये शाळा स्थलांतरीत करण्याचा या प्रस्तावास मान्यता मिळाली.

श्री.काशिनाथ कोकाटे : शाळा बंद, शिफ्ट करण्याचा विषय या शाळाच्या बाजूलाच काही खाजगी शाळा तेथे प्रवेश मिळत नाही. एन-९ मधील मनपाच्या शाळेची मोठी इमारत असतांना तेथे विद्यार्थीसंख्या कमी,बाजूला बळीराम पाटील शिक्षण संस्थेची शाळा तेथे प्रवेश मिळत नाही शाळा बंद करण्याची वेळ का येते एकीकडे भाऊ-दिदी प्रकल्प राबवून विद्यार्थीसंख्या वाढविण्याचा प्रयत्न होतो.मनपाच्या शाळेत विद्यार्थीका येत नाही.अभ्यास केला का?शहरातील गोरगरीब विदयार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची येते.परंतु दरवर्षी विद्यार्थीसंख्या कमी होते. इतर शहरामध्ये महापालिकेच्या शाळामध्ये विद्यार्थीसंख्या मोठया प्रमाणात, येथे शाळा शिफ्ट बंद करण्याची वेळ येते प्रशासन कमी पडते. असे असतांना तासिका बेसवर शिक्षक का घेतले. शिक्षण,आरोग्य, स्वच्छ पाणी तसेच कचरा निर्मुलन या चार बेसीक सुविधा शहरातील नागरीकांना देणे आवश्यक असते.या विदयार्थ्यांना चांगले शिकविण्याची मानसिकता शिक्षकामध्ये वाढवावी. शाळा बंद करण्याला माझा विरोध आहे.

श्रीमती हेमलता मुगदीया:अनेक विदयार्थ्यांना वाचता लिहिता येत नाही शिक्षक शिकवीत नाही दारू पिऊंन धिंगाना घालतात शिकविण्याकडे लक्ष नाही अशांवर कार्यवाही व्हावी.

डॉ. जफर खॉन :जागेची अडचण असेल तर ठिक आहे परंतु विद्यार्थीसंख्या कमी आहे म्हणून शाळा बंद करणार असेल तर योग्य नाही संख्या कमी का आहे याची कारणे शोधली पाहिजे किराडपूरा नं.२ ची शाळा फंक्शन हॉल मध्ये भरविणार तो हॉल गरीबांच्या कार्यक्रमासाठी आहे. ती शाळा यशोधरा कॉलनी येथे स्तलांतरीत केल्यास योग्य होईल.विद्यार्थीसंख्या कशी वाढेल यासाठी प्रयत्न करावे.खाजगी संस्थांना विद्यार्थीदेण्याचे या माध्यमातून साधन करू नये शाळा बंद करण्यास माझा विरोध आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :या शाळेच्या इमारती भाडयाने , इमारतीची वाईट अवस्था आहे त्यामूळे शाळा शिफ्ट करण्याचा विषय दिला असावा माझ्या वार्डातील शाळा एक एकर मध्ये फक्त ८० विद्यार्थी भाडयाच्या इमारतीत शाळा असेल तर अशा इमारतीत शिफ्ट कराव्या सर्वांना शिक्षण मिळावे याबध्दल दुमत नाही.योग्य पध्दतीने खर्च होतो का याचा विचार करण्याची गरज आहे.

श्री.मिलींद दाभाडे : विदयार्थ्यांच्या जीवनाशी खेळले जाते एखादया कामात दुरूस्ती करता येते परंतु शैक्षणिक दर्जा घसरला तर दुरूस्ती करणे अवघड होते मनपाच्या शाळेतील ७वी च्या विदयार्थ्यांना लिहिता वाचता येत नाही. शिक्षकाच्या पगारासाठी शाळा चालवित असेल तर योग्य नाही प्रशासन लोकप्रतिनिधी यांनी मनपाच्या शाळेतील शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :एकीकडे शाळा बाहय मुलांचा शोध घेता व दुसरीकडे शाळा बंद करण्याबाबत प्रस्ताव येतो हे योग्य नाही माझ्या वार्डातील विश्रांतीनगर येथील शाळा शिफ्ट केल्यास मुलांना रेल्वेपटरी ओलांडून व जाण्यासही दुर पडेल करीता ही शाळा शिफ्ट करू नये.

श्री.त्रिंबक तुपे :शिक्षण हा विभाग महत्वाचा मा.आयुक्त आल्यानंतर त्यांनी सर्व शाळेत भेटी देवून शाळेची सर्व माहिती घेतली. प्र.शिक्षणाधिकारी यांनीही शाळेच्या संदर्भात सर्व अभ्यास केला असावा.पटपडताळणी सुध्दा झाली. त्या अहवालानुसार ज्या शाळेत विद्यार्थी कमी, सुविधा नाही म्हणून वर्ग करण्याचा प्रस्ताव आहे.शाळेच्या इमारती भाडयाने आहे. तेथे विद्यार्थीसंख्या कमी, ४-५ शिक्षक दिलेले असतात या शाळेत गोरगरीबांचीच मूले शिक्षण घेतात दुमत नाही.शाळेचा हा विषय आला व जो खुलासा केला त्यानुसार खरच परीस्थिती गंभीर आहे.जे कर्तव्य आपले आहे, शिक्षण या विदयार्थ्यांना देवू शकत नसेल तर शाळेची संख्या वाढविणे योग्य नाही.२१-२२ हजार विद्यार्थीसंख्या होती पटपडताळमध्ये १६ हजार आली. काही शाळांमध्ये चांगले शिक्षण दिले जात आहे.या शाळा शिफ्ट का करावयाच्या अधिकारी यांनी सविस्तर माहिती दिली ती योग्य वाटते व शाळा शिफ्ट करण्याची गरज आहे

इमारत रिकामी झाली तर ती कुणालाही संस्थेस भाडयाने देवू नये.लोकसंख्या वाढत आहे भविष्यात त्या इमारतीचा उपयोग पडणार अनेक इमारती खाजगी मालकीच्या सुध्दा मनपाने घेतल्या परंतु मोठया प्रमाणात भाडे, संख्या कमी ,शिक्षक जास्त असे असेल तर अशा शाळा चालविणेही योग्य नाही.त्या शाळेतील विदयार्थ्यांना सोयी सुविधा देऊ शकत नसेल तर जो विषय आलेला आहे तो मंजूर करावा.

श्री.संजय चौधरी :एका शाळेला मी भेट दिली.१३ विद्यार्थी ३ शिक्षक एक शिपाई व शाळेचे १९ हजार भाडे असे एकूण १.५० लक्ष खर्च होतो असे कळाले. अशी परिस्थितीत बाजूच्या वार्डात या शाळा शिफ्ट होत असेल तर योग्यच आहे. २ वर्षापुर्वी विद्यार्थी संख्या २१-२२ हजार होती आता ती १६ हजारवर आली.जि.प.शाळेची तपासणी करण्यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी पद असते मनपाच्या शाळेसाठी हे पद नाही व शाळेची अदयाप इन्स्पेक्शन झाले नाही. दीड वर्षापूर्वी मा.आयुक्त यांनी मराठी माध्यमसाठी २ व उर्दु माध्यमसाठी १ पद असे ३ शिक्षण विस्तार अधिकारी पद निर्माण करावे आदेशीत केले परंतु त्या विषयी कार्यवाही झाली नाही.या सर्वांचा परीणाम म्हणून विद्यार्थीसंख्या कमी होते पुढील वर्षी १०-१२ हजार पर्यंत विद्यार्थीसंख्या येईल.राज्य शासनाने पटपडताळणी केली त्यात ५० टक्के पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या अनेक शाळा आहे.विद्यार्थीसंख्या कमी का झाली याचा शोध घ्यावा.राज्य शासनाने जो निर्णय घेतला त्यानुसार कार्यवाही व्हावी. शिपाई १०-१२ वर्षापासून एकाच शाळेवर आहे एका शिक्षकाची बदली एन-७ च्या शाळेतून ज्युब्ली पार्क शाळेत केली असता त्यांनी जाण्या-येण्यास दूर पडते.मा.महापौर पदाधिकारी यांची भेट घेतली अशी मानसिकता असेल तर विद्यार्थीसंख्या वाढणार नाही एका ठिकाणी मा.जिल्हाधिकारी यांनी शिक्षकाची परीक्षा घेतली जे शिक्षक नापास झाले त्यांचेवर कार्यवाही केली तशी कार्यवाही येथे व्हावी. जो प्रस्ताव ठेवला तो मंजूर करावा यापूढे अशी स्थिती येवू नये याची दखल घ्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :शाळा शिफ्ट,बंद करणे ही वेळ का आली याचा शोध घेणार का त्या जागेचा वापर दुस-या कामासाठी होईल शिक्षणाचा प्रश्न पुन्हा उभा राहिल त्यासाठी संख्या कमी का होते याची माहिती घ्यावी नंतर योग्य तो निर्णय व्हावा.

मा.उपमहापौर :शाळा बंद होत नाही.स्लम भाग व मागासवर्गीय वसाहतीतील विदयार्थ्यांना शिक्षण देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.जेव्हा तेथील परीस्थिती विचार घेतली तर विदयाथ्याचे नुकसान करतो की काय असे वाटते. हर्सुल शाळेत भेट दिली तर शिक्षीकाच्या शिकविण्यामध्ये चुक होती शिक्षक काय काम करतात कसे शिकवितात काही लोकांनी मागणी केली कैलास नगर शाळेची माहिती घेतली शिक्षक ५ महिन्यापासून गैरहजर,शाळेत दारू पिऊन येतात असे निदर्शनास आले .एका वर्गात तीन वर्गातील विद्यार्थी असतात शिक्षक सही करून जातात

त्यामूळे ही वेळ येते. बालवाडी शिक्षिका १२००रू काम करतात त्या पुर्ण वेळ थांबतात जे १५-२० हजार पगार घेतात ते शाळेत येवून सही करून निघून जातात ही परीस्थिती बदलली पाहिजे.पडेगांवच्या शाळेला भेट दिली तेथे वॉचमन मोठमोठयाने बोलत होते शिक्षकांना शिकविता येत नव्हते मुख्याध्यापक यांना विचारले असता संबधीत व्यक्ती ॲट्रॉसिटीची केस दाखल करील भिती दाखवित आहे असे असेल तर शिक्षण कसे देणार सरस्वती भुवन,गुजराथी हायस्कुल, बळीराम पाटील हायस्कुल मराठा हायस्कुल अशा नामांकित शाळेत आजही १०० रू च्या वर फिस नाही. परंतु मनपाच्या शाळेत एका विदयाथ्यासाठी ६००ते १००० रू खर्च होतो असे असतांना संख्या नाही. आऊटफुट काय निघते.हे बघावे प्रत्येक शाळेत ५० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थीसंख्या असावी मा.आयुक्तांनी सर्व शाळांना भेट देवून कम्पल्सरी करावे अनेक विदयाथ्यांना लिहिता वाचता येत नाही वर्ग-४ चे शाळेचे ड्रेनेज साफसफाईसाठी १८ कर्मचारी असतांना स्वच्छता तेथे नाही शिक्षकाच्या बदल्या केल्यास तेथे हजर होत नाही. क्रिडा शिक्षक अनेक वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयात काम करतात काही शिक्षक त्यांचे व्यक्तिगत क्लासेस चालवतात महापालिकेच्या कोणत्याही शाळेत प्रवेश घ्यायचा असेल तर त्याची फिस मनपाने दिली पाहिजे कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये रेल्वेस्टेशन परीसरातील शाळेत १२०० विदयाथी असतांना ११ शिक्षक,येथे संख्या जास्त शिक्षक कमी अशा वेळी जेथे विद्यार्थी जास्त तेथे शिक्षक देण्यात यावे या प्रस्तावाचा विचार व्हावा.

श्री.कृष्णा बनकर :मनपाच्या गेटसमोर माजी स.श्री. हिम्मतराव दाभाडे व त्यांचे समर्थक लोकशाहीर वामनदादा कर्डक यांचा पुतळा होण्या संदर्भाने उपोषणास बसले सन-२००९ मध्ये ठराव पारीत झाला अमलबजावणी होत नाही त्यांची मागणी मान्य करावी उपोषण सोडवावे.

श्री.सुर्यकांत जायभाये :मनपाच्या शाळेत जे स्लम, गुंठेवारी भागात राहतात त्यांची मूले आहे पुडंलिकनगर,व परिसरातील शाळा ९X९ ,३०X३० च्या हॉलमध्ये भरतात कोणत्या निकषानुसार आहे का कळत नाही.अशा भागात मुलांची संख्या जास्त आहे तेथे महापालिकेच्या जागेवर शाळेच्या इमारती कराव्यात. प्रस्तावावर योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर : विश्रांतीनगर येथील मनपाची शाळा स्थलातंरीत करू नये त्या वार्डाचे स.सदस्य श्री.बाळासाहेब मुंडे यांनी अक्षेप घेतलेला आहे त्यामुळे ती शाळा वगळता उर्वरीत शाळांना खालील अटीवर स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात येते. १.सदरील शाळाची परवानगी रद्द करण्याची परिस्थिती येऊ नये याची काळजी घ्यावी व महापालिकेच्या मालकीच्या शाळावर बांधकाम व इतर प्रकल्प राबविण्यात येऊ नये या जागेवरील शाळा स्थलांतरीत करण्यास हरकत नाही तसेच किराडपुरा येथील शाळा यशोधरा कॉलनी येथे स्थलातरीत करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिका शाळेच्या पट पडताळणी अहवालासंदर्भात झालेल्या बैठकीत महापालिकेच्या काही शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या खुपच कमी असल्याने प्रस्तवीत अ.क्र.१,२,४,६,७,८ मधील शाळा प्रस्तावात नमुद केल्यानुसार नजीकच्या मनपा शाळेमध्ये वर्ग/स्थलांतरीत करण्यास तसेच अ.क्र.३ मधील किराडपुरा येथील शाळा यशोधरा कॉलनी मध्ये वर्ग/स्थलांतरीत करण्यास व प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.तसेच अ.क्र.५ मधील विश्रांतीनगर येथील शाळा स्थलांतरीत करण्यात येवू नये, स्थलातरीत शाळेची मान्यता रद्द होणार नाही तसेच महापलिका मालकी असलेल्या शाळेच्या जागेवर बांधकाम इतर प्रकल्प राबविण्यात येणार नाही याची अमलबजावणी करण्याच्या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६७५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगपुरा ते जुना बाजार या रस्त्याच्या रूंदीकरणा अंतर्गत जुना बाजार येथील CTS No. ३३५६ येथील शाळा द.न्यू एपोस्टेलिक चर्च एज्युकेशन संस्थेची इंग्रजी माध्यमाची शाळा, आणि CTS No. ३३३२ येथील शाळा बुरानी नॅशनल उर्दु हायस्कुल या दोन शाळा रस्ता रूंदीकरणा बाधीत होत असल्यामुळे मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशान्वये वरिल दोन शाळांचे स्थलांतर त्वरीत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

करिता मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा बन्सीलालनगर येथे द.न्यू, एपोस्टोलिक चर्च एज्युकेशन संस्थेची इंग्रजी माध्यमाची शाळा आणि मनपा प्राथमिक शाळा प्रगती कॉलनी (घाटी) येथे बुरानी नॅशनल उर्दु हायस्कुल या दोन शाळांचे स्थलांतर करण्याचे आदेशित केले आहे. प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

संवाद:-

श्री.समीर राजूरकर :शाळा स्थलांतरीत करण्याचा कार्योत्तर मंजूरीचा प्रस्ताव दिला त्या सदर ठिकाणी शाळा किती दिवस राहील नसता मोबदला दिल्याशिवाय खाली करणार नाही काही करारनामा केला का?

श्री.संजय जोशी :मा.उच्च न्यायालयाचा निकाल काय आहे. या दोन संस्था आहे.डीपी प्लॅनमध्ये शाळा येत असेल तर शाळा कुठे न्यायची ही जाबबदारी त्या संस्थेची आहे.हया जागा मनपाच्या जागेत का शिफ्ट करीत आहोत.या शाळा तेथे शैक्षणिक वर्ष संपेपर्यत असणार की कायम स्वरूपी तेथे असणार आहे

श्री.गजानन बारवाल :मा.न्यायालयाचे काय आदेश आहे माहिती दयावी.

श्री.शिंदे किर्ती :द.न्यु एपोस्टोलिक चर्च ही इंग्रजी माध्यमची शाळा भाडे तत्वावर का स्वत:च्या मालकीची आहे तसेच या शाळेने मोबदला मागितला का बन्सीलालनगर येथील शाळा या शाळेसाठी देत असतांना कोणताही मोबदला घेवू नये तसेच ही शाळा भाडेतत्वावर असे पर्यत त्यांचे पुर्नवसन करण्यात येवू नये सर्व बाबीचा विचार करून कार्यवाही करण्यात यावी.

प्र.शिक्षणाधिकारी :एपोस्टेलिक चर्च एज्युकेशन संस्थेची इंग्रजी माध्यमाची शाळा रस्त्यात जी जुना बाजार येथे होती रस्ता रूंदीकरणामध्ये ती पाडण्यात आली ती प्रस्तावात नमुद केलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करण्याची ३०-४-२०१२ पर्यंत परवानगी दिली आहे.व त्यांनी प्रस्ताव दिला की ही मुदत वाढवून दयावी.

श्री.संजय जोशी :कोर्टाचा निर्णय काय ते सांगावे.

विधी सल्लागार :या शाळेने महापालिके विरूध्द २०१२ मध्ये मा. न्यायालयात याचिका दाखल केली होती २३-१-२०१२ नुसार ज्या मिळकती रस्त्यामध्ये बांधीत होत आहे त्यांना त्या काढून घेणे बाबत नोटीस दिली त्या अधारे ही संस्था मा.न्यायालयात दाद मागणीसाठी गेली मा.न्यायालयाने रस्ता रूंदीकरणाचे काम, विदयार्थ्यांचे हित लक्षात घेता यांना ३० दिवसाच्या आत शाळेची व्यवस्था करून दयावी त्यानंतर ७ दिवसात शाळा शिफ्ट करावी आणि ही शिफ्ट करून दिलेली व्यवस्था ही शैक्षणिक वर्षापर्यतच राहिल असे ३० जानेवारी १२ रोजी निर्देशीत केले आहे

श्री. त्रिंबक तुपे :किती कालावधी साठी देणार हे नमूद पाहिजे होते.

मा.आयुक्त :महापालिकेच्या शाळेत २० हजार विद्यार्थीआहे पटपडताळणी झाली तेंव्हा १७७७४ विद्यार्थीम्हणजेच ८८ टक्के विद्यार्थीहजर होते. शाळा स्थलांतरचा प्रस्ताव यामूळे दिला की कलेक्टर ऑफिसच्या बाजूला असलेल्या शाळेत भेट दिली ४० विद्यार्थीसंख्या असतांना ७ विद्यार्थीहजर होते त्यासाठी २ शिक्षक इतर कर्मचारी दिसून आले तेथे विद्यार्थीनाही इमारत भाडयाची होती म्हणून शिफ्ट केली ज्या शाळेत संख्या कमी आहे जवळ इतर मनपाची शाळा आहे शिक्षक जास्त झाले त्यासाठी या शाळा बाजूलाच जवळच्या शाळेत शिफ्ट करण्याचा प्रस्ताव आहे शाळा बंद करीत नाही.ज्या इमारती रिकाम्या होतील त्याचा चांगला वापर कसा होईल हे प्रशासन बघेल.प्रस्तिावानुसार या शाळेच्या संदर्भात कोर्टात केस चालू होती. असा मुद्दासमोर आला की मुलांचे शैक्षणिक वर्ष चालू आहे.रस्त्यापेक्षा मुलाचे होणारे नुकसान हे जास्त महत्वाचे त्यामूळे मा.न्यायालयाने विचारणा केली की यांची पर्यायी व्यवस्था मनपा करू शकेल का त्यावर शिक्षण विभागाने जवळच्या शाळेत जेथे एक शिफ्टमध्ये शाळा भरते तेथे देता येईल निर्णय झाला ३ दिवसाच्या आत ताबा त्यांना दिला तरी त्या संस्था मा. सर्वोच्च न्यायालयाकडे गेली ते कळले तेंव्हा त्या मालमत्ता निष्कषीत केल्या जागा ताब्यात घेतल्या. मुद्दा हा होता की मुलाचे शेक्षणिक वर्ष वाया जावू नये रस्ता झाला पाहिजे म्हणून या शैक्षणिक वर्षासाठी शिफ्ट करायची आहे त्यांना काळजी असेल तर ते शिफ्ट करतील या शैक्षणिक वर्षाकरीता या शाळा दयायच्या होत्या वेळ कमी होता म्हणून मान्यता घेता आली नाही तातडीने करावे लागले म्हणून हा प्रस्ताव आता कार्योत्तर मान्यतेसाठी आला.

श्री.संजय जोशी :नवीन शैक्षणिक वर्षात या संस्था मनपाच्या जागेत असणार की नाही.

श्री.गिरजाराम हळनोर :फक्त या शैक्षणिक वर्षासाठी पर्यायी व्यवस्था देण्यात येईल असे टाकावे.

मा.महापौर : या शैक्षणिक वर्षोसाठी स्थलांतरित करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा बन्सीलालनगर येथे द.न्यू, एपोस्टोलिक चर्च एज्युकेशन संस्थेची इंग्रजी माध्यमाची शाळा आणि मनपा प्राथमिक शाळा प्रगती कॉलनी (घाटी) येथे बुरानी नॅशनल उर्दु हायस्कुल या दोन शाळांचे या शैक्षणिक वर्षोसाठीच स्थलांतर करण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६७६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शुक्ला ममता संतोषकुमार सह शिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बासंबा जिल्हा हिंगोली येथे कार्यरत आहे. त्यांनी विनंती अर्ज सादर केला आहे की, त्यांचे पती श्री. मुकूंद बळवंतराव नायक हे औरंगाबाद परिक्षा मंडळ औरंगाबाद परिक्षा मंडळ औरंगाबाद येथे नौकरीवर आहेत श्रीमती शुक्ला ममता संतोषकुमार यांना नौकरीच्या ठिकाणी जाण्या येण्यासाठी लांब पडत असल्यामुळे त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत बदली करण्यात यावी अशी विनंती केली आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

संवाद:-

श्री.संजय चौधरी :शाळा शिफ्ट मर्ज करणार ठराव मंजूर केला यातून १५-२० शिक्षक एक्स्ट्रा होणार आहे यापुर्वी ८ शिक्षक अशा पध्दतीने घेण्यात आले ते जास्तीचे झाले होते त्यांना परत पाठविण्याचा निर्णय घेतला काय कार्यवाही केली.

श्री.महेश माळवंतकर :शाळा शिफ्ट मर्ज करणार आहोत अतिरिक्त शिक्षक उपलब्ध होणार आहे ७ शिक्षकांना परत पाठवावे यापूर्वी निर्णय घेतला कार्यवाही केली का महापालिकेत जर त्यांचे पती सेवेत असेल तर समजू शकतो परंतु संस्थेत असेल तरी प्रस्ताव येतात हे योग्य नाही शासनाचा जी आर काय आहे त्यानुसार व आवश्यकतेचा विचार करून कार्यवाही करावी.

प्र.शिक्षणाधिकारी :एकतर्फी बदली स्वरूपाचा प्रस्ताव दिला आहे सदर शिक्षीकेचे पती हे खाजगी संस्थेमध्ये नोकरीला आहे यापूर्वी असा ठराव घेतला की विदयापीठात सेवेत असेल तर असे एक शिक्षक आपणांकडे रूजू झाले शासनाचे आदेश असे की शासकीय सेवेत पती किंवा पती असेल एक जण महापालिकेत किंवा जि.प.सेवेत असेल त्यांना एकत्रीकणामध्ये प्राधान्य दयावे असे निर्देश आहे.एक जि.प.दुसरे शासकीय किंवा निमशासकीय कर्मचारी असेल तर प्राधान्य दयावे एक जि. प. कर्मचारी व दुसरे शासन मान्यता संस्थेतील कर्मचारी असेल तर प्राधान्य दयावे असे म्हटले आहे.

श्री.संजय चौधरी :जी आर आहे पती पत्नी एकत्रीकरणामध्ये येतात ठिक आहे परंतु खरच आवश्यकता आहे का ?

श्री.त्रिंबक तुपे :प्रस्ताव नियमात बसतो का ?

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी अशासकीय प्रस्ताव आले होते ते मंजूर केले असे किती प्रस्ताव मंजूर केले. माहिती दयावी,

श्री.त्रिंबक तुपे :यापूर्वी असा ठराव झाला असेल तर मंजूर करावे.

श्री.संजय जोशी :हा प्रस्ताव नियमाला धरून नाही जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

मा.महापौर :हा विषय स्थगित करण्यात येतो.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी असे प्रस्ताव आले होते काही अशासकीय प्रस्ताव आले ते मंजूर केले एक धोरण ठरवावे.

मा.महापौर :हा विषय मंजूर

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती शुक्ला ममता संतोषकुमार सह शिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बासंबा जिल्हा हिंगोली यांची औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत नियमाप्रमाणे बदली करण्यास मंजुरी करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६७७**

औरंगाबाद महानगरपालिकेत ई-टेंडरींग सेवा देण्याकरीता पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेत BOT तत्वावर ई-टेंडर सेवा चालविण्यासाठी स्थायी समिती सभा दिनांक २८.०३.२००६ विषय क्रमांक २९७ प्रमाणे मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि.या संस्थेस काम देण्यांत आलेले आहे. सदर संस्थेचा करार दिनांक ३१.०५.२०११ रोजी संपल्यामुळे त्यांना पुढील मुदत वाढ देण्यांत आलेली आहे.

करार संपल्यामुळे संबंधित एजन्सी पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रति व्यवहार रूपये १६०/- ऐवजी रूपये ४००/- असे दर प्रस्तावात दिला असुन महाराष्ट्र शासनाचे ई-टेंडर सोल्युशन विविध शासकीय विभागात प्रति व्यवहार रूपये ८८२/- आकारत आहे.

करिता कमी दर असलेले मे.ढंवगळे इन्फोटेक प्रा.लि.यांचेशी दराबाबत वाटाघाटी करण्यांत आल्या व वाटाघाटी अंती प्रति व्यवहार रूपये ३००/- दर निश्चित करण्यांत आले. यासाठी महानगरपालिकेला मनुष्यबळ व हार्डवेअर पुरविण्यांची गरज नाही. तसेच हे दर कमी असल्यामुळे पुढील पाच वर्षाकरीता ई-टेंडर सेवा मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि.यांच्या मार्फत सुरू ठेवण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

संवाद:-

श्री.संजय जोशी :सर्वोअर,पी सी कुणाची इंन्टरनेटचे पैसे कुणाच्या नावावर भरून घेतो लाईटच्या व्यवस्थे बाबत काय जागेचे भाडे घेतो का?

श्री.त्रिंबक तुपे :उत्पन्न खर्चाचा खुलासा करावा.

डॉ.जफर खॉन :यांचे ऑडीट झाले का

शहर अभियंता :मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि यांना २००७ मध्ये काम दिले होते पाच वर्षाचा कालावधी होता तो संपत आहे.ई टेंडरीग ही पध्दत शासनाने कम्पल्सरी केली त्याशिवाय निविदा पध्दती चालणार नाही.शासनाने त्यांचे जी आर मध्ये ८८२रू प्रमाणे दयावे असे म्हटले परंतु या एजन्सीने ४००रू ची ऑफर दिली होती ३०० केले.

श्री.संजय जोशी :जो जी आर आला तो महापालिकेला लागू आहे त्यावर प्रत म्हणून आयुक्त महापालिका आहे का?

| | |
|---|---|
| शहर अभियंता | :निविदा पध्दतीसाठी हे लागू केले आहे |
| श्री.संजय जोशी | :मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रत तर महापालिका आयुक्तांना प्रत का आली नाही. |
| शहर अभियंता | :ई-टेंडरींग औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्रात पहिल्यांदा केली. यानंतर शासनाने या बाबत जी आर काढला आहे. |
| श्री.प्रफुल्ल मालानी | :महापालिकेसाठी हा जी आर लागू असता तर त्याप्रमाणे दर देणे बाबत प्रस्ताव आला असता. |
| श्री.राजू शिंदे | :निविदा मागवाव्या कमीत कमी दर जे येतील त्यांना दयावे तोपर्यंत जुने दराप्रमाणे चालू ठेवावे. |
| शहर अभियंता | :जागा व लाईट महापालिकेकडे बाकी सर्व साहित्य एजन्सीचे आहे. चांगला प्रकल्प आहे. |
| श्री.संजय जोशी | :मागील रेट पेक्षा कमी रेटने दयावे असे माझे मत आहे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :टेंडर कसे काढणार |
| शहर अभियंता | :ई-टेंडरींग नूसार काढणार |
| श्री.त्रिंबक तुपे | :टेंडर काढल्यानंतर असे होवू नये की पुन्हा शासनाच्या दराप्रमाणे टेंडर येणार असे व्हायला नको. |
| शहर अभियंता | :गेल्या पाच वर्षात १५४०० ई-टेंडरींग कॉल केले त्यातून एजन्सीला २४ लक्ष व महापालिकेला १.२८ कोटी मिळाले. |
| डॉ.जफर खॉन | :यांचे ऑडीट केलेले आहे का ? |
| शहर अभियंता | :ऑडीट करणे आवश्यक आहे एक महिण्यात ऑडीट रिपोर्ट तयार करून सभागृहासमोर सादर होईल. |
| मा.महापौर | :मंजूर |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत ई-टेंडरींग सेवा देण्याकरीता कमी दर असलेले मे.ढंवगळे इन्फोटेक प्रा.लि. यांचेशी दराबाबत झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे प्रति व्यवहार रूपये ३००/- या दरानुसार पुढील पाच वर्षाकरीता ई-टेंडर सेवा मे.ढवंगळे इन्फोटेक प्रा.लि.यांच्या मार्फत सुरू ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-६७८**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अभिलेख विभागात विविध विभागांकडून अभिलेखे प्राप्त होतात. या अभिलेखापैकी काही अभिलेखे अत्यंत जुने व जिर्ण अवस्थेत आहे. या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे अभिलेख्यांची वर्गवारी करण्यांत आलेली नाही, त्यामुळे नागरिकांकडून मागणी केलेली कागदपत्रे / अभिलेखे शोधण्यासाठी जास्त वेळ लागतो. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. अभिलेख विभागात साधारणतः मालमत्ता कर पाणीपुरवठा कर ,नगर रचना विभाग, जन्म-मृत्यु विभाग, लेखा विभाग ईत्यादीचे अभिलेखे जमा होतात. या सर्व विभागांचे स्कॅनिंग व डिझीटायझेशन केल्यास संगणकाद्वारे संचिकेची माहिती त्वरीत उपलब्ध होवू शकेल. यासाठी स्कॅनिंग व डिझीटायझेशनचे काम करणाऱ्या खाजगी एजन्सीकडून काम करून घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. यामध्ये संबंधित एजन्सीला उपलब्ध

असलेल्या अभिलेखांचे सर्व्हेक्षण करणे,अभिलेखांचे मोजणी करणे, संचिकेतील फाटलेल्या कागदांची किरकोळ दुरूस्ती करणे,संचिका स्वच्छ करणे, ई.कामे संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांच्या देखरेखी खाली करण्यांत येईल. हे काम पूर्ण करून घेण्यांसाठी महानगरपालिकेतर्फे एक नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत येईल.

याकरिता मनपाकडील विविध विभागात असलेले अभिलेख्यांचे Scanning & Digitization, Indexing करून घेण्यासाठी पहिल्या टप्प्यात खालील प्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मालमत्ता अंदाजे संख्या | १,५०,००० x १० | पाने | १५,००,००० |
| २ | जन्म मृत्यु प्रमाणपत्र | | | |
| | (दरवर्षी १८००० x १० वर्ष ) | १,८०,००० X | पाने | १,८०,००० |
| ३ | नगर रचना विभाग | ३५,००० (फाईल्स) X १० | पाने | ३,५०,००० |
| ४ | मालमत्ता विभाग | १,००,००० X | पाने | १,००,००० |
| ५ | लेखा विभाग | ३,००,००० X | पाने | ३,००,००० |
| ६ | इतर | २,००,००० X | पाने | २,००,००० |
| | | एकूण अंदाजित पाने : | | २६,३०,००० |

Scanning & Digitization, Indexing साठी रू. १,०५,२०,०००, ( एक कोटी पाच लाख विस हजार ) एवढा खर्च अपेक्षित आहे. करिता वरील प्रमाणे स्कॅनिंग व डिझीटायझेशन खाजगी एजन्सीमार्फत करून घेण्यांसाठी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्वत प्रस्ताव सादर.

**संवाद:**

श्री.रेणुकादास वैद्य :यापूर्वी मागच्या टर्म मध्ये ही अशाप्रकारचे काम करायचे म्हणून २ कोटी खर्च केले त्यात कोणते कामे केली माहिती घ्यावी

श्री.समीर राजूरकर :प्रस्ताव जी किमत दाखवली ती कशावरून ठरविली मागे असाच खर्च केला त्याची ही माहिती दयावी.

श्री.संजय जोशी :यापूर्वीच्या एजन्सीने सोपे असलेले काम केले जास्त पैसे त्यातून मिळविण्याचा प्रयत्न केले व निघून गेले.त्यांचेवर काय कार्यवाही केली.

डॉ.जफर खॉन :रेकॉर्डचे वर्गीकरण झाले का ?किती वर्षापर्यत रेकॉर्डचे केलेले आहे का यात काही अनावश्यक पानांचा उल्लेख आहे स्पष्टीकरण व्हावे.

श्री.राजू शिंदे :चांगला ठराव आहे यापूर्वी काही रेकॉर्ड गहाळ आहेत या मूळे रेकॉर्ड अपडेट राहतील मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.प्रफुल्ल मालाणी :यापूर्वी ही सिस्टीम लागू केली होती काम कुठेपर्यत आहे.

श्री.त्रिंबक तुपे :किमत कशी ठरविली.

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत अधिकारी यांना अभ्यास करण्यासाठी वेळ दयावा पुढच्या बैठकीत हा विषय घ्यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला अभिलेख कक्ष कुणाच्या अंडरमध्ये चालतो.

मा.महापौर : सदरील विषय हा अभिलेख विभागाशी संबधीत असून हा विभाग आस्थापना -२ अंतर्गत येत असल्याने सदर उपआयुक्त हे त्याचे विभाग प्रमुख आहेत त्यामूळे हा विषय येत असतांना तो आस्थापना-२

२ विभागाशी संबधीत असल्याने यापुढील कार्यवाही आस्थापना-२ विभागामार्फत करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा विषय आस्थापना-२ अंतर्गत अभिलेख विभागाशी संबधीत असून या विभागाचे विभाग प्रमुख उप आयुक्त (प्र) असुन पुढील कार्यवाही त्यांचे मार्फत करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६७९**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी महिन्यापासुन युध्द पातळीवर हाती घेण्यात आलेली आहे. शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आली आहे त्या पैकी, महात्मा गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्ता आहे.

प्रस्तुत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू. ४,६३,०५,२७०/- चे आहे.

या कामासाठी मा.महापौर यांचे पत्र जा.क्र./मनपा/महापौर/१५५५/२०१२,दि.२२/०२/२०१२ नुसार तीन वेळा निविदा मागविल्या परंतू तीनही वेळेस दर भरून एकही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे शहरातील हॉट मिक्स प्लांट धारक आणि रस्त्याची कामे करणारे नामांकीत कंत्राटदार यांची दिनांक २६/०३/२०१२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि सर्व उपस्थित कंत्राटदारांना आयुक्त आणि शहर अभियंता यांनी ही कामे करण्यासाठी आवाहन केले आणि लगेच संमतीपत्र देण्याचे सुचवले. त्यानुसार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन आणि चंद्राम आशन्ना या दोन कंत्राटदारांनी आपसात हे काम विभागून घेऊन ६.१२% जास्त दराने काम करण्यास संमतीपत्र दिले. त्यानंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी प्रशासनाच्या समितीने वरील कंत्राटदारांची बैठक आयोजीत करून त्यांना अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी सुचविले. परंतू कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस संमती दर्शविली नाही. कंत्राटदारांनी संमतीपत्राद्वारे ऑफर केलेल्या ६.१२% जास्त दरास दिनांक २९/०३/२०१२ रोजी आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.४,६३,०५,२७०/- आणि ६.१२% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,९१,३९,१५३/- यास कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. तसेच वरील प्रमाणे दोन्ही कंत्राटदारांना विभागून काम प्रदान करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी महात्मा गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्त्यास अंदाजपत्रक रक्कम रू.४,६३,०५,२७०/- आणि ६.१२% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,९१,३९,१५३/- यास व मे.अरोरा कन्स्ट्रक्शन आणि चंद्राम आशन्ना या दोन कंत्राटदारांना आपसात हे काम विभागून देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६८०:**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी महिन्यापासुन युध्द पातळीवर हाती घेण्यात आलेली आहे. शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आली आहे त्या पैकी, नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई १२ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्ता आहे.

प्रस्तुत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू. १,८७,२३,८९६/- चे आहे.

या कामासाठी मा.महापौर यांचे पत्रजा.क्र./मनपा/महापौर/१५५५/२०१२ दि.२२/०२/२०१२ नुसार तीन वेळा निविदा मागविल्या असता पहिल्या वेळेस २०% जास्त दराची आणि दुसऱ्या वेळेस एकही निविदा दर भरून प्राप्त झाली नाही. त्यामुळे शहरातील हॉट मिक्स प्लांट धारक आणि रस्त्याची कामे करणारे नामांकीत कंत्राटदार यांची दिनांक २६/०३/२०१२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि सर्व उपस्थित कंत्राटदारांना आयुक्त आणि शहर अभियंता यांनी ही कामे करण्यासाठी आवाहन केले आणि लगेच संमतीपत्र देण्याचे सुचवले. त्यानुसार मे.कालीका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स आणि ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन या दोन कंत्राटदारांनी आपसात हे काम विभागून घेऊन ६.१३% जास्त दराने काम करण्यास संमतीपत्र दिले. त्यानंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी प्रशासनाच्या समितीने वरील कंत्राटदारांची बैठक आयोजीत करून त्यांना अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी सुचविले. परंतू कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस संमती दर्शविली नाही. कंत्राटदारांनी संमतीपत्राद्वारे ऑफर केलेल्या ६.१३% जास्त दरास दिनांक २९/०३/२०१२ रोजी आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.१,८७,२३,८९६/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू.१,९८,७१,६७१/- यास कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. तसेच वरील प्रमाणे दोन्ही कंत्राटदारांना विभागुन काम प्रदान करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- मंजुर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी नेहरू भवन ते औरंगपुरा भाजी मंडई १२ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्त्यास अंदाजपत्रक रक्कम रू.१,८७,२३,८९६/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू.१,९८,७१,६७१/- यास व मे.कालीका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स आणि ड्रिमलँड कन्स्ट्रक्शन या दोन कंत्राटदारांना आपसात हे काम विभागून देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-६८१**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी महिन्यापासुन युध्द पातळीवर हाती घेण्यात आलेली आहे. शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात

आली आहे त्या पैकी, जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शाहगंज चमन १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्ता आहे.

प्रस्तुत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.४,०८,१९,९४३/- चे आहे.

या कामासाठी मा.महापौर यांचे पत्र जा.क्र./मनपा/महापौर/१५५५/२०१२, दिनांक २२/०२/२०१२ नुसार तीन वेळा निविदा मागविल्या असता पहिल्या वेळेस ९.९९% जास्त दराची निविदा एक निविदा प्राप्त झाली दुसऱ्या व तीसऱ्या वेळेस ३०% जास्त दराची Conditional एकच निविदा प्राप्त झाली. त्यामुळे शहरातील हॉट मिक्स प्लांट धारक आणि रस्त्याची कामे करणारे नामांकीत कंत्राटदार यांची दिनांक २६/०३/२०१२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि सर्व उपस्थित कंत्राटदारांना आयुक्त आणि शहर अभियंता यांनी ही कामे करण्यासाठी आवाहन केले आणि लगेच संमतीपत्र देण्याचे सुचवले.त्यानुसार मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी ६.१३% जास्त दराने काम करण्यास संमतीपत्र दिले. त्यानंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी प्रशासनाच्या समितीने वरील कंत्राटदारांची बैठक आयोजीत करून त्यांना अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी सुचविले. परंतू कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस संमती दर्शविली नाही. कंत्राटदारांनी संमतीपत्राद्वारे ऑफर केलेल्या ६.१३% जास्त दरास दिनांक २९/०३/२०१२ रोजी आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.४,०८,१९,९४३/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,३३,२२,२०६/- यास कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. तसेच वरील प्रमाणे संबधीत कंत्राटदारास काम प्रदान करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आली आहे त्या पैकी, जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलीपुरा ते शाहगंज चमन १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्त्यास मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी ६.१३% जास्त दराने काम करण्यास अंदाजपत्रक रक्कम रू.४,०८,१९,९४३/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,३३,२२,२०६/- ला कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## विषय क्रमांक :-६८२

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी महिन्यापासुन युध्द पातळीवर हाती घेण्यात आलेली आहे. शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आली आहे त्या पैकी, औरंगाबाद महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत ते चेलीपुरा चौक १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्ता आहे.प्रस्तुत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०११-१२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू. ४,२६,६९,७११/- चे आहे.

या कामासाठी मा.महापौर यांचे पत्र जा.क्र./मनपा/महापौर/१५५५/२०१२, दिनांक २२/०२/२०१२ नुसार तीन वेळा निविदा मागविल्या असता तीन्ही वेळेस एक ही निविदा प्राप्त झाली नाही. त्यामुळे शहरातील हॉट मिक्स प्लांट धारक आणि रस्त्याची कामे करणारे नामांकीत कंत्राटदार यांची दिनांक २६/०३/२०१२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली आणि सर्व उपस्थित कंत्राटदारांना आयुक्त आणि शहर अभियंता यांनी ही कामे करण्यासाठी आवाहन केले आणि लगेच संमतीपत्र देण्याचे सुचवले. त्यानुसार मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी ६.१३% जास्त दराने काम करण्यास संमतीपत्र दिले. त्यानंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी प्रशासनाच्या समितीने वरील कंत्राटदारांची बैठक आयोजीत करून त्यांना अंदाजपत्रकीय दराने काम करण्यासाठी सुचविले. परंतू कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस संमती दर्शविली नाही. कंत्राटदारांनी संमतीपत्राद्वारे ऑफर केलेल्या ६.१३% जास्त दरास दिनांक २९/०३/२०१२ रोजी आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

अंदाजपत्रक रक्कम रू.४,२६,६९,७११/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,५२,८५,३६४/- यास कार्योत्तर प्रशासकीय मान्यतेस्तव सादर. तसेच वरील प्रमाणे संबधीत कंत्राटदारास काम प्रदान करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील विविध रस्ते विकास योजनेनुसार रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्याच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आली आहे त्या पैकी, औरंगाबाद महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत ते चेलीपुरा चौक १५ मीटर रूंद हा एक विकास योजनेतील रस्त्यास मे.मॅस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी ६.१३% जास्त दराने काम करण्यास अंदाजपत्रक रक्कम रू.४,२६,६९,७११/- आणि ६.१३% जास्त दराने होणारी कंत्राटाची रक्कम रू. ४,५२,८५,३६४/- यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक:-६८३</u>**

प्रस्ताव साद करण्यात येतो की, सध्या शहरात विविध भागात मोठ्या प्रमाणात रस्ता रुंदीकरण मोहीम सुरु आहे. या मोहीमे अंतर्गत रस्ता रुंदीकरणामध्ये येणाऱ्या इमारती जेसीबीद्वारे तोडण्यात येऊन मलबा तातडीने उचलण्यात येत आहे. इमारती पाडतांना आवश्यक जास्त क्षमतेचे टुल्स/ मशीनरी मनपाकडे उपलब्ध नसल्यामुळे कामास विलंब होतो तसेच सध्या कार्यरत असलेल्या जेसीबी मशिन्स वारंवार नादुरुस्त होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सदरील कामे जलद गतीने व योग्य प्रकारे होण्यासाठी अग्निशमन व प्रशासकिय विभागासाठी १३वा वित्त आयोग अंतर्गत उपलब्ध असलेल्या रुपये १.६७ कोटी रकमेतुन एक जेसीबी व त्यासोबत आवश्यक टुल्स खरेदी करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे चार जेसीबी असुन त्यांचे खालीलप्रमाणे आयुष्यमान झालेले आहे.

| अ.क्र. | जेसीबी | मॉडेल | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | एम.एच.२०/ए-५७५८ | १९९६ | १६ |
| २ | एम.एच.२०/५०८३ | २००५ | ०७ |
| ३ | एम.एच.२०/ए.वाय-१६७२ | २००७ | ०५ |
| ४ | एम.एच.२०/ए.वाय-१६७३ | २००७ | ०५ |

वरील जेसीबीपैकी अ.क्र.१चे जेसीबी अत्यंत जुने झाले असुन सद्यस्थितीत नारेगाव कचरा डेपोवरील कचरा हटविण्यासाठी वापरण्यात येत आहे. उर्वरीत ३ जेसीबी सध्या शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम करीता कार्यरत आहेत. याशिवाय तोडण्यात आलेल्या इमारतीचा मलबा उचलण्यासाठी किरायाने जेसीबी घ्यावे लागत असल्यामुळे मशिनरी किरायापोटी खर्च होत आहे. अतिक्रमण हटाव पथकाचे काम जलद गतीने व कार्यक्षमरित्या होण्यासाठी जेसीबी मशिन व त्यासोबत आवश्यक उपकरणे खरेदीकरीता मे.जेसीबी इंडिया लि.हरियाणा,कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.रत्नप्रभा मोटर्स,औरंगाबाद यांच्या दरपत्रकाचा आधार घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| Sr.no. | Perticulers | Qty. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | 4 DX JCB.4x4 DD | 1 No. | 2678781/- |
| 2 | Disc Cutter and Hoses | 1 Set | 366470/- |
| 3 | H.M. 380 Rock Breaker | 1 Sest | 641858/- |
| 4 | G.A. Earth Dill | 1 Set | 368242/- |
| 5 | Ditch Cleaning Bucket | 1 No. | 46809/- |
| | | **Total Rs.** | **4102160/-** |

सद्यस्थितीत उपरोक्त प्रमाणे जेसीबी व इतर मशिनरी खरेदीसाठी जेसीबी कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद यांच्या दरपत्रकानुसार एकुण रुपये ४१०२१६०/- खर्च येतो. इन्युरन्स व आरटीओ पासिंगचा खर्च वेगळा करावा लागेल. तरी अग्निशमन व प्रशासकीय विभागा करीता आवश्यक यंत्रसामुग्री खरेदीकरीता रुपये ४१०२१६०/-चे अंदाजपत्रकास मान्यतेस्तव व सदरील खर्च १३ वा वित्त आयोगा अंतर्गत उपलब्ध निधी रक्कम रुपये १.६७ कोटी रक्कमेतुन करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :-**

श्री.संजय जोशी :१३ व्या वित्त आयोग मधून जलवाहिनीच्या भुसंपादनासाठी काही रक्कम खर्च करणार होतो असा निर्णय घेतला आता त्यातून नमुद केल्याप्रमाणे त्या विभागासाठी मशीनरी साहित्य घेणार त्यातील किती रक्कम शिल्लक आहे २५ हजार रक्कमेपेक्षा वस्तु खरेदीसाठी पेपरला देतो ई-टेंडरींग करतो ही रक्क्म मोठी आहे हे कुणी तयार केले..

शहर अभियंता :हे एस्टीमेशनसाठी दर घेतले आहे मंजूर झाल्यानंतर ई-टेंडरींग मध्ये याची निविदा काढणार आहोत.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अतिक्रमण हटाव पथकाचे काम जलदगतीने व कार्यक्षमरीत्या होण्यासाठी अग्निशमन व प्रशासकिय विभागाकरीता आवश्यक यंत्रसामुग्री,जेसीबी मशिन व त्यासोबत आवश्यक उपकरणे खरेदी करीता तयार करण्यात आलेल्या एकुण रुपये ४१०२१६०/-चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते तसेच सदरील खर्च १३ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध निधी रक्कम रुपये १.६७ कोटी रकमेतुन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:- ६८४**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये कामे हाती घेण्यासाठी वर्ष २०११-२०१२ साठी रूपये १०.०० लक्ष इतके अतिरिक्त अनुदान शासनाकडुन उपलब्ध होणेसाठी व सदर अनुदानातुन हाती घ्यावयाच्या प्रस्तावित सुविधा कामाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अ.प.रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०९, मो.भुजबळ नगर येथे कॉंक्रीट रस्ता बांधणी करणे बाबत | ९,९९,०५०/- |
| | **एकुण** | **९,९९,०५०/-** |

तरी वर प्रस्तावित नुसार शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत अनुदान उपलब्ध होणेस्तव उपरोक्त कामासाठीचे एकत्रित रक्कम रूपये १०.०० लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक रकमेचे काम हाती घेण्यासाठी निधी प्राप्त होणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मंजूरीस्तव पाठविणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्व साधारण सभागृहाचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद:-

श्री.संजय चौधरी :बीओटीतून हे काम होत आहे

कार्य.अभियंता-स्लम :स्लम विभागामार्फत होत आहे बीओटीतून होत नाही.

मा.महापौर :मंजूर

श्री.राजू शिंदे :गरवारे स्टेडीयम मध्ये जलतरणाचे काम हाती घेतले होते २५ टक्के झाले बाकी काम होणार की नाही का काम थांबविले.

कार्य.अभियंता(पापू) :महापालिकेची आर्थीक परीस्थिती बरोबर नसल्यामूळे काम थांबविले होते आता तेथे बीओटीवर काम करण्या संदर्भात मा.आयुक्तानी आदेशीत केले एक समिती नेमली आहे.शहर अभियंता त्या समितीचे अध्यक्ष असून २-३ दिवसात त्यावर निर्णय होवून कार्यवाही सुरू होईल.

मा.महापौर :या बाबतीत सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :त्या एजन्सीला ७५ लक्ष दिले आहे ४ वर्षापासून काम बंद आहे. आता त्या एजन्सीला परवडत नाही म्हणून काम केले नाही त्यांचेवर काय कार्यवाही केली.हस्तांतर करून घेतले त्यावेळी त्या कामाचा उल्लेख होता का उशीर केला प्रशासकीय पातळीवर याचा विचार व्हावा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वसाहतीमध्ये प्र.क्र.०९ मो.भुजबळ नगर येथे कॉक्रीट रस्ता बांधणी करणे बाबतचे र.रू.१०.०० लक्ष चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.तसेच उपरोक्त कामासाठीचे एकत्रित रक्कम रूपये १०.०० लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक रकमेचे काम हाती घेण्यासाठी शासनाकडून निधी प्राप्त होणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक</u> <u>:-६८५</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रेल्वे स्टेशन न.भू.क्र.१९१४९ येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील ५८०.०० चौ.मी. बांधीव क्षेत्र व २९० चौ.मी. वाहनतळ असलेली इमारत निविदेतील अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर देणे बाबत जा.क्र./ मनपा/ बीओटी/ २०११/ ४३०, दिनांक ३०.१२.२०११ अन्वये दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची निविदा विक्रीचा दिनांक ०२.०१.२०१२ ते २३.०१.२०१२ या कालावधीत निश्चित करण्यात आला होता. व निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक २३.०१.२०१२ पावेतो तीन निविदा लेखा विभागाकडे दर भरुन प्राप्त झाल्या त्या बाबतचा तपशिल खाली दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा धारकाचे नांव | देकार दर प्रति वर्ष भाडेपट्टा रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री विजयसिंग उर्फ नंदलाल जयसिंग राजपुत (परदेशी), हॉटेल अंबर जवळ, नारळीबाग, | रुपये १,०५,,०००/- प्रति माह |
| २ | श्री अरविंद देवराम पवार, रा.७२, उल्कानगरी, गारखेडा, औरंगाबाद | रुपये ३६,०००/- प्रति माह |
| ३ | श्री रमेश बाळकृष्ण रुडसमुद्र, रा.एन-५, ए-११७, के-८/२८, सिडको. | रुपये ३३,४७५/- प्रति माह |

उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या गोषवाऱ्याचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता श्री विजयसिंग उर्फ नंदलाल जयसिंग राजपुत (परदेशी) यांनी सर्वात अधिक म्हणजेच रक्कम रुपये १,०५,०००/- प्रतिमाह भाडेतत्वावर घेणेसाठी देकार दर सादर केलेला आहे. तसेच विषयांकित बी.ओ.टी. प्रकल्पावर काम करीत असलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. एस.बी.एस.ॲन्ड असोसिएट्स यांनी दिनांक ०२.०१.२०१२ रोजी सदर इमारतीचे रेंट व्हॅल्युएशन सादर केलेले असुन त्यात विषयांकित इमारतीचे मासिक भाडेपट्टा हे रुपये १,१३,६२५/- एवढे येत असल्याचे नमुद केलेले आहे. तुलनात्कदृष्ट्या सर्वात जास्त प्राप्त झालेल्या देकार दर येत असलेल्या रेंट व्हॅल्युएशन पेक्षा कमी असल्याने श्री विजयसिंग उर्फ नंदलाल जयसिंग राजपुत (परदेशी) यांना देकार दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी रुपये १,०५,०००/- प्रति माह भाडेपट्टा ऐवजी रुपये १,१०,०००/- प्रति माह भाडेपट्टा दर देण्यास लेखी संमती दिली आहे.

प्राप्त देकार दर हे महानगरपालिकेच्या दृष्टीने फायदेशीर असल्याने सदर इमारत तीन वर्षासाठी श्री विजयसिंग उर्फ नंदलाल जयसिंग राजपुत (परदेशी) यांना रुपये १,१०,०००/- प्रति माह प्रमाणे निविदेतील अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर **:-** मंजुर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे स्टेशन न.भू.क्र.१९१४९ येथील व्यापारी संकुलातील मनपा हिश्यातील ५८०.०० चौ.मी. बांधीव क्षेत्र व २९० चौ.मी. वाहनतळ असलेली इमारत तीन वर्षासाठी श्री विजयसिंग उर्फ नंदलाल जयसिंग राजपुत (परदेशी) यांना रुपये १,१०,०००/- प्रति

माह प्रमाणे निविदेतील अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर देणेस मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-६८६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौ.पुष्पनगरी येथील स्मशानभुमी सुशोभिकरण देखभाल व परिरक्षण ईत्यादी सेवा पुरविण्यासाठी यापुर्वी रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद पुर्व यांनी सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भाने मा.सर्वसाधारण सभेच्या दि.१९.०१.२००५ च्या सभेत ५३७/१४ ने सादर केलेल्या प्रस्तावात झालेल्या मान्यता अटी शर्ती निश्चीत करून या सेवाभावी संस्थेस पाच वर्षाच्या कालावधी करीता करारनामा करून सदर स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी देण्यात आलेली होती. सदर करारनामा मुदत मार्च २०११ रोजी संपलेली आहे.

आता रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (पु) परिक्षण या सेवाभावी संस्थेने मे.पल्लावांकुर नर्सरीज या सहयोगी संस्थेसह अर्ज करून पुढील दहा वर्षाकरीता सदर स्मशानभुमी यापुर्वी चे मंजुर धोरण अटी व शर्ती च्या अधीन राहुन विकसीत करण्यावस परीरक्षण देखभाल करण्याचे प्रस्तावीत केलेले आहे. सदर संस्थेचे मागील पाच वर्षाचा काम पाहता सदर संस्थेस यापुर्वी धोरणाचा पुढील धोरणाचा पुढील भाग म्हणुन मंजुर अटी व शर्ती च्या अधीन राहुन दहा वर्षाच्या कालावधी करीता सदर स्मशान भुमी विकाससह परिरक्षण व देखभाल करीता संस्थेसह सहयोगी संस्थेस देण्यात प्रशासकिय मान्यता झालेली आहे.

करिता वर नमुद केल्यानुसार यापुर्वीचे मंजुर ठरावाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णय/मंजुर धोरणाचा पुढील भाग म्हणुन यापुढील दहा वर्षा करीता सदर स्मशान भुमी रोटरी क्लब औरंगाबाद पुर्व या संस्थेस त्यांचे सहयोगी संस्थेस परिक्षण देखभालीसाठी चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसामोर मंजुरीस्तव सादर.

संवाद:-

श्री.गिरजाराम हळनोर :याप्रमाणे कैलासनगर प्रतापनगर स्मशानभुमीची कुणी देखभाल करीत असेल तर तसे प्रस्ताव आणावे.

श्री.गजानन बारवाल :रोटरी क्लब ऑफ पुर्व यांनी महापालिकेला यापुर्वीही मोठी मदत केली आहे हा प्रस्ताव आला त्यांचे मी महापालिकेच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौ.पुष्पनगरी येथील स्मशानभुमी रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद (पु) परिक्षण या सेवाभावी संस्थेस मे.पल्लावांकुर नर्सरीज या सहयोगी संस्थेसह मंजुर अटी व शर्ती च्या अधीन राहुन दहा वर्षाच्या कालावधी करीता सदर स्मशान भुमी विकाससह परिरक्षण व देखभाल करिता देणेस मंजुरी देण्यात येते .वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६८७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात उघडयावर शौचविधी करण्यापासुन नागरीकांना परावृत्त करणे व शहर हागणदारी मुक्त करणे संदर्भाने शासनाकडून महानगरपालिकेस सूचना प्राप्त झालेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र भुजल व निर्मल अभियाना अंतर्गत शहर स्वच्छता सुविधांचे सार्वत्रिकरण करण्यासाठी नागरी संस्थानी करावयाच्या उपाययोजने अंतर्गत शहरात विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधून या सेवा बाबत पाठपुरावा करुन शहर हागणदारीमुक्त करण्याचे योजिलेले आहे.

औरंगाबाद शहरात मच्छली खडक गुलमंडी या परिसरात मुख्य बाजारपेठ असुन त्याठिकाणी नागरीकांची ,व्यापाऱ्यांची नेहमीच जास्त प्रमाणात वर्दळ असते सदर ठिकाणी सुलभ शौचालय असणे गरजेचे असल्याने मच्छली खडक येथील वसंत भूवन इमारत ही महानगरपालिका औरंगाबाद च्या मालकीची असल्याने सदर इमारतीची दिनांक १४.३.२०१२ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. येथे मनपाच्या मालकीची मोकळी जागा असुन या जागे पैकी महावितरण कार्यालयाच्या डी.पी.लगत असलेल्या दुमजली मोडकळीस आलेली व अंशतः वापरात असलेल्या इमारतीचा काही भाग पाडून तेथे उपलब्ध होणाऱ्या जागेत पे ॲण्ड यूज तत्वावरील सुलभ शौचालय बांधल्यास बाजारपेठेत येणाऱ्या व्यापाऱ्यांची /नागरीकांची गैरसोय दुर करता येणे शक्य होईल.

त्यानुसार वसंत भूवन इमारतीचा अंशतः भाग पाडून त्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या जागेत पे ॲण्ड युज तत्वावरील सार्वजनिक वापराचे शौचालयाचे बांधकाम करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

संवादः-

| | |
|---|---|
| मा.महापौर | :- विषय मंजुर |
| श्रीमती किर्ती शिंदे | :ही इमारत मुख्य बाजार पेठेत आहे. तेथे शौचालयाचे बांधकाम न करता व्यापारी संकुल बीओटी व किंवा महानगरपालिकेने विकसीत करावे उत्पन्न येईल आलेला प्रस्ताव रद्दकरावा. |
| श्री.राजू शिंदे | :महत्वाची मोक्याची जागा आहे तेथे हॉल करावा कायमचे उत्पन्न मनपाला येईल विषय रद्दकरावा. |
| श्री.गजानन बारवाल | :रस्ता रूंदीकरण केले आहे महत्वाची जागा आहे विकायची नाही परंतु जवळपास कुठेही शौचालयाची सोय नाही मंजूर करावे. |
| श्री.राजू शिंदे | :यासाठी एवढी किमती जागा देण्याची गरज नाही. |
| श्री.समीर राजूरकर | :किमती जागा देत आहोत. वाटेल तेंव्हा महापालिका ताब्यात घेईल अशी किमान अट टाकावी. |
| मा.उपमहापौर | :रस्ता रूंदीकरणात ज्यांचीजागा घर गेले त्यांना पर्यायी जागा टीडीआर देत आहे यात व्यापा-यांचे मोठे नुकसान झाले पैसा असून त्यांना दुकाने उपलब्ध नाही त्यासाठी या बरोबर तेथे व्यापारी संकुल उभारावे करोडो रूपये डिपॉजीट येईल ज्यांची भाडयाने दुकाने होती त्यांना दुकाने मिळेल |
| श्री.त्रिंबक तुपे | :आताच सुचना केली त्यासाठी तसा सुधारीत प्रस्ताव आणावा हा मंजूर करावा. |
| श्री.राजू शिंदे | :या विषयावर मतदान घ्यावे. |

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मच्छली खडक गुलमंडी या परिसरात मुख्य बाजारपेठ असुन सुलभ शौचालय असणे गरजेचे असल्याने वसंत भूवन येथील मनपाच्या मालकीच्या महावितरण कार्यालयाच्या डी.पी.लगत असलेल्या दुमजली मोडकळीस आलेली व अंशतः वापरात असलेल्या इमारतीचा काही भाग पाडून तेथे उपलब्ध होणाऱ्या जागेत पे ॲण्ड यूज तत्वावरील सुलभ शौचालय बांधल्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक:-६८८</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरवासीयांना करण्यात येत असलेल्या पिण्याच्या पाण्याचा वापर फक्त घरगुती वापरासाठी (Domestic use) होणे अभिप्रेत असतांना, पिण्याचे पाणी हे वाहने धुण्यासाठी, बागकामासाठी, बांधकाम, कपडे धुणे, संडास फ्लशिंग, घर धुणे, पाळीव प्राण्यांची स्वच्छता इत्यादीसाठी करण्यात येत आहे. या घरगुती वापरा व्यतिरिक्त कारणांमुळे तसेच वाढीव लोकसंख्येमुळे पिण्याच्या पाणी पुरवठ्यावर ताण पडत असून, भविष्यात शहरवासीयांना पाणी पुरवठा करणे साठी महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सोसावा लागुन आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागणार आहे.

केंद्र शासनाने नागरी क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर करण्याकरीता एकुण सांडपाण्याच्या किमान २०% सांडपाणी हे पुर्नवापराकरीता उपलब्ध करण्यात यावे असे मानक विहीत केले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यात सुरु करतांना राज्य शासनाने सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापरा संबंधी सदर मानक स्विकृत केले आहे.

शहरातील उत्सर्जित होणाऱ्या एकुण सांडपाण्यात बाथरुम, स्वयंपाकघराद्वारे निर्माण होणारे सांडपाणी म्हणजेच Sullage (Grey water) व स्वच्छतागृहाद्वारे निर्माण होणारे Sewage (काळे पाणी) यांचा समावेश होतो. पैकी स्वयंपाकघर व न्हानीघर मधुन निघणाऱ्या पाण्यावर अशंत: प्रक्रिया करुन त्याचे पुर्नचक्रीकरण करुन त्याचा पुर्नवापर करण्याकरीता एकुण सांडपाण्याच्या किमान २०% सांडपाणी हे पुर्नवापरासाठी उपलब्ध व्हावे म्हणुन शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सांडपाण्याचे चक्रीकरण (Recycling) करुन त्याचा पुर्नवापर करण्याकरीता (Draft Byelaws for Grey Water reuse in Housing and Commercial complexes in Aurangabad City) हा उपविधींचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे. यामुळे अमुल्य अशा पाण्याचे संवर्धन होऊन महानगरपालिकेवर पाणी शुध्दीकरणावर होणारा खर्च, पाण्याची बचत, ड्रेनेज व्यवस्थेवर पडणारा ताण व त्यावरील अतिरिक्त खर्च आणि पर्यावरणावर होणारे दुषीत परिणाम हे कमी करता येतील.

या उपविधींच्या मसुद्या मध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे व आवश्यकतेनुसार माफक प्रमाणात सांडपाण्याचे कमीत-कमी खर्चात पुर्नचक्रीकरण करणे व त्याचा पुर्नवापर करणे, सांडपाणी या संलग्नीत संज्ञा (Definition), प्रक्रिया केंद्र, गृहसमुह, औद्योगिक वसाहत, गृहनिर्माण सोसायट्या, छोट्या-छोट्या घरांची लोकवस्ती यांनी सांडपाण्याची चाचणी करणे, प्रक्रियाकेंद्र स्थापित करणे, प्रक्रिया केंद्राच्या बदलास आवश्यक नोटीस देणे, पुर्नचक्रीकरण केलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्यासाठी आणि हे पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळणार नाही या करीता इमारतीत स्वतंत्र प्लंबींग व्यवस्था असणे, पुर्नचक्रीत झालेले पाणी पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी वापरणे, पुर्नचक्रीत झालेल्या पाण्याचे मोजमाप करणे, ज्या संस्था पुर्नचक्रीकरण झालेल्या पाण्याचा वापर करतील अशा संस्थाना पिण्याचे पाणी व ड्रेनेज करावर सुट देणे इत्यादी बाबींचा समावेश करुन बृह्नमुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या उपविधीं प्रमाणे सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण करुन त्याचा पुर्नवापर करणे संबंधी (Draft Byelaws for Grey Water reuse in Housing and Commercial complexes in

Aurangabad City) उपविधींचा मसुदा तयार करण्यात आलेले आहे. करीता सदर मसुदा उपविधी मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाने नागरी क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर करण्याकरीता बृह्नमुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या उपविधींच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सांडपाण्याचे पुर्नचक्रीकरण करुन त्याचा पुर्नवापर करणे संबंधी (Draft Byelaws for Grey Water reuse in Housing and Commercial complexes in Aurangabad City) प्रास्तवित प्रारूप उपविधींस मंजूरी देण्यात येते. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी सदर उपविधी शासनास मंजूरीसाठी पाठविण्याची आवश्यकती वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक:-६८९**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-१ पोलिस चौकी वार्ड क्र.२४ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेसाठी रक्कम रुपये ३५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. या कामाची निविदा अ.प.दरापेक्षा १.५% कमी दराने मंजुर असुन काम प्रगतीपथावर आहे.

सदरील कामाच्या मुळ अंदाजपत्रकात २० मी.मी.जाडीचे प्रिमिक्स टिुमिनीअ्स कार्पेटची तरतुद आहे. परंतू प्रस्तावीत रस्त्यावरील वाहतुक लक्षात घेता या ठिकाणी २५ मी.मी. जाडीचे (Bitumen by Weight) सेमीडेन्स बिटुमिनीअ्स कार्पेट करणे आवश्यक आहे.या करीता रक्कम रु.१८,४३,२९८/- ची अतिरीक्त बाब प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच वार्ड क्र.२४ चे स.सदस्य तथा मा.सभापती स्थायी समिती यांनी या कामाअंतर्गत सिडको एन-१,सेक्टर-बी लगतच्या उर्वरीत खराब रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे सुचित केले आहे.

उपरोक्त नमुद नुसार २५ मी.मी.जाडीचे (५.२५% Bitumen by Weight) सेमीडेन्स बिटुमिनीअ्स कार्पेट टाकणेच्या कामाची रक्कम रु.१८,४३,२९८/- ची अतिरीक्त बाब आणि सिडको एन-१,सेक्टर-बी लगतच्या उर्वरीत खराब रस्त्याचे पुर्नडांबरीकण करण्याचा कामाचा समावेश असलेले सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.५४,९९,८००/- चे तयार करण्यात आले आहे. अतिरीक्त बाब व वाढीव काम यामुळे अंदाजपत्रकात रक्कम रु.१९,९९,८००/- ची वाढ होत आहे.

वाढीव काम तसेच अतिरीक्त बाबींचे काम निविदा दराने म्हणजेच अ.प.दरापेक्षा १.५ कमी दराने करण्यास मुळ गुत्तेदार मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी तयारी दर्शविली आहे. त्यामुळे मनपाचा आर्थिक फायदा होत आहे.

मनपा अर्थसंकल्प सन २०११-२०१२ पान क्र.जी.बी.आर.-वार्ड बी.-पान क्र.०१ शहरी भागात पुर्नडांबरीकरण करणे या लेखाशिर्षा अंतर्गत वार्ड क्र.२४ अंतर्गत पुर्नडांबरीकरण करणे करीता ठेवण्यात आलेल्या रक्कम रु.२०.०० लक्ष तरतुदीमधुन वाढीव खर्च प्रस्तावित केलेला आहे.

मुळ काम रक्कम रु.३५.००.०००/- + वाढीव काम रक्कम रु.१९,९९,८००/- अशी एकुण रक्कम रु.५४,९९,८००/- ची तरतुद सन २०१२-२०१३ च्या अर्थसंकल्पात करणेच्या आणि वाढीव काम व अतिरीक्त बाबींचे काम निविदा दर अ.प.दरापेक्षा १.५% कमी दराने मुळ गुत्तेदार

मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन्स यांचेकडुन करुन घेण्याच्या मान्यतेस्तव सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.५४,९९,८००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-१ पोलिसचौकी,वार्ड क्र.२४ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेसाठी तसेच प्रस्तावित रस्त्यावरील वाहतुक लक्षात घेता याठिकाणी २५ मी.मी. जाडीचे (५.२५% Bitumen by Weight) सेमीडेन्स बिटुमिनीअ्स कार्पेट टाकणे करीता रु.१८,४३,२९८/- ची आतिरीक्त बाब आणि सिडको एन-१,सेक्टर-बी लगतच्या उर्वरीत खराब रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यासाठी मुळ कामाची अ.प.रक्कम रु.३५,००,०००/- + वाढीचे काम रक्कम रु.१९,९९,८००/- अशी एकुण रक्कम रु.५४,९९,८००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच या कामासाठी आवश्यक आर्थिक तरतुद सन २०१२-२०१३ च्या आर्थिक संकल्पात करणे आणी वाढीव काम व अतिरीक्त बाबींचे काम निविदा दर अ.प.दरापेक्षा १.५% कमी दराने या कामाचे मुळ गुत्तेदार मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन्स यांचेकडुन करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६९०** **घनकचरा व्यवस्थापन कक्ष**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. घकव्य/१००६/प्रक्र७३/नवि.१६ दिनांक २६ ऑक्टोबर, २००६ नुसार नागरी घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत करावयाच्या उपाययोजनांबाबत जे निर्णय घेण्यात आले आहेत त्याची अंमलबजावणी करणे महापालिकेस बंधनकारक आहे. तसेच UIDSSMT या योजनेअंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या संस्थांना अनुदान प्राप्त करावयाचे असल्यास सुधारणा (Reforms) करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. महानगरपालिका व नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये सदरच्या सुधारणात्मक उपाययोजना स्वीकारण्यासाठी व राबविण्यासाठी आवश्यक तो करार (Memorandum of Agreement) करण्यात आलेला आहे. सदर सुधारणा करण्यास मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४०१ दिनांक १२.०२.२००९ नुसार मान्यता प्राप्त आहे. या अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाच्या दारोदारी कचरा गोळा करण्यासाठी शुल्क आकारण्याचे निर्देश दिले आहेत.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत करावयाच्या खर्चामध्ये महसुली व भांडवली खर्च मिळून रूपये २५ ते २७ कोटी खर्च होत आहे.

मालमत्ता करामध्ये सद्यस्थितीत निवासी मालमत्तांवर ३ टक्के व व्यावसायिक मालमत्तांवर १० टक्के साफसफाई कर करयोग्य मुल्यावर वसूल केला जातो. हा कर सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, रस्ता झाडणे, कचरा वाहतूक व त्याची विल्हेवाट या प्रित्यर्थ घेण्यात येतो. परंतु दारोदारी कचरा गोळा करण्यासाठी स्वतंत्रपणे कर लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सेवा शुल्क (युजर चार्जेस) आकारणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय निर्माण व्हावी यासाठी प्रथम कमीत कमी सेवा शुल्क (युजर चार्जेस) आकारणीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. अशा प्रकारचा सेवा शुल्क (युजर चार्जेस) देशात सिमला, डेहराडून, न्यू दिल्ली, पिंप्री चिंचवड या ठिकाणी सुरू असून तेथे यशस्वी अंमलबजावणी झालेली आहे.

युजर चार्जेसची आकारणी खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचा प्रकार/<br>व्यवसायाचा प्रकार | प्रस्तावित<br>प्रतिमहा दर<br>(रूपये) | युजर चार्जेस आकारणीचे<br>प्रस्तावित वार्षिक दर<br>(रूपये) |
|---|---|---|---|
| १ | निवासी मालमत्ता<br>(१) फ्लॅटस् व बंगले<br>(२) स्लमस् मधील मालमत्ता. | <br>१०/<br><br>५/- | <br>१२०/-<br><br>६०/- |
| २ | व्यावसायिक मालमत्ता<br>(१) हॉटेल्स्<br>अ) मोठे हॉटेल्स<br>ब) मध्यम हॉटेल्स<br>क) लहान हॉटेल्स<br>(२) मंगल कार्यालय, हॉल, थिएटर्स, लॉन्स्,<br>(३) मॉल्स इत्यादि<br>(४) आठवडी बाजार, भाजी मार्केट (ठेका देण्यात आलेले)<br>(५) सरकारी, निमसरकारी व खाजगी कार्यालये<br>(६) शाळा, महाविद्यालये<br>(७) हातगाड्या | <br><br>५००/-<br>३००/-<br>१००/-<br>५००/-<br><br>१०००/-<br>१०००/-<br><br>१००/-<br><br>५०/-<br>१००/- | <br><br>६०००/-<br>३६००/-<br>१२००/-<br>६०००/-<br><br>१२०००/-<br>१२०००/-<br><br>१२००/-<br><br>६००/-<br>१२००/- |
| ३ | दवाखाने | १००/- | १२००/- |
| ४ | पॅथॉलॉजी लॅब | २००/- | २४००/- |
| ५ | नर्सिंग होम<br>अ) ५० खाटांपर्यंत<br>ब) ५१ ते २०० खाटांपर्यंत<br>क) २०१ ते ५०० खाटांपर्यंत<br>ड) ५०१ ते पुढील | <br>१००/-<br>२००/-<br>३००/-<br>500/- | <br>१२००/-<br>२४००/-<br>३६००/-<br>६०००/- |
| ६ | औद्योगिक संस्था (Industries) | ३००/- | ३६००/- |
| ७ | इतर निवासेतर मालमत्ता<br>ब्युटी पार्लर, केश कर्तनालय, पान टपऱ्या, किराणा दुकान इत्यादि | ५००/- ते १०००/-<br>(आकारमाना नुसार) | ६००० ते १२००० /-<br>(आकारमानानुसार) |
| ८ | तात्पुरते उभारण्यात येणारे मेळावे, प्रदर्शन, खाद्यजत्रा, सार्वजनिक मंडळे, कत्तलखाने इत्यादि | ५००/-<br>प्रति दिवस | ---- |

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात मालमत्ता कराद्वारे वसूल होणाऱ्या साफसफाई कराची मागणी ही रूपये २.२९ कोटी असून उपरोक्त प्रस्तावितनुसार करामुळे अंदाजे २.५२ कोटी रूपये इतकी वसुली अपेक्षित असून एकत्रित वसुली ही ४.८१ कोटी होऊ शकेल.

सदर प्रस्तावित दराने वसूल झालेल्या रक्कमेमधून आवश्यकतेनुसार नागरिकांना घरोघरी ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी ०२ डस्टबीन्स खरेदी करून पुरविणे, घंटागाडी खरेदी करणे इत्यादि कार्यवाही करण्यात येईल.

ज्या व्यावसायिकांद्वारे कचरा निर्माण होऊन शहरात प्रदूषण निर्माण होऊन आरोग्यास धोका उत्पन्न झाल्यास किंवा धोका उत्पन्न होण्याची संभावना असल्यास व ज्यांचेकडून मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होईल त्या प्रमाणात युझर चार्जेस वसूल करण्याची मुभा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद यांना असावी.

दरवर्षी प्रस्तावित दरांमध्ये १० टक्के वाढ केल्यास खर्चाच्या प्रमाणात काही अंशी वसुली होऊ शकेल.

प्रस्तावित दराने आर्थिक वर्ष २०१२-१३ पासून सेवाशुल्क आकारणीसाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

संवाद :-

श्री.त्र्यंबक तुपे :- याबाबतीत एक समिती गठीत करावी.अभ्यास करुन पुढील बैठकीमध्ये हा विषय यावा

मा.महापौर :- हा विषय स्थगित करण्यात येतो.

ठराव :-

प्रस्तुत विषय स्थगित करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्रमांक:-६९१**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी २४० लिटर क्षमतेचे International Standard HDPE Bins (१०००नग)खरेदी करण्यासाठी तेरावा वित्त आयोग लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करुन देण्यास व प्रतिनग रु.४८००/- प्रमाणे एकुण रु.४८ लक्षच्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार बिन्स खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यातआल्या असता, प्राप्त पाच निविदांपैकी तीन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असल्यामुळे या तीन निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडण्यात आले आहे.

निविदेद्वारे प्राप्त दर पुढील प्रमाणे.......

| अ.क्र | एजन्सीचे नांव | बनावट | दर |
|---|---|---|---|
| १ | मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस. | ओटो | रु.४७७५/- प्रतिनग |
| २ | मे. क्रिश इंटरनॅशनल | प्लॅास्टीक ओम्नियम | रु.४७७५/- प्रतिनग |
| ३ | मे. न्यु साधना इंजि. वर्क्स | ओटो | रु.४८२५/- प्रतिनग |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी मे. तिरुपती इले.सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस व मे. क्रिश इंटरनॅशनल यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून सारख्याच किंमतीचे आहेत. या दोन्ही एजन्सीजना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता, दोन्ही एजन्सीजनी नमुद केलेल्या दरात रु.१०/- प्रतिनग कमी करुन रु.४७६५/- प्रतिनग प्रमाणे बिन्स पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे.

वाटाघाटी अंती प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.३५/- प्रतिनग कमी असल्याने व दोन्ही एजन्सीजनी नोंदविलेले दर समान असल्यामुळे मे. तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस व मे. क्रिश इंटरनॅशनल या दोन्ही एजन्सीज कडुन प्रत्येकी ५०० नग बिन्स खरेदी करणे योग्य होईल.

करीता २४० लि. क्षमतेचे International Standard HDPE Bins खरेदीसाठी निविदेद्वारे प्राप्त दर प्रतिनग रु.४७६७/-च्या मंजुरीस्तव व सदरील बिन्स मे. तिरुपती इले.सेल्स अ‍ॅन्ड सर्व्हीसेस व मे. क्रिश इंटरनॅशनल या दोन्ही एजन्सीजकडुन प्रत्येकी ७०० नग प्रमाणे खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव फेरसादर.

**संवाद :-**

| | |
|---|---|
| श्री.समीर राजूरकर | :मंजूर करावे परंतु वार्डाची भौगोलिक परीस्थिती विचारात घेवून वाटप करावे सर्व वार्डात देण्यात यावे |
| श्री.त्रिंबक तुपे | :नगरसेवक स्वेच्छानिधीतून खरेदी करीत असेल तर त्यांसही मंजूरी दयावी. |
| मा.महापौर | :बीन्स आकारा बाबत मा.आयुक्त व स.पदाधिकारी ठरवतील.<br>मंजूरी देण्यात येते. |

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापनाचे अंतर्गत कचरा संकलनाचे कामासाठी २४० लिटर क्षमतेच्या International Standard HDPE Bins खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स एंड सर्व्हीसेस व मे.क्रिश इंटरनॅशनल या दोन्ही एजन्सीज बरोबर झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार प्रती नग रु.४७६५/- या दराने मे.तिरुपती इलेक्ट्रीकल्स सेल्स एंड सर्व्हीसेस व मे.क्रिश इंटरनॅशनल कडुन प्रत्येकी ५०० नग प्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.:-६९२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ऑल इंडिया इन्स्टिट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट मार्फत घेण्यात येणाऱ्या एल.एस.जी.डी., एल.जी.एस. व फायनान्स मॅनेजमेंट कोर्स उत्तीर्ण होणाऱ्या मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे दिनांकापासून खालील प्रमाणे आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत शासन नियर्ण परिपत्रक क्र.टीआरएन/१०७२/१८९४० एन दिनांक १८.२.१९७५ तरतुद आहे.

१) एल.एस.जी.डी. आणि एल.जी.एस.उत्तीर्ण - तीन वेतन वाढी
२) एल.जी.एस. उत्तीर्ण - दोन वेतन वाढी
३) फायनान्स मॅनेजमेंट उत्तीर्ण - एक वेतन वाढी

शासनाने दिनांक १ जानेवारी २००६ पासून शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला असून महानगरपालिकेने देखील तिच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. लेखा परिक्षण विभागाने शासन निर्णय दि. २७.२.२००९ नूसार सहाव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयात उच्च शैक्षणिक अर्हतेस आगाऊ वेतन वाढी देणे बंद केले आहे असे अभिप्राय नोंदविले आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीमध्ये आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याचा उल्लेख/तरतुद नाही.परंतु पुणे व उल्हासनगर महानगरपालिकांमध्ये सहावा वेतन आयोग लागु झालेला असुन दोन्ही मनपामधील एल.एस.जी.डी व एल.जी.एस परिक्षा उत्तीर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार आगाऊ वेतनवाढी मंजुर केलेल्या आहेत. करिता याधर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचारी श्री श्रीराम नारायण फडे, यांनी अर्ज देऊन विनंती केली होती की, ते ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट पुणे येथुन एल.एस.जी.डी. (दोन वेतनवाढ) एल.जी.एस. (एक वेतनवाढ) परिक्षा उत्तीर्ण झाले आहे म्हणून त्यांना आगाऊ वेतन वाढ देण्या संदर्भाने आस्थापना समिती मध्ये

प्रस्ताव सादर करण्यात आला होता सदर प्रस्तावास समितीने असे निर्णय घेतले की, अगाऊ वेतन वाढी मंजुर करावयाच्या झाल्यास केवळ एकाच कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अगाऊ वेतनवाढी मंजुरी देणे उचित नाही. तथापि औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांनी जर ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांचा वरील पदवीका अभ्यासक्रम पास केला तर त्यांनाही अतिरीक्त शैक्षणिक पात्रता धारण केली म्हणुन आणि त्याचा फायदा महानगरपालिकेच्या कामकाजावर होईल असे अपेक्षीत धरुन अगाऊ वेतनवाढी मंजुर करता येवु शकतील.परंतु यासाठी सर्वसाधारण सभे समोर प्रशासकीय सविस्तर प्रस्ताव ठेवुण धोरणात्मक निर्णय घेणे योग्य असे आस्थापना समितीने शिफारस केली आहे.

करिता सहाव्या वेतन आयोगानूसार एल.एस.जी.डी., एल.जी.एस. व फायनान्स मॅनेजमेंट कोर्स औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण केल्यास, त्यांच्या अतिरिक्त शैक्षणिक पात्रतेमुळे त्याचा फायदा महानगरपालिकेस होऊ शकतो. त्यामुळे दिनांक १ जानेवारी २००६ नंतर सदर परिक्षा उत्तीर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे तारखेपासून वर नमूद केल्याप्रमाणे आगाऊ वेतनवाढी मंजूर करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**<u>संवाद:-</u>**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :मागील तारखेपासून मिळावे अशी मागणी केली आहे परंतु आता पासून पुढे दयावे. |
| श्री.संजय चौधरी | :१ जानेवारी २००६ ऐवजी १ जानेवारी २०१२ पासून मंजूर करावे. |
| श्री.त्रिंबक तुपे | :१ एप्रिल २०१२ पासून लागू करावे त्या अधिकारी कर्मचारी यांचेकडून चांगल्या प्रकारे काम करून घ्यावे. |
| मा.महापौर | :महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असल्याने नियमानुसार कार्यवाही करावी. |

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन नियर्ण परिपत्रक क्र.टीआरएन/१०७२/१८९४० एन दिनांक १८.२.१९७५ नुसार १) एल.एस.जी.डी. दोन वेतनवाढी आणि एल.जी.एस.उत्तीर्ण - एक वेतन वाढ असे एकुण तीन वेतनवाढी २) एल.जी.एस. उत्तीर्ण - दोन वेतन वाढी ३) फायनान्स मॅनेजमेंट उत्तीर्ण - एक वेतन वाढी देणे बाबत तरतुद असुन दिनांक १ जानेवारी २००६ नंतर सदर परिक्षा उत्तीर्ण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे तारखेपासून वर नमूद केल्याप्रमाणे आगाऊ वेतनवाढ नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक:-६९३</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेंवण्यात आलेली असुन खाली कामाऐवजी सुधारीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक:- मा.महापौर यांनी सन २०११-१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामे मध्ये वार्ड ब विकास इमारती शाळा व दवाखाने अ.क्र.०७ वार्ड क्र. ४८ अविष्कार कॉलनी अंतर्गत सभागृह बांधणे जीबीआर-वार्ड-बी-पेज-४ वर रक्कम रू.१०.०० लक्ष | वार्ड क्र. ४८ अंतर्गत साईनगर येथील खुल्या जागेत बास्केट बॉल ग्राऊंड बनविणे रू.१०.०० लक्ष |

| | |
|---|---|
| तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | |

सुचक : श्री.विरभद्र गादगे                                                       अनुमोदक :सौ. प्राजक्ता मंगेश भाले

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात खालील प्रस्तावित विकास कामाची तरतुद सुधारीत विकास कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षकः- मा.महापौर यांनी सन २०११-१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामे मध्ये वार्ड ब विकास इमारती शाळा व दवाखाने अ.क्र.०७ वार्ड क्र. ४८ अविष्कार कॉलनी अंतर्गत सभागृह बांधणे जीबीआर-वार्ड-बी-पेज-४ वर रक्कम रू.१०.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र. ४८ अंतर्गत साईनगर येथील खुल्या जागेत बास्केट बॉल ग्राऊंड बनविणे रू.१०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांकः-६९४**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४३०, दिनांक ०७/०९/२०११ (दि.१८/०८/२०११ची तहकुब सभा) अन्वये प्रभाग क्र.९५ पदमपुरा भागातील केसरसिंगपुरा येथील न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुल्या जागेवर मंगल कार्यालय व कमर्शिल कॉम्प्लेक्स बांधणे तसेच सदरील जागेवर तार कंपाऊंड करण्यात मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुली जागा ही प्रभाग क्र.६३ कोकणवाडी (केसरसिंगपुरा )या प्रभागात मोडत असल्याने मंजुर  झालेला ठराव हा कृपया निष्काशित करावा. आजच्या बाजारभावाप्रमाणे सदर जागेची किमंत ही अंदाजे र.रू.५.०० कोटी आहे. संपुर्ण जागा हि व्यावसायिक स्वरूपाची असून त्याठिकाणी महानगरपालिकेने या कामासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करावी अथवा सदरील ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर त्याठिकाणी मंगल कार्यालय अथवा कमर्शिल कॉम्प्लेक्स बांधावे .करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.विजय वाघचौरे

अनुमोदक : श्री.गिरजाराम हळनोर,श्री.गजानन बारवाल,श्रीमती. सुनिता बरथुने,
श्री.विरभद्र गादगे,श्री.बन्सी ग्यानु जाधव

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४३०,दिनांक ०७/०९/२०११ (दि.१८/०८/२०११ची तहकुब सभा) अन्वये प्रभाग क्र.९५ पदमपुरा भागातील केसरसिंगपुरा येथील न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुल्या जागेवर मंगल कार्यालय व कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधणे तसेच सदरील जागेवर तार कंपाऊंड करण्यात मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापी न.भु.क्र.१८२३५/१ संत तुकाराम वस्तीगृहा जवळील खुली जागा ही प्रभाग क्र.६३ कोकणवाडी (केसरसिंगपुरा)या प्रभागात मोडत असल्याने मंजुर झालेला ठराव हा कृपया निष्काशित करणे. संपुर्ण जागा हि व्यावसायिक स्वरूपाची असून त्याठिकाणी

महानगरपालिकेने या कामासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करावी अथवा सदरील ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर त्याठिकाणी मंगल कार्यालय अथवा कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक:-६९५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६३ कोकणवाडी येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधरीत कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक : मा.महापौर यांनी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामा मध्ये वार्ड ड नवीन खडी रस्ते (शहरीभाग ) अ.क्र. ०१ वार्ड क्र.६३ कोकणवाडी क्रांतीनगर पुलाचे काम करणे जीबीआर-वार्ड-डी-पेज-२ वर रक्कम रू.०६. ०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.६३ कोकणवाडी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रू.०६.०० लक्ष |

सुचक :श्री.विजय वाघचौरे,श्री.विरभद्र गादगे अनुमोदक :श्री.बन्सी ग्यानु जाधव, श्रीमती.प्राजक्ता मंगेश भाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.६३ कोकणवाडी येथील विकास कामासाठी सन २०११-२०१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील प्रमाणे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक : मा.महापौर यांनी सन २०११-२०१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामा मध्ये वार्ड ड नवीन खडी रस्ते (शहरीभाग ) अ.क्र. ०१ वार्ड क्र.्६३ कोकणवाडी क्रांतीनगर पुलाचे काम करणे जीबीआर-वार्ड-डी-पेज-२ वर रक्कम रू.०६.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | वार्ड क्र.६३ कोकणवाडी अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे रू.०६.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६९६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६६ अंतर्गत विकास कामासाठी सन.२०११-१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड कार्यालय -फ अंतर्गत सन २०११-१२ करिता कामांची यादी मध्ये लेखाशिर्षक नवीन डांबरी रस्ते शहरी भाग अ.क्र.०२ वार्ड क्र.६६ येथील भागात डांबरीकरण व | १.वार्ड क्र.६६ अंतर्गत शिवशंकर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू.०५.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.६६ अंतर्गत बालाजी नगर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू.०५.०० लक्ष |

| | |
|---|---|
| मजबुतीकरण करणे वार्ड -फ-न्यु वर्क पान क्र.६७ वर रक्कम रू.२० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | ३. वार्ड क्र.६६ अंतर्गत विविध ठिकाणीच्या ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू. ०५.०० लक्ष<br>४. वार्ड क्र. ६६ अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये मार्गदर्शक दिशादर्शक नामफलक लावणे .रक्कम रू. ०५.०० लक्ष |

सुचक :श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक :श्री.गिरजाराम हाळनोर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६६ अंतर्गत विकास कामासाठी सन.२०११-१२ या अर्थसंकल्पात खालील कामाची ठेवण्यात आलेली तरतुद प्रस्तावात नमुद सुधारित कामासाठी ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| वार्ड कार्यालय -फ अंतर्गत सन २०११-१२ करिता कामांची यादी मध्ये लेखाशिर्षक नवीन डांबरी रस्ते शहरी भाग अ.क्र.०२ वार्ड क्र.६६ येथील भागात डांबरीकरण व मजबुतीकरण करणे वार्ड-फ-न्यु वर्क पान क्र.६७ वर रक्कम रू.२० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे. | १.वार्ड क्र.६६ अंतर्गत शिवशंकर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू.०५.०० लक्ष<br>२.वार्ड क्र.६६ अंतर्गत बालाजी नगर येथे ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू.०५.०० लक्ष<br>३.वार्ड क्र.६६ अंतर्गत विविध ठिकाणीच्या ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रक्कम रू. ०५.०० लक्ष<br>४. वार्ड क्र.६६ अंतर्गत विविध गल्ल्यामध्ये मार्गदर्शक दिशादर्शक नामफलक लावणे. रक्कम रू. ०५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:- ६९७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील विकास कामासाठी सन.२०११-१२ या अर्थसंकल्पात तरतुद ठेवण्यात आलेली असुन खालील कामाऐवजी सुधारित कामासाठी तरतुद ठेवण्यात येवुन कामा हाती घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक : मा.महापौर यांनी सन २०११-१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामे मध्ये वार्ड ब नविन पथदिवे बसविणे पोलसहीत.<br>१. जीबीआर-वार्ड -बी-पेज-३ अ.क्र.०९ वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनीछत्रपती शिवाजी पुतळयाजवळ हायमस्ट बसविणे. रक्कम रू. ५.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.<br>२. जीबीआर-वार्ड -बी-पेज-३ अ.क्र.१० वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी साईनगर येथे ऊर्जा बचत पथदिवे लावणे ०५.०० लक्ष तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. | १. वार्ड क्र.४८ अविष्कार चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ हायमस्ट बसविणे .रू.०७.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथे ऊर्जा बचत दिवे बसविणे .०३.०० लक्ष. |

सुचक : श्री.विरभद्र गादगे अनुमोदक : सौ.प्राजक्ता मंगेश भाले , श्री.हुशारसिंग चव्हाण

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथील विकास कामासाठी अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| प्रस्तावित विकास काम | सुधारित विकास काम |
|---|---|
| लेखाशिर्षक : मा.महापौर यांनी सन २०११-१२ अर्थसंकल्पामध्ये सुचविलेली अत्यावश्यक कामे मध्ये वार्ड ब नविन पथदिवे बसविणे पोलसहीत.<br>१. जीबीआर-वार्ड -बी-पेज-३ अ.क्र.०९ वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी छत्रपती शिवाजी पुतळयाजवळ हायमस्ट बसविणे. रक्कम रू. ५.०० लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.<br>२. जीबीआर-वार्ड -बी-पेज-३ अ.क्र.१० वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी साईनगर येथे ऊर्जा बचत पथदिवे लावणे ०५.०० लक्ष तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. | १. वार्ड क्र.४८ अविष्कार चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ हायमस्ट बसविणे .रू.०७.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी येथे ऊर्जा बचत दिवे बसविणे .०३.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-६९८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८८ अंतर्गत एकता चौक ते बीड बायपास या रोड रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणासाठी सन २०११-१२ च्या अर्थ संकल्पात जी बी आर वार्ड फ पान २ वर नविन खडी रस्त्यामध्ये अ.क्र.४ मध्ये रक्कम रू.१७ लक्ष तरतुद करण्यात आले आहे त्या ऐवजी प्रभाग क्र.८८ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे व खडीकरण करणे यासाठी खर्च करण्यात यावी करिता लेखाशिर्षक बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

सूचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : श्री. बालाजी मुंडे , श्री.बबन नरवडे

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८८ अंतर्गत एकता चौक ते बीड बायपास या रोड रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणासाठी सन २०११-१२ च्या अर्थ संकल्पात जी बी आर वार्ड फ पान २ वर नविन खडी रस्त्यामध्ये अ.क्र.४ मध्ये रक्कम रू.१७ लक्ष तरतुद करण्यात आले आहे त्या ऐवजी प्रभाग क्र.८८ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे व खडीकरण करणे यासाठी लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक:-६९९**

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विकास योजनेमध्ये मंजुर विकास योजने प्रमाणे रस्त्याचे रूंदी विचारात घेऊन भूसंपादनाचे काम मोठया प्रमाणावर करण्यात येत आहे. महानगरपालिके मार्फत करण्यात आलेल्या या कामापैकींच मकईगेट ते जयसिंगपुरा या ३०.००मीटर (१०० फुट ) रूंद विकास योजनेचा रस्त्याचा समावेश आहे. या रस्त्याचे विकास योजना पाहणी केली असता या रस्त्यामुळे एकाच बाजुने बहुताश नागरिकांचे मिळकती बाधित होत आहेत. तसेच नागरिकांच्या मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. या वास्तुस्थितीचे प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता यामध्ये नागरिकांचे मोठया प्रमाणावर होणारे नुकसान व स्थलांतर पाहता प्रत्यक्ष जागेवर उपलब्ध असलेल्या दोन्ही बांजुच्या मिळकती विचारात घेऊन रूग्णालयाच्या दिशेने रोड काढल्यामुळे शासनाचा व नागरिकांचा दोघांचा फायदा होणार आहे. काही वर्षापुर्वी घाटीतील नागरिंकांचे पुर्नवसन करण्यात आले होते घाटीच्या जागेवर आता पून्हा त्यांना त्या जागेवरील हटविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच शासनाच्या नियमाप्रमाणे नागरिकांच्या जागा वगळून जर शासनाची जागा रोडसाठी जात असेल तर तेथूनच रोड काढावे असे नियम आहे. तसेच सरळ रोड काढण्यामूळे कुतुबपूरा ,जयसिंगपुरा ,विद्यापीठ

,बेगमपुरा तसेच शालेय विद्यार्थी यांना याचा फायदा होणार आहे. करिता रूग्णालयाच्या दिशेने पुन्हा आखणी करावी.रस्ता ३०.०० मीटर रूंदच असावा या बाबत आक्षेप नाही.

तरी या विकास योजना ३०.०० मीटर रूंद रस्त्याचे आखणी बदलून रूग्णालयाच्या दिशेने ज्यामुळे नागरिकांची विशेषत: अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना ज्यांनी त्यांची जागा यापूर्वी घाटी दवाखान्यासाठी दिली आहे. त्यांना या जागेवर स्थलांतरीत केले आहे .त्यांची जास्त नुकसान होणार नाही.तसेच नागरिकांना देण्यात येणार मोबदला वाचेल. तरी प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मकाई गेट ते जयसिंगपुरा या ३०.०० मीटर रूंद रस्त्याचे आखणी बदलण्याची मान्यता व्हावी.

सुचक : श्री. अशोक किशनराव बेहडे                    अनुमोदक : श्री.अफसर खान यासीन खान

**संवाद:-**

श्री.त्रिंबक तुपे          :जो डीपी प्लॅन,आराखडा तयार आहे त्याप्रमाणे नियमानुसार तो रस्ता व्हावा.

मा.महापौर               :नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मकईगेट ते जयसिंगपुरा या ३०.००मीटर (१०० फुट) रूंद विकास योजनेचा रस्त्याचा समावेश असुन या रस्त्याचे विकास योजना पाहणी केली असता या रस्त्यामुळे एकाच बाजुने बहुताश नागरिकांचे मिळकती बाधित होत असल्याने नागरिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होते.प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता यामध्ये नागरिकांचे मोठया प्रमाणावर होणारे नुकसान व स्थलांतर पाहता प्रत्यक्ष जागेवर उपलब्ध असलेल्या दोन्ही बांजुच्या मिळकती विचारात घेऊन रूग्णालयाच्या दिशेने रोड काढल्यामुळे शासनाचा व नागरिकांचा दोघांचा फायदा होणार असल्याने रूग्णालयाच्या दिशेने पुन्हा आखणी करुन बदल करण्या करीता प्रशासनाने नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक:-७००**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.१ हर्सुल अंतर्गत फुलेनगर ,चेतनानगर,वाघुले गल्ली ५० % भाग हा दलीत वस्ती आहे. सदरील भागात मुलभुत सुविधा पुरविण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामासाठी विविध ठिकाणी खडीकरण,अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे अत्यावश्यक असल्याने या कामासाठी रक्कम रू.३०.०० लक्षाची तरतुद ठेवण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बन्सी ग्यानु जाधव                              अनुमोदक : श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ हर्सुल अंतर्गत फुलेनगर,चेतनानगर,वाघुले गल्ली ५० % भाग हा दलीत वस्ती आहे.सदरील भागात मुलभुत सुविधा पुरविण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामासाठी विविध ठिकाणी खडीकरण,अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करण्यासाठी रक्कम रू.३०.०० लक्षाची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ७०१:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका वार्ड क्रं.३२ मधील रहिवासी माजी मंत्री स्व.अब्दुल अजीम (माजी मंत्री महाराष्ट्र राज्य) हे औरंगाबाद नगरपालिकेचे १९६२ मध्ये प्रथम नगरसेवक म्हणुन निवडुण आले होते,तसेच १९७२ मध्ये ते मराठवाडा वक्फ बोर्डाचे अध्यक्ष झाले त्यावेळी त्यांनी शहरातील शैक्षणिक परिस्थीती  पाहून गरीब झोपड पट्टी व

शहरवासियांसाठी शाळा सुरू केलेल्या होत्या ते शाळा आजपर्यत चालु आहे.तसेच १९७७ व १९८० मध्ये विधानसभेवर निवडुण आलेले होते त्यांच्या कार्याची शहराला आठवण राहावी म्हणुन वार्ड क्रं.३२ मधील खालील रस्त्यास व टी-पॉईन्टसला स्व.अब्दुल अजीम (माजी मंत्री महाराष्ट्र राज्य) यांचे नांव देण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

औरंगापुरा भाजी मंडी टकेरा कब्रस्तान ते नेहरू भवन पर्यत व स्व.अब्दुल अजीम यांच्या बुढीलाईन येथीन जुन्या घरापासुन ते मनपा मुख्य कार्यालयापर्यत या रस्त्यास स्व.अब्दुल अजीम मार्ग असे नांव देण्यांत यावे तसेच स्व.अब्दुल अजीम यांच्या जुन्या घरासमोरील टी-पॉईन्टसला ही अब्दुल अजीम टी पॉईन्टस असे नांव देण्यात प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

सुचक :श्री. मिर्झा सलीम बेग ,श्री.अफसर खान यासीन खान  श्री.मिलिंद दाभाडे

अनुमोदक :डॉ.खान जफर अहमद ,श्री.शेख अब्दुल असद ,श्री. मो.मुजीबोद्दीन,
श्री.अशोक किसनराव बेहडे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रं.३२ मधील औरंगापुरा भाजी मंडी टकेरा कब्रस्तान ते नेहरू भवन पर्यत व स्व.अब्दुल अजीम यांच्या बुढीलाईन येथीन जुन्या घरापासुन ते मनपा मुख्य कार्यालयापर्यत च्या रस्त्यास स्व.अब्दुल अजीम मार्ग असे नांव देण्यांस तसेच स्व.अब्दुल अजीम यांच्या जुन्या घरासमोरील टी-पॉईन्टसला ही अब्दुल अजीम टी पॉईन्टस असे नांव देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक:-७०२</u>**

उपरोक्त विषयी आपणास विनंती करण्यात येते की, अगामी सर्व साधारण सभेत सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जीबीआर वार्ड फ पान क्र.०१ वरील अनुक्रमांक ०६ वर सेव्हन हिल परिसरातील रस्त्याच्या पुर्न:डांबरी करण करण्यासाठी र.रू.२५ लक्ष | १. प्रभाग क्र.५० अंतर्गत शिवशक्ती र.रू.२० लक्ष. |
| ०२ | सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जीबीआर वार्ड फ पान क्र ०१ वरील अनुक्रमांक ०१ वर सुराणानगर येथे रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करण्यासठी र.रू.१०.०० लक्ष | प्रभाग क्र.५० मध्ये व्यंकटेशनगर मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरणासाठी र.रू.१५.०० लक्ष |

सुचक: सौ.कमल रामचंद्र नरोटे		अनुमोदक : श्री. नारायण कुचे

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जीबीआर | १. प्रभाग क्र.५० अंतर्गत |

| | | |
|---|---|---|
| | वार्ड फ पान क्र.०१ वरील अनुक्रमांक ०६ वर सेव्हन हिल परिसरातील रस्त्याच्या पुर्न:डांबरीकरण करण्यासाठी र.रू.२५ लक्ष | शिवशक्ती र.रू.२० लक्ष. |
| ०२ | सन २०११-२०१२ च्या अर्थ संकल्पात जीबीआर वार्ड फ पान क्र ०१ वरील अनुक्रमांक ०१ वर सुराणानगर येथे रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करण्यासठी र.रू.१०.०० लक्ष | प्रभाग क्र.५० मध्ये व्यंकटेशनगर मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरणासाठी र.रू.१५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७०३**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, श्री योगेश मोहनदास वैष्णव भाकरवाडी ता. बदनापुर जि.जालना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणुन कार्यरत आहे.तसेच ते एन टी-ब या संवर्गात येतात. त्यांची पत्नी सौ.हेमा राधेशामदास वैष्णव हया महानगरपालिका प्राथमिक शाळा,मुंकदवाडी येथे शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत.त्यांनी पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत महानगरपालिकेस दि.१८/०५/२०११ रोजी अर्ज सादर केलेला आहे. त्यांच्या पत्नी औरंगाबाद येथील रहिवाशी असुन त्यांच्या मुलांचे शिक्षण व वृध्द व आजारी आई - वडीलांचे संगोपनासाठी पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत शासनाच्या निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षक म्हणुन समावुन घेण्याकरिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक :- श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री योगेश मोहनदास वैष्णव भाकरवाडी ता. बदनापुर जि.जालना येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणुन कार्यरत असुन ते एन टी-ब या संवर्गात येतात. त्यांची पत्नी सौ.हेमा राधेशामदास वैष्णव हया महानगरपालिका प्राथमिक शाळा,मुंकदवाडी येथे शिक्षक म्हणुन कार्यरत असुन त्या औरंगाबाद येथील रहीवाशी असुन मुलांचे शिक्षण व वृध्द आजारी आई वडीलांचे संगोपनासाठी पती-पत्नी एकत्रिकरण शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षक म्हणुन नियमानुसार समावुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७०४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या दिनांक १५.११.२०११ रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय सभेत कत्तलखाना फिस रूपये १० वरून रूपये ०५ करण्याबाबत निर्णय घेण्यात अलेला होता. तरी कत्तलखाना फिस रूपये ०५ करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रशासनाने तातडीने करावी .करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर करण्यात येतो.

सुचक :- श्री.गजानन बारवाल अनुमोदक :-श्री.बन्सी ग्यानु जाधव,
श्रीमती सुनिता भारत बरथुने

**संवाद :**

श्री. संजय चौधरी : १३ वर्षानंतर १० रू फिस करण्यात आली होती महागाई वाढलेली आहे बोकड कत्तल केल्यानंतर त्यांची कातडी किमान १०००/- पर्यत विक्री होते असे असतांना १०/- रू ऐवजी ५ रू का करीत आहोत.

श्री. गजानन बारवाल :यात दुरूस्ती करायची आहे परवाना नुतनीकरण फिस १००रू ऐवजी ५०० रू करायचे सांगितले कत्तलखाना फिस १० ऐवजी ५ रू करायचे आहे यामूळे नुकसान काही होणार नाही यापुर्वीच बजेटमध्ये मंजूर केलेले आहे त्याची अमलबजावणी करण्यासाठी हा प्रस्ताव ठेवला मंजूर करावे अमलबजावणी करण्यासाठी आदेशित करावे.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो प्रशासनाने ताबडतोब अमलबजावणी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या दिनांक१५.११.२०११रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय सभेत ठरविल्याप्रमाणे कत्तलखाना फिस रूपये १० वरून रूपये ०५ करण्यास मंजुरी देण्यात येते.तसेच त्याप्रमाणे प्रशासनाने तातडीने अमंलबजावणी करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७०५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथील विश्वरूप हॉल जवळील चौकाचे नामकरण करणे बाबत स्थानिक नागरीक वारंवार मागणी करीत आहेत. त्यानुसार नागरीकांनी सुचविल्या प्रमाणे श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे चौक असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

सुचक :- श्री.गिरजाराम हाळनोर, श्री.विरभद्र गादगे

अनुमोदक:- सौ.प्राजक्ता मंगेश भाले, श्री.गोपाळ कुलकर्णी, श्री.ज्ञानेश्वर जाधव, सौ.पुष्पा देविदास सलामपुरे

श्री.गिरजाराम हळनोर :यात श्रीमंत बाळाजी विश्वनाथ उर्फ थ्रोरले बाजीराव पेशवे असे नामकरण करावे.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथील विश्वरूप हॉल जवळील चौकास श्रीमंत बाळाजी विश्वनाथ उर्फ थ्रोरले बाजीराव पेशवे असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७०६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-३, सिडको, वार्ड क्रमांक ७२ मधील अजयदिप कॉम्प्लेक्स च्या शेजारी व एन-३ स्केटींग ग्राऊंड च्या समोरील महापालिकेच्या मैदानावर गेले कित्येक वर्षे सार्वजनिक नवरात्र महोत्सव साजरा केला जातो. त्यामुळे आपणास विनंती की, या पारंपारिक सणानिमित्ताने या मैदानास (गरबा मैदान) हे नाव देण्यात यावे.

सुचक :-श्री.प्रमोद प्र.राठोड अनुमोदक :- श्री.मिर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-३, सिडको,वार्ड क्रमांक ७२ मधील अजयदिप कॉम्प्लेक्स च्या शेजारी व एन-३ स्केटींग ग्राऊंड च्या समोरील महापालिकेच्या मैदानास (गरबा मैदान) हे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७०७**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ इंदिरानगर येथील दिनांक २५.०२.२०१२ रोजी दूपारी २ वाजता आकाश प्रल्हाद मोरे हा मुलगा पोहण्यासाठी गेला असता त्यात त्याचा हर्सुल तलावात बुडून मृत्यु झाला. तरी त्याच्या आईस आर्थिक मदत करावी ही विनंती.

सुचक :श्री.प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : श्री.काशीनाथ कोकाटे

मा.महापौर :प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक ८६ इंदिरानगर येथील आकाश प्रल्हाद मोरे हा मुलगा पोहण्यासाठी गेला असता त्यात त्याचा हर्सुल तलावात बुडून मृत्यु झाल्याने त्याच्या आईस नियमानुसार आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७०८**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हिरा फॅन्सी गुलमंडी ते पिपल्स कॉ.बँक दलालवाडी पर्यंतच्या रस्त्यास श्रेष्ठ समाजसेवक स्वातंत्र्यसेनानी कै.पाडुरंग उर्फ दादासाहेब गणोरकर मार्ग असे नामकरण करण्यात यावे.

सुचक:-सौ.हेमलता मुगदिया अनुमोदक :-श्री.मिर हिदायत अली

**संवाद :-**

श्री.त्रिंबक तुपे :त्या ठिकाणी अगोदर नामकरण केलेले आहेत का याचाही विचार व्हावा तसेच त्या वार्डाचे स.सदस्य यांचे यात सुचक व अनुमोदक म्हणून नाव असावे त्यांनाही विश्वासात घेतले पाहिजे.

मा.महापौर :हया प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिरा फॅन्सी गुलमंडी ते पिपल्स कॉ.बँक दलालवाडी पर्यंतच्या रस्त्यास श्रेष्ठ समाजसेवक स्वातंत्र्यसेनानी कै.पाडुरंग उर्फ दादासाहेब गणोरकर मार्ग असे नामकरण करण्यास व प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७०९**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नासगल्ली गेटपासून मन्नालाल अग्रवाल यांचे मंगल कार्यालया पर्यंत ज्योतिर्विद थोर स्वातंत्र्य सैनिक कै.कृष्णकुमार शंकरराव सरोदे मार्ग असे नामकरण करण्यात यावे.

सुचक:-सौ.हेमलता मुगदिया अनुमोदक :-श्री.मिर हिदायत अली

मा.महापौर : हया प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नासगल्ली गेटपासून मन्नालाल अग्रवाल यांचे मंगल कार्यालया पर्यंत ज्योतिर्विद थोर स्वातंत्र्य सैनिक कै.कृष्णकुमार शंकरराव सरोदे मार्ग असे नामकरण करण्यास व प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७१०**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मछलीखडक येथील फॅन्सी सेंटर चौकाला थोर समाजसेवक व जैन समाजाचे जेष्ठ नेते कै.सेठ सुमेरमल सुराना चौक असे नामकरण करण्यात यावे.

सुचक:-सौ.हेमलता मुगदिया अनुमोदक :-श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

श्री.जगदिश सिध्द: असे प्रस्ताव देताना संबंधित वार्डाचे नगरसेवक यानां विश्वासात घेऊन त्यांच्या लेटर पॅड वर प्रस्ताव घेण्यात यावे.

मा.महापौर : असे प्रस्ताव देताना संबंधित वार्डाचे नगरसेवक यानां विश्वासात घेऊन त्यांच्या लेटर पॅड वर प्रस्ताव देण्यात यावे हया प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ करावे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मछलीखडक येथील फॅन्सी सेंटर चौकाला थोर समाजसेवक व जैन समाजाचे जेष्ठ नेते कै.सेठ सुमेरमल सुराना चौक असे नामकरण करण्यास व प्रस्तावात सुचक म्हणून श्रीमती.प्रिती तोतला व अनुमोदक म्हणून जगदिश सिध्द यांचे नाव समाविष्ठ करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७११**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५५ मधील मिनारा कब्रस्तान मधील मिनारा कब्रस्तान मधील (खुल्या जागेत) (अंत्यविधी पूर्वीची प्रार्थना) करण्यासाठी एकत्र येवुन लोकांना जमा व्हावे लागते. त्यासाठी कब्रस्तानमध्ये हॉलची आवश्यकता असते. त्यामुळे कब्रस्तानमध्ये हॉल बांधणे आवश्यक आहे सध्या कब्रस्तानमध्ये हॉल नसल्याने सन २०१२-१३च्या जीबीआर वार्ड क्रं. स्पील पान नं.५१ वार्ड क्र.५५ नागसेन कॉलनी, रेखांकनातील खुली जागा विकसित करणे विकास योजना अंतर्गत अ.क्र.१ वरील रक्कम ५.०० लक्षची तरतुद वरील ठिकाणी हॉल बांधण्यासाठी वळती करून हॉल बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

सुचक:-श्री.शाहनवाज खान अनुमोदक:-डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५५ मधील मिनारा कब्रस्तान मधील मिनारा कब्रस्तान मधील (खुल्या जागेत) (अंत्यविधी पूर्वीची प्रार्थना) करण्यासाठी सन २०१२-१३च्या जीबीआर वार्ड क्रं. स्पील पान नं.५१ नागसेन कॉलनी, रेखांकनातील खुली जागा विकसित करणे व विकास योजना अंतर्गत अ.क्र.१ वरील रक्कम ५.०० लक्षची तरतुद करून सदर ठिकाणी हॉल बांधण्यासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७१२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्रमांक ५५ मधील गंजेशहीदा कब्रस्तान समोरील गंजेशहीदा मस्जीद परिसरातील उत्तरे कडील भागात (खुल्या जागेत) परिसरातील नागरीकांचे मृत्यु झाल्यास त्यांच्या दफनविधी कार्यक्रमापुर्वी नमाजे जनाजा (अत्यंविधी पुर्वीची प्रार्थना) होत असते यासाठी बहुसंख्येने नागरीक जाम होवुन प्रार्थना करीत असतात. तेथील नागरीकांना अत्यंविधीच्या प्रार्थनेपुर्वी वजु करणे आवश्यक असते. यासाठी तेथे स्वच्छतागृहाची आवश्यकता असते परंतु या परिसरात स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने अर्थसंकल्प सन २०११-२०१२ च्या

जीबीआर वॉर्ड क्र. पान क्रं.३ स्मशानभुमी विकास कार्यक्रम अ.क्र.२ वरील रक्कम रूपये १०.००लक्षची तरतुद वरील ठिकाणी स्वच्छतागृह उभारणे करीता वळती करून स्वच्छतागृह उभारणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

सुचकः-श्री.शाहनवाज खान अनुमोदकः-डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रमांक ५५ मधील गंजेशहीदा कब्रस्तान समोरील गंजेशहीदा मस्जीद परिसरातील उत्तरे कडील भागात (खुल्या जागेत) नागरीकांना अत्यंविधीच्या प्रार्थनेपुर्वी वजु करण्यासाठी अर्थसंकल्प सन २०११-२०१२ च्या जीबीआर वॉर्ड क्र. पान क्रं.३ स्मशानभुमी विकास कार्यक्रम अ.क्र.२ वरील रक्कम रूपये १०.००लक्षची तरतुद वरील ठिकाणी स्वच्छतागृह उभारणे करीता वळती करण्यास मंजुरी करण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांकः-७१३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्डात बायजीपुरा येथे इस्तियाक भाई यांच्या घरात भाडयाने फोमच्या कारखाना होता. सदरील फोमच्या कारखान्यात आग लागल्याची घटना झाली ही दुःखद घटनेमध्ये पती-पत्नी दोन लोकांचा मृत्यु झाला. त्यांचे ७ मुले-मुली आगीत गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या औषधोपचारासाठी व मृत्यु झालेल्या २ लोकांच्या वारसदारांना नियमानुसार योग्य ती आर्थीक मदत देण्याचे व घटनास्थळी अग्निशामक विभागाची यंत्रणा उशिरा पोहोचली याबाबत चौकशी करण्यात यावी असे महापौरांनी दिनांक १५.११.२०११ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये आदेश दिले होते. त्यांना आजपर्यंत आर्थिक मदत न मिळाल्याने येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये विशेष बाब म्हणुन मृत्यु झालेल्यांना प्रत्येकी १ लाख रूपये व जखमींना रूपये ५०,०००/-रूपयेची आर्थिक मदत करण्याच्या ठराव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

सुचकः-श्री.शाहनवाज खान अनुमोदकः-डॉ.खान जफर अहेमद

श्री.त्रिंबक तुपे :महापालिकेच्या नियमानुसार जी मदत देता येईल ती दयावी.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे.व सभागृहातील चर्चेनुसार बायजीपुरा येथे फोमच्या कारखान्यात आग लागून त्या घटनेमध्ये मृत्यु झालेल्या २ व्यक्ती(पती-पत्नी) यांना प्रत्येकी १ लाख रूपये प्रमाणे त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना व जखमींना रूपये ५०,०००/-ची नियमानुसार आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांकः-७१४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.नं.२२३ मधील ३० गुंठे जमिन विकास योजना रस्ता २४.०० मिटर रूंदितील जागा संपादन करून संबधीतास मोबदला देणे संदर्भाने मा.न्यायालय यांनी आदेश दिले आहे. रस्ता विकास योजना अंतर्गत एकुण ३० गुंठे जमीन बाधीत होत असल्याने सदरील जागा महानगरपालिकेने हस्तांतर करण्यासाठी मागील सर्वसाधारण सभेत मोबदल्यासाठी प्रशासनातर्फे ठराव घेण्यात आला होता. परंतु रक्कमे अभावी ठराव तुर्त स्थगीत ठेवण्यात आला आहे. परंतु संबंधित ३० गुंठे जमिन २४ मीटर रस्त्याच्या मध्यभागी अविकसीत राहीलेला आहे. त्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. तरी संबधीतास जागेचा मोबदला T.D.R. स्वरूपामध्ये देण्याचा ठराव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचकः-श्री.बन्सी ग्यानु जाधव अनुमोदकः-सौ.प्राजक्ता मंगेश भाले

**संवाद :-**

श्री.समीर राजूरकर :टीडीआरचा हा विषय आहे प्रशासनाने पुर्ण प्रोसेस करून प्रशासनाकडून यायला पाहिजे.

मा.महापौर :या बाबतीत नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यात यावा

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,स.नं.२२३ मधील ३० गुंठे जमिन विकास योजना रस्ता २४.०० मिटर रूंदितील जागा संपादन करून संबधीतास मोबदला देणे संदर्भाने मा.न्यायालय यांनी आदेश दिले.रस्ता विकास योजना अंतर्गत एकुण ३० गुंठे जमीन बाधीत होत असल्याने सदरील जागा महानगरपालिकेने हस्तांतर करण्यासाठी मागील सर्वसाधारण सभेत मोबदल्यासाठी प्रशासनातर्फे ठराव घेण्यात आला. परंतु रक्कमे अभावी ठराव तुर्त स्थगीत ठेवला होता. संबंधित ३० गुंठे जमिन २४ मीटर रस्त्याच्या मध्यभागी अविकसीत राहीलेली असल्याने तरी संबधीतास जागेचा मोबदला T.D.R. स्वरूपामध्ये देण्याकरीता या बाबतीत नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७१५**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, गुंठेवारी अधिनियम २००१ नुसार शहरातील अनेक वसाहतींना अद्यापही नियमीत करण्याची कार्यवाही पुर्ण झालेली नाही. हर्सुल भागातील ब-याच वसाहती विकसीत झालेल्या असुन गुंठेवारी कायद्यातंर्गत नियमित केल्यास महानगरपालिकेस देखील त्यातुन शुल्क प्राप्त होईल शिवाय वसाहतींचा विकास करणे शक्य होईल. हर्सुल येथील सर्वे नं.१५, ४९,१५२, १५४ भाग १५५ भाग १५६, १५७ भाग १५८ भाग १८५ भाग २१८, २१९, २२२, २१२/१, २४०/१ भाग या मध्ये २००१ पुर्वी विकास झालेला आहे.

तरी या सर्व वसाहतीत गुंठेवारी कायद्यातंर्गत नियमीत करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.बन्सी ग्यानु जाधव अनुमोदक : सौ.सविता संतोष सुरे

श्री.त्रिंबक तुपे :प्रस्ताव वगळण्यात यावा. या संदर्भात स.सदस्य यांनी पत्र सुध्दा दिले आहे.

श्री.समीर राजूरकर :असे प्रस्ताव येवूच नये प्रशासनाकडून प्रस्ताव यायला पाहिजे.

मा.महापौर :स.सदस्य श्री.बन्सी जाधव यांनी हा प्रस्ताव मागे घेणे बाबत पत्र दिले आहे त्यानुसार हा प्रस्ताव वगळण्यात येतो.

ठराव :प्रस्तुत प्रस्ताव विषय पत्रिकेतून वगळण्यास मंजूरी देण्यात येते.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी आपआपसांत बोलत होते.

**(ऐैनवेळचे विषय)**

मा.महापौर :तापडीया डायग्नोस्टीक सेंन्टरचा विषय सोडून बाकी ऐनवेळचे सर्व विषय मंजूर

**विषय क्र.716 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलिपुरा ते शहागंज चमन विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.58,70,397/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.58,70,397/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय चौक ते चेलिपुरा ते शहागंज चमन विकास योजना या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस तसेच रक्कम रू.58,70,397/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.717 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.65,68,159/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. 65,68,159/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीपुतळा ते सिटीचौक ते भडकलगेट विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस तसेच रक्कम रू. 65,68,159/- च्या सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.718 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

औरंगाबाद महापालिका मुख्यालय ते चेलीपुरा पर्यंत मार्गे लोटाकारंजा विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.62,12,340/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.62,12,340/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका मुख्यालय ते चेलीपुरा पर्यंत मार्गे लोटाकारंजा विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस तसेच रक्कम रू.62,12,340/- च्या सुधारित सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र.719 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

नेहरूभवन ते औरंगपुरा भजी मंडई विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.30,76,160/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.30,76,160/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरूभवन ते औरंगपुरा भजी मंडई विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13च्या अर्थसंकल्पात तरतद उपलब्ध करण्यास तसेच रक्कम रू.30,76,160/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.720 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

टाऊन हॉल ते विद्यापीठ गेट ते लिटल फ्लॉवर स्कुल विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.91,56,029/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.91,56,029/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

टाऊन हॉल ते विद्यापीठ गेट ते लिटल फ्लॉवर स्कुल विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस तसेच रक्कम रू.91,56,029/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.721 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेनुसार रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासून युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद रस्ते बांधणीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

गांधीपुतळा ते मंजुरपुरा चौक छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय (VIP Road) विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) दरसुची सन 2011-12 आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.39,69,426/- चे होत आहे. प्रस्तावित कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.39,69,426/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गांधीपुतळा ते मंजुरपुरा चौक छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय (VIP Road) विकास योजनेतील या रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस नव्याने जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी सन 2012-13 च्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध करणेस तसेच रक्कम रू.39,69,426/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## विषय क्रमांक:- 722

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.६१ समर्थनगर अंतर्गत वरद गणेश मंदीर भागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०११-२०१२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु. २९,८४,०००/-चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०११-२०१२ मधील शहरी भागात पुर्नडांबरीकरण करणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेली आहे.

करिता सदर कामाचा अंदाजपत्रक रक्कम रु.२९,८४,०००/-चा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.६१ समर्थनगर अंतर्गत वरद गणेश मंदीर भागातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २९,८४,०००/-च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.723 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्र.क्र.64 क्रांतीचौक अंतर्गत गजानन नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खत्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रक्कम रू.79,04,300/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 2.99% जास्त दराने |
| 2 | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 21.21% जास्त दराने |

उपरोक्त प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 2.99% जास्त दराची आहे. सदर प्राप्त दराच्या निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता देवून मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणेबाबत शिफारस केली आहे.

तरी मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.99% जास्त दराच्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्र.क्र.64 क्रांतीचौक अंतर्गत गजानन नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 2.99% जास्त दराच्या मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.724 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहानुरवाडी येथील बीओटी तत्वावर विकसीत केलेली भाजी मार्केटची जागा स.नं.12, आरक्षण क्रमांक 262 ही जागा बी.ओ.टी.तत्वावर 30 (तीस) वर्षाच्या कालावधीसाठी भडे तत्वावर देणेकरीता बीओटी समितीच्या दिनांक 15.09.2010 रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निविदा कार्यवाहीसाठी दिनांक 7.1.2012 रोजी सहाव्या वेळेस निविदा प्रकाशीत करण्यात आली. सदरप्रकल्पाच्या अनुषंगाने विकसीत केलेल्या जागेवर तात्पुरत्या स्वरूपाचे किमान एक हजार गाळे उभारून आठवड्याच्या दर सोमवारी भजी मार्केट भरविणे व आठवड्यातील इतर सहा दिवशी सदर जागा अनुज्ञेय वापरासाठी 30 वर्षाच्या भाडेतत्वावर देणेकरीता प्रस्ताव असून निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 24.1.2012 पावेतो एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) मे.श्रीहरी असोसिएट्स प्रा.लि. औरंगाबाद
2) मे.सुशील कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद
3) श्री.राजेश के.भारूका, औरंगाबाद

वरील तीनही निविदाधारकांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने देकार दर उघडण्यात आले त्यांचे दर खाली नमुद प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | वार्षिक दर भाडे | प्रिमियम रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | मे.श्रीहरी असोसिएट्स प्रा.लि. औरंगाबाद | रू.30,60,000 | रू.21,60,000 |
| 2 | मे.सुशील कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद | रू.27,99,000 | रू.21,00,000 |
| 3 | श्री.राजेश के.भारूका, औरंगाबाद | रू.15,00,000 | रू.15,00,000 |

दिनांक 29.9.2011 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने सदर प्रकल्पासाठीची रूपये 26,99,999/- प्रति वर्ष आणि प्रिमियम रक्कम रूपये 21,00,000/- अशी आधारभूत किंमत निश्चित करून दिलेली आहे. उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी मे.श्रीहरी असोसिएटस् प्रा.लि., औरंगाबाद यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम प्राप्त आहे. तसेच निविदेतील अटी व शर्ती नुसार भाडेपट्टा दरात दर तीन वर्षाने 12% वाढ होणार आहे.

उपरोक्त दर्शविल्यानुसार सदर देकार दर हे आधारभुत किंमतीपेक्षा जास्त असल्याने व महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.श्रीहरी असोसिएटस् प्रा.लि., औरंगाबाद यांचे वार्षिक दर भाडे रूपये 30,60,000/- प्रतिवर्ष आणि प्रिमियम रक्कम रूपये 21,60,000/- या दराने 30 (तीस) वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील बीओटी तत्वावर विकसीत केलेली भाजी मार्केटची जागा (स.नं.12, आरक्षण क्रमांक 262) विकसीत केलेल्या जागेवर तात्पुरत्या स्वरूपाचे किमान एक हजार गाळे उभारून आठवड्याच्या दर सोमवारी भाजी मार्केट भरविणे व आठवड्यातील इतर सहा दिवशी सदर जागा अनुज्ञेय वापरासाठी बी.ओ.टी.तत्वावर 30 (तीस) वर्षाच्या कालावधीसाठी भडे तत्वावर देणेकरीता, मागविलेल्या निविदानुसार प्राप्त देकार दरापैकी मे.श्रीहरी असोसिएटस् प्रा.लि., औरंगाबाद यांचे देकार दर हे आधारभुत किंमतीपेक्षा जास्त असल्याने व महानगरपालिकेस लाभदायक असल्याने, वार्षिक दर भाडे रूपये 30,60,000/- प्रतिवर्ष आणि प्रिमियम रक्कम रूपये 21,60,000/- या दराने 30 (तीस) वर्षाच्या भाडेपट्ट्याच्या करारावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :-७२५**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत, कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) व महानगरपालिका, औरंगाबाद यांच्यात Good Practice Scheme Phase-III ही योजना चालू आहे. या योजनेअंतर्गत बर्मिंगहॅम सिटी कौन्सिल, (यु.के.) व औरंगाबाद महानगरपालिका हे घनकचरा व्यवस्थापन या विषयात भागीदारी करीत आहेत. या योजनेत आंबेडकर नगर ही वसाहत पथदर्शी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांनी निवडलेली असून त्यासाठी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांचेकडून दहा हजार पौंडचे अनुदान मंजूर झाले आहे. या योजनेचा एक भाग म्हणून दिनांक २२ व २३ सप्टेंबर, २०११ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेने एक डिसेमिनेशन सेमीनारचे यजमानपद भूषविले होते. या प्रकल्पाचा पुढचा एक भाग म्हणून कोलंबो (श्रीलंका) येथे २४ व २५ एप्रिल, २०१२ रोजी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के), श्रीलंका सरकार आणि फेडरेशन ऑफ श्रीलंकन लोकल गव्हर्नमेंट ऑथरिटीज यांच्यातर्फे HIGHLEVEL COMMENWEALTH SYMPOSIUM चे आयोजन करण्यात आलेले आहे. यासाठी मा. महापौर श्रीमती अनिता घोडेले, आयुक्त, डॉ. पुरुषोत्तम भापकर व आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख, डॉ. जयश्री कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आलेले आहे.

मा. महापौर यांचा पूर्ण खर्च कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांनी प्रायोजित केलेला आहे. मा. महापौर यांच्यासोबत मा. आयुक्त, डॉ. पुरूषोत्तम भापकर व आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख डॉ. जयश्री कुलकर्णी यांचा खर्च महापालिका औरंगाबाद यांनी करणे अपेक्षित आहे. यासाठी प्रत्येकी रूपये १,००,०००/- (अक्षरी एक लाख रूपये फक्त) एवढा खर्च येणे अपेक्षित आहे.

मा. महापौर यांच्यासोबत आयुक्त डॉ. पुरूषोत्तम भापकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख डॉ. जयश्री कुलकर्णी यांना कोलंबो येथे Symposium साठी जाणे व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकर नगर ही वसाहत पथदर्शी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांनी निवडलेली असून त्यासाठी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांचेकडून दहा हजार पौंडचे अनुदान मंजूर

झाले आहे.  या योजनेचा एक भाग म्हणून दिनांक २२ व २३ सप्टेंबर, २०११ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेने एक डिसेमिनेशन सेमीनारचे यजमानपद भूषविले होते. या प्रकल्पाचा पुढचा एक भाग म्हणून कोलंबो (श्रीलंका) येथे २४ व २५ एप्रिल, २०१२ रोजी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के), श्रीलंका सरकार आणि फेडरेशन ऑफ श्रीलंकन लोकल गव्हर्नमेंट ऑथरिटीज यांच्यातर्फे HIGHLEVEL COMMENWEALTH SYMPOSIUM चे आयोजन करण्यात आलेले आहे. यासाठी मा. महापौर श्रीमती अनिता घोडेले, आयुक्त, डॉ. पुरुषोत्तम भापकर व आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख, डॉ. जयश्री कुलकर्णी यांना आमंत्रित करण्यात आलेले असुन आयोजित सेमिनारसाठी कॉमनवेल्थ लोकल गव्हर्नमेंट (CLGF), (यु.के) यांचेकडून दहा हजार पौंडचे अनुदान मंजूर झालेले असुन  मा. महापौर यांच्यासोबत मा. आयुक्त, डॉ. पुरूषोत्तम भापकर व आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख डॉ. जयश्री कुलकर्णी यांचा खर्च महापालिका औरंगाबाद यांनी करणे अपेक्षित आहे.  यासाठी प्रत्येकी रूपये १,००,०००/- (अक्षरी एक लाख रूपये फक्त) एवढा खर्च येणे अपेक्षित असुन सदर खर्चास तसेच प्रोजेक्टचे सादरीकरण करण्यासाठी त्यांना या सेमीनारसाठी पाठविण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.७२६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका शाळेतील इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंत शिकणारे विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत त्यांचे वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून नाविण्यपुर्ण उपक्रम समर कॅम्प चे आयोजन श्रीमती उचिता चौहान, संयोजक यांच्यातर्फे करण्यात येणार आहे.

- समर कॅम्प मध्ये एकूण २०० विद्यार्थी सहभागी होतील.
- शाळेतील मुख्याध्यापकांमार्फत निवड करण्यात येईल.
- समर कॅम्पचा कालावधी ०८ दिवसाचे असेल ०९ व्या दिवशी सादरीकरण होईल.
- कॅम्पच्या कालावधीत नृत्य, व्यक्तिमत्व विकास, इंग्रजी संभाषण, विविध प्रकारच्या रांगोळ्या, चित्रकला, क्रॉफ्ट, मेहंदी, संभाषण कौशल्य इत्यादी छंद वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे.
- कॅम्पचे संपुर्ण आयोजनासाठी प्रति विद्यार्थी रू.५००/- प्रमाणे एकुण २००/- विद्यार्थ्यांसाठी संयोजक श्रीमती उचित चौहान यांना रू.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रूपये मात्र) मानधन स्वरूपात अदा करण्यात येईल.
- कॅम्प दरम्यान लागणारे छंद वर्गासाठी पुरक साहित्य करीता प्रती विद्यार्थी रू.२००/- प्रमाणे एकुण २०० विद्यार्थ्यांसाठी रू.४०,०००/- खर्च करण्यात येईल.
- कॅम्पचे कालावधी संपन्न झाल्यावर सहभागी विद्यार्थ्यांचे सादरीकरण होईल. त्या करीता रू.२५,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका शाळेतील इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंत शिकणारे विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत त्यांचे वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून श्रीमती

उचिता चौहान, संयोजक यांच्यातर्फे समर कॅम्पचे आयोजन करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.727 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मंजूर विकास योजना रस्ते, मंजूर विकास योजनेनुसार विकसीत करण्याचे काम महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात आले असून त्यासाठी बऱ्याच नागरिकांच्या मिळकती बाधीत होत आहेत. सदर रूंदीकरण मोहिमेत बाधीत क्षेत्र/मिळकती नागरिकांच्या सहकार्याने ताब्यात घेण्यात आले आहेत.

रस्ता रूंदीकरणात बाधीत मिळकतधारकांनी अर्ज देऊन टी.डी.आर., एफ.एस.आय. व रोख स्वरूपात मोबदल्याची मागणी केलेली आहे. अर्जाची तांत्रिक छाननी करून मिळकती बाबतच्या हरकती/सूचना/आक्षेप मागविण्याकरीता वर्तमानपत्रातून जाहीर प्रगटन देऊन मोबदला देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

रस्ता रूंदीकरणातील मिळकती खाजगी वाटाघाटीने घेण्यात येत असून ज्या मिळकतधारकांनी रोखीने मोबदला मागीतला आहे त्यांना चालू वर्षाच्या सिध्द शिघ्र गणक दरानुसार मोबदला देण्यात येत आहे. सदर मोहिमेत जागेची आवश्यकता लक्षात घेऊन नागरिकांनी उस्फुर्तपणे त्यांच्या मिळकतीतील बांधकामे तोडून रस्त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. मात्र बाधीत क्षेत्राचा मोबदला टी.डी.आर. किंवा रोखीच्या स्वरूपात देण्यासाठी बाधीत क्षेत्राचे महानगरपालिकेच्या नावे खरेदीखत करून देणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे खरेदीखताचा खर्च मिळकतधारक व महानगरपालिका यांनी अर्धा-अर्धा न करता संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावा, जेणेकरून नागरिकांनी दिलेल्या सहकार्यास प्रतिसाद दिल्यासारखे होईल. त्यानुसार कार्यवाही सुरू केली आहे.

तरी बाधीत क्षेत्राचा मोबदला चालु वर्षाचे सिध्द शिघ्र गणकानुसार देण्यास व खरेदीखताचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावयाचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मंजूर विकास योजनेनुसार विकास योजना रस्ते विकसीत करण्यासाठी रस्ता रूंदीकरण मोहिमेत बाधीत क्षेत्र/मिळकती खाजगी वाटाघाटीने संपादन करण्याकरीता बाधीत क्षेत्राचा मोबदला टी.डी.आर. किंवा रोखीच्या स्वरूपात देण्यासाठी बाधीत क्षेत्राचा मोबदला चालु वर्षाचे सिध्द शिघ्र गणकानुसार देण्यास व खरेदीखताचा संपूर्ण खर्च महानगरपालिकेने करावयाच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७२८:-**

मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेस थकीत विज देयकापोटीची मुळ रक्कम रू.१००.३५ कोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळा कडे भरणा करणे करिता तसेच . समांतर जलवाहीनी Water Payment Reserve Account तयार करणेसाठी . रु.९४.५० कोटी जमा करावयाचे आहेत व समांतर जलवाहीनीकरीता भुसंपादनासाठी रु. ५.१५ कोटी असे एकुण रू.२००.०० कोटी कर्ज उभारणी करिता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र ४३७ दिनांक ०७.०९.२०११ नुसार मान्यता प्रदान केलेली आहे.

शासनाचे पत्र क्र /औमपा-१११९/७२८/प्र.क्र.३४९/नवि-२४ दिनांक २७ जानेवारी २०१२ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०९ (१) मधील तरतुदी अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच शासना मार्फत नगरोत्थान अंतर्गत विशेष निधी प्राप्त होणार असुन सदर निधी अंतर्गत करण्यात येणा-या कामांमध्ये सुद्धा महानगरपालिकेचा हिस्सा समाविष्ट आहे.व त्या करिता महानगरपालिकेस कर्ज उभारणी करण्याची आवश्यकता भासणार आहे.

सदर कर्ज उभारणी करिता शासनाने दिलेल्या मान्यतेनुसारच्या पत्रा मधील अ.क्र.०२ मध्ये नमुद केल्या नुसार सदर कर्जाची परतफेड नियमीत पणे व्हावी म्हणुन स्वतंत्र सिंकिंग फंड उघडून त्यामध्ये दरमाह परतफेडीच्या रक्कमे एवढी रक्कम जमा होईल या साठी विशिष्ट महसुली स्त्रोत त्याच्याशी संलग्न करण्यात यावा अशी अट टाकलेली आहे.

त्या अनुषंगाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९१ व ११२ नुसार महानगरपालिकेचे विविध कर्ज निवारण निधी करिता तसेच विविध प्रकल्प मार्गी लावणे करिता सिंकिंग फंड निर्माण करणे साठी आय.डी.बी.आय. बँकेत नवीन स्वतंत्र सिंकींग फंड खाते उघडणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे रू.२००.०० कोटी कर्ज उभारणीस शासनाचे पत्र क्र /औमपा-१११९/७२८/प्र.क्र.३४९/नवि-२४ दिनांक २७ जानेवारी २०१२ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०९ (१) मधील तरतुदी अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच सदर पत्रात नमुद अटी नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९१ व ११२ नुसार महानगरपालिकेचे विविध कर्ज निवारण निधी करिता तसेच विविध प्रकल्प मार्गी लावणे करिता सिंकिंग फंड निर्माण करणे साठी आय.डी.बी.आय. बँकेत नवीन स्वतंत्र सिंकींग फंड खाते उघडणे बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.729 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण मोहीम जानेवारी 2012 पासुन युध्दपातळीवर हाती घेण्यात आली आहे. शहरातील विविध रस्ते रूंद करून त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाच्या कामासाठी जी रस्ते हाती घेण्यात आले आहेत त्यापैकी, टाऊनहॉल ते मकाईगेट ते विद्यापीठ गेट ते लिटलफ्लॉवर शाळा 24 व 30 मीटर रूंद विकास योजनेतील हा एक रस्ता आहे. प्रस्तुत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकामाची खात्याची दरसूची सन 2011-12 नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.12,45,66,771/- आहे, प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर यांच्या अनुमतीने या कामासाठी ई-टेन्डर विभागामार्फत आणि वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा जा.क्र.मनपा/शअ/195/2012, दिनांक 4/4/2012 अन्वये मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एक निविदा दर भरून प्राप्त झाली ती दिनांक 17/4/2012 रोजी उघडण्यात आली. तपशील खालीलप्रमाणे आहे.

मे.मस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी 6.13% जास्त दर.

मस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची 6.13% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विकास योजनेतील रस्ते रूंदीकरण माहिमे अंतर्गत टाऊनहॉल ते मकाईगेट ते विद्यापीठ गेट ते लिटलफ्लॉवर शाळा 24 व 30 मीटर रूंद विकास योजनेतील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा 6.13% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक:-७३०**

आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मल्हारचौक ते तिरुपती विहार पर्यंत असलेले कॉंक्रीटकरण करणे (अंदाजपत्रकीय रक्कम रु.9695000/-) हे काम पावसाळ्यापुर्वी करणे आवश्यक आहे. सदर रस्ता तीन प्रभागातुन जाणारा मुख्य रस्ता असुन विविध उत्सव व मिरवणुकीचा मार्ग आहे. सदर रस्त्यावर खोलगट भाग असून पावसळयामध्ये रस्त्यावर दोन ते तीन फूट पाणी साचून राहाते. त्यामूळे रहदारीस व उत्सव मिरवणूकीस अडचण निर्माण होते. तसेच सदर रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहे. त्यामूळे अपघात होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी मा. आमदार व मा. आयुक्त यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन काम लवकरात लवकर सूरू करणे बाबत. आदेशीत केलेले आहे. वरील बाबी आधारे सदर काम पावसळयापूर्वी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर कामसाठी निविदा मागाविण्यात आल्या असता मे. ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.99 टक्के जास्त दराची एकच निविदा प्राप्त झालेली आहे.संबधितांस दराच्या वाटाघाटीस्तव बोलावले असता सदर एजन्सी नमूद केलेल्या दरापेक्षा दर कमी करण्यास तयार नाही. तरी कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ)यांनी अदांजपत्रकीय दरापेक्षा 4.99 टक्के जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.00 टक्के जास्त असा दर मान्य करण्याची शिफारस केली आहे.

करीता अंदाजपत्रकीय रक्कम व कंत्राटदराच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.00 टक्के जास्त दर मिळविता येणाऱ्या अतिरिक्त खर्चाच्या रकमेसह मान्य करणे बाबतचा ऐनवेळीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मल्हार चौक ते तिरूपती विहार पर्यत रस्त्याचे कॉंक्रीट करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ) यांनी शिफारस केल्या प्रमाणे सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4 टक्के जास्त दराच्या निविदेस मंजूरी देणयात येते. तसेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.00 टक्के जास्त दर मिळविता येणाऱ्या अतिरिक्त खर्चाच्या रकमेसही मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.731 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी हॅंड कार्टस् (घंटा गाडी प्रत्येकी दोन नग 100 लिटर क्षमतेच्या बीन्ससह), (500 नग) खरेदी करण्यासाठी तेरावा वित्त आयोग लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करून देण्यास व प्रती नग रू.9,900/- प्रमाणे एकूण 49,50,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.568 दि.20/12/2011 प्रमाणे मान्यता दिल्यानुसार 500 नग

हॅंड कार्टस् खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले आहेत.

निविदेद्वारे प्राप्त दर पुढीलप्रमाणे. .

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर-हॅंड कार्टस् (प्रती नग) |
|---|---|---|
| 1 | मे.न्यू साई फाईबर, मिरज | रू.10,512/- |
| 2 | मे.कल्याणी कॉर्पोरेशनृ, पुणे | रू.9,895/- |
| 3 | मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद | रू.9,850/- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी न्यूनतम दर असलेले मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीस वाटाघाटीस बोलावण्यात आले असता त्यांनी प्रती हॅंडकार्टस् रू.25/- कमी करून प्रति हॅंडकार्टस् रू.9,825/- प्रमाणे पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे.

वाटाघाटीअंती प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेकडून हॅंड कार्टस् 500 नग खरेदी करणे योग्य होईल. करिता हॅंड कार्टस् खरेदीसाठी वाटाघाटीअंती प्राप्त दर प्रती हॅंड कार्टस् (प्रत्येकी दोन नग 100 लिटर क्षमतेच्या बीन्ससह) रू.9,825/- प्रमाणे 500 नग हॅंड कार्टस् खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेंच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाचे अंतर्गत कचरा संकलनाचे कामासाठी सध्या असलेली यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे नवीन 500 नग हॅंड कार्टस् (प्रत्येकी दोन नग 100 लिटर क्षमतेच्या बीन्ससह) खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुार प्रती नग रू.9825/- या दराने मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.732 :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.रामके एन्वायरो इंजिनिअर्स लि. यांनी दि.18/12/2011 पासून बंद केल्यामुळे महानगरपालिकेच्या 29 व किरायाच्या 29 वाहनांद्वारे कचरा वाहतुकीचे काम करून घेण्यात येत आहे. तसेच 12 वा वित्त आयोग लेखाशिर्षातून खरेदी करण्यात आलेले स्कील लोडर मशिन्स देखील या कामी नियुक्त करण्यात आले आहेत. तथापी ही यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे व मनपाचे टिप्पर्स अत्यंत जुने झाले असल्यामुळे घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामासाठी हूक लोडर (6 नग) व हूक लोडर कंटेनर (24 नग) खरेदी करण्यासाठी तेरावा वित्त आयोग लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करून देण्यास व प्रती नग रू.19,82,331/- प्रमाणे 06 हूक लोडर व प्रती नग रू.5,00,000/- प्रमाणे 24 नग हूक लोडर कंटेनर याप्रमाणे एकूण रक्क्म रू.2,38,93,986/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.568 दिनांक 20/12/2011 प्रमाणे मान्यता दिल्यानुसार हूक लोडर व हूक लोडर कंटेनर खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले आहेत.

निविदेद्वारे प्राप्त दर पुढीलप्रमाणे. .

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर-हूक लोडर (प्रती नग) | दर-हूक लोडर कंटेनर (प्रती नग) |
|---|---|---|---|
| 1 | मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद | रू.19,75,000/- | रू.4,93,500/- |
| 2 | मे.जानकी ट्रेडर्स, बीड | रू.19,78,000/- | रू.4,95,000/- |
| 3 | कॅम अविडा एन्विरो इंजिनिअर्स प्रा.लि. | रू.19,80,000/- | रू.4,98,000/- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी न्यूनतम दर असलेले मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीस वाटाघाटीस बोलावण्यात आले असता त्यांनी प्रती हूक लोडर रू.1000/- व प्रती हूक लोडर कंटेनर रू.500/- कमी करून प्रती हूक लोडर रू.19,74,000/- व प्रती हूक लोडर कंटेनर रू.4,93,000/- प्रमाणे पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे. वाटाघाटीअंती प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेकडून हूक लोडर (6 नग) व हूक लोडर कंटेनर (24 नग) खरेदी करणे योग्य होईल.

करिता हूक लोडर व हूक लोडर कंटेनर खरेदीसाठी वाटाघाटीअंती प्राप्त दर प्रती हूक लोडर रू.19,74,000/- व प्रती हूक लोडर कंटेनर रू.4,93,000/- प्रमाणे 06 नग हूक लोडर व 24 नग हूक लोडर कंटेनर खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाचे अंतर्गत कचरा संकलनाचे कामासाठी सध्या असलेली यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे नवीन हूक लोडर (6 नग) व हूक लोडर कंटेनर (24 नग) खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार हूक लोडर प्रती नग रू.19,74,000/- व हूक लोडर कंटेनर प्रती नग रू.4,93,000/- या दराने मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.733 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.रामके एन्वायरो इंजिनिअर्स लि. यांनी दि.18/12/2011 पासून बंद केल्यामुळे मे.रामके यांच्याद्वारे घनकचरा संकलनासाठी वापरण्यात येत असलेले 35 ऑटो टिप्पर्स बंद झाले आहेत. सध्या महानगरपालिकेच्या 15 ऑटो टिप्पर्स व किरायाच्या 14 लोडींग ऑटो वाहनांद्वारे कचरा संकलनाचे काम करून घेण्यात येत आहे. तथापी ही यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी ऑटो टिप्पर्स (25 नग) खरेदी करण्यासाठी तेरावा वित्त आयोग लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करूनदेण्यास व प्रती ऑटो हॉपर रू.1,45,500/- प्रमाणे एकूण रू.36,37,500/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.568 दिनांक 20/12/2011 प्रमाणे मान्यता दिल्यानुसार ऑटो हॉपर्स खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, तांत्रिकदृष्ट्या पात्र तीन निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले आहेत.

निविदेद्वारे प्राप्त दर पुढीलप्रमाणे. .

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर-ऑटो हॉपर (प्रती नग) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | मे.चिंतामणी मोटर्स, सांगली | रू.1,45,000/- |
| 2 | मे.क्रिश इंटरनॅशनल, औरंगाबाद | रू.1,46,500/- |
| 3 | मे.अभय ट्रेडर्स, औरंगाबाद | रू.1,47,625/- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदांपैकी न्यूनतम दर असलेले मे.चिंतामणी मोटर्स, सांगली यांच्या प्रतिनिधीस वाटाघाटीस बोलावण्यात आले असता त्यांनी प्रती ऑटो हॉपर रू.500/- कमी करून प्रती ऑटो हॉपर रू.1,44,500/- प्रमाणे पुरवठा करण्यास संमती दर्शविली आहे.

वाटाघाटीअंती प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने मे.चिंतामणी मोटर्स, सांगली यांचेकडून ऑटो हॉपर (25 नग) खरेदी करणे योग्य होईल.

करिता ऑटो हॉपर खरेदीसाठी वाटाघाटीअंती प्राप्त दर प्रती ऑटो हॉपर रू.1,44,500/- प्रमाणे 25 नग ऑटो हॉपर खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाचे अंतर्गत कचरा संकलनाचे कामासाठी सध्या असलेली यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे नवीन 25 नग ऑटो हॉपर्स खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.चिंतामणी मोटर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार प्रती नग रू.1,44,500/- या दराने मे.श्री.चिंतामणी मोटर्स, सांगली यांचेकडून खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.734 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.रामके एन्वायरो इंजिनिअर्स लि. यांनी दि.18/12/2011 पासून बंद केल्यामुळे मे.रामके यांच्याद्वारे घनकचरा संकलनासाठी वापरण्यात येत असलेले 35 ऑटो टिप्पर्स बंद झाले आहेत. सध्या महानगरपालिकेच्या 15 ऑटो टिप्पर्स व किरायाच्या 14 लोडींग ऑटो वाहनांद्वारे कचरा संकलनाचे काम करून घेण्यात येत आहे. तथापी ही यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे, नवीन 25 नग ऑटो टिप्पर्स खरेदी करणे आवश्यक आहे. त्यासाठी ॲपे एक्स्ट्रा चेसीस (25 नग) खरेदी करण्यासाठी तेरावा वित्त आयोग लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करून देण्यास व प्रती नग रू.1,55,400/- प्रमाणे एकूण रू.38,85,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.568 दिनांक 20/12/2011 प्रमाणे मान्यता दिल्यानुसार ॲपे एक्स्ट्रा चेसीस खरेदीसाठी ई-टेंडर व वर्तमानपत्राद्वारे जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता, ॲपे कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.ग्लोबल मोटर्स यांची एकमेव निविदा प्राप्त झाली आहे.

निविदेद्वारे प्राप्त दर पुढीलप्रमाणे. . .

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | दर-ऑटो हॉपर (प्रती नग) |
|---|---|---|
| 1 | मे. ग्लोबल मोटर्स | रू.1,49,500/- |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त ॲपे कंपनीचे अधिकत विक्रेते मे.ग्लोबल मोटर्स यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्याने मे.ग्लोबल मोटर्स यांचेकडून ॲपे एक्स्ट्रा चेसीस (25 नग) खरेदी करणे योग्यहोईल.

करिता ॲपे एक्स्ट्रा चेसीस खरेदीसाठी निविदेद्वारे प्राप्त दर प्रती ॲपे एक्स्ट्रा चेसीस रू.1,49,500/- प्रमाणे 25 नग ॲपे एक्स्ट्रा चेसीस खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाचे अंतर्गत कचरा संकलनाचे कामासाठी सध्या असलेली यंत्रणा अपुरी पडत असल्यामुळे नवीन 25 नग ॲपे एक्स्ट्रा चेसीस खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेली मे.ग्लोबल मोटर्स याची प्रती नग रू.1,49,500/- या दराची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.735 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको एन-1 सेक्टर सी-3 मधील खुल्या जागेतील महानगरपालिकेने बांधलेले महानगरपालिकेचे सभागृह सेवाभावी नोंदणीकृत संस्था गोवर्धन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांनी भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केली आहे. महानगरपालिकेच्या अटी/शर्तीस अधीन राहुन भाडेतत्वावर सदर सभागृह घेण्यास संस्था तयार असल्याचे संस्थेने नमुद केले आहे.

सदरील हॉल/सभागृहाचे बांधकाम सन 2011 मध्ये पूर्ण झाले असून त्याचे क्षेत्रफळ 91.35 चौ.मी. एवढे आहे. मा.स्थायी समिती सभेच्या दिनांक 20/03/2007 विषय क्रमांक 317 अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक, सामाजिक सभागृह, समाजमंदीर, व्यायामशाळा इत्यादी रक्कम रू.1000/- प्रतीमहा भाडे आकारून सदरील हॉल देखभाल दुरूस्तीचा खर्च संबंधीत संस्थेने करावा या अटीवर हॉल देण्याचे मंजुर ठराव व महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार या प्रकरणी उक्त संस्थेस फक्त सामाजिक कार्यासाठीच वापर करण्याकरीता इतर नेहमीच्या अटी/शर्तीस अधीन राहून मान्यता होणेसाठी प्रस्ताव सादर.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-1 सेक्टर सी-3 मधील खुल्या जागेतील महानगरपालिकेने बांधलेले महानगरपालिकेचे सभागृह गोवर्धन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या सेवाभावी नोंदणीकृत संस्थेने भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केल्यानुसार, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक, सामाजिक सभागृह, समाजमंदीर, व्यायामशाळा इत्यादी रक्कम रू.1000/- प्रतीमहा भाडे आकारून देण्यासंबंधी दिनांक 20/03/2007 रोजीच्या स्थायी समिती ठराव क्रमांक 317 अन्वये सदरील हॉल देखभाल दुरूस्तीचा खर्च संबंधीत संस्थेने करावा या अटीवर, स्थायी समितीचा मंजुर ठराव व महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार या प्रकरणी गोवर्धन बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेस फक्त सामाजिक कार्यासाठीच वापर करण्याकरीता इतर नेहमीच्या अटी/शर्तीस अधीन राहून सिडको एन-1 सेक्टर सी-3 मधील महानगरपालिकेचे सभागृह भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.736 :**

मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघ यांनी शहरातील योग्य ठिकाणी त्यांचे कार्यालयाकरीता जागा उपलब्ध करून द्यावी या मागणी संबंधाने दि.29.9.2011 च्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र.476 ने मंजुर झालेल्या

ठरावा संबंधाने महासंघाने मौ.क्रांतीचौक येथील महानगरपालिकेच्या मालकी हक्कात व ताब्यात असलेली स.नं.54 मधील जागा मागणी केली आहे.

सदर ठिकाणी रस्ता व स्थनिक स्थितीमुळे स्वतंत्र अस्तित्व असलेला 652.65चौ.मी. क्षेत्राचा उपलब्ध असलेला भुखंड महासंघास देणे प्रस्तावित आहे. याकरीता या वर्षाचे सिध्द शिघ्र गणकानुसार होणारे भाडे सदर भुखंड मुख्य रस्त्यापासून आत स्मशानभुमी लगत असल्याचे विचारात घेवुन रक्कम रू.5/- प्रति चौ.फुट एवढे होते. सदर जागा भाडेतत्वावर/लिजवर प्रदान करण्याची कार्यवाही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 चे तरतुदीतहत करण्यासंबंधाने भाडे निश्चित केलेले आहे. यासंबंधाने झ ाालेल्या चर्चेत महासंघाने उक्त मंजुर ठरावासंबंधाने नाममात्र भाडे आकारून सदर जागा रू.1/- प्रति चौ.मी. ने द्यावी अशी मागणी करून या जागेवर महासंघाचे कार्यालयासाठी बांधण्यात येणारे हॉल महानगरपालिकेच्या मिटींग, महानगरपालिका स्वत:साठी आवश्यक असल्यास वापरू शकेल त्यासाठी भाडे आकारण्यात येणार नाही, अशी सवलत देण्याचे प्रस्तावित केले आहे.

महानगरपालिकेने लागू केलेल्या स्थानिक संस्था कर प्रणाली यशस्वीतेमध्ये महासुंघाचा फार मोठा सिंहाचा वाटा असल्याने व यापुढे महासंघाचे कार्यालय झाल्यास या करप्रणालीत व्यापारी महासंघाकडून पुर्णपणे सहकार्य करून अधिकाधिक महसुल उत्पन्नात वसुलीस मदत करण्यात येईल. यासाठी महानगरपालिकेने महासंघाचे हॉल करीता सदर जागा नाममात्र भाडे दराने तीस वर्षासाठी भाडेपट्ट्याने द्यावी अशी मागणी केली आहे/असे म्हणणे मांडले आहे.

महानगरपालिकेच्या जागा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 199 चे कलम 79 चे तरतुदीतहत भाडेपट्टा/लिजवर देण्याच्या कार्यवाहीत भाडे कमी करता येणार नाही. तथापी महासंघाची मागणी स्थनिक संस्था करातील त्यांचे योगदान व त्यांनी मांडलेले म्हणणे इ. विचारात घेवुन नाममात्र भाडे आकारणी संबंधाने मा.सर्वसाधारण सभेसमोर भाडे दर निश्चितीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्यालयाकरीता मौ.क्रांतीचौक येथील महानगरपालिकेच्या मालकी हक्कात व ताब्यात असलेली स.नं.54 मधील जागेची मागणी केलेला 652.65 चौ.मी. क्षेत्राचा उपलब्ध असलेला भुखंड व्यापारी महासंघास सदर जागा रू.1/- प्रति चौ.मी. या येणारे हॉल महानगरपालिकेच्या मिटींग, महानगरपालिका स्वत:साठी आवश्यक असल्यास वापरू शकेल विना मोबदला वापरू शकेल या अटीवर नाममात्र भाडे दराने तीस वर्षासाठी भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक: ७३७</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चिकलठाणा एम.आय.डी.सी भागातील रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करणेच्या कामाअंतर्गत चिकलठाणा एम.आय.डी.सी भागातील वोखार्ड कंपनी ते जयभवानी चौक नारेगांव या रस्त्याचे काम मा.स्थायी समिती सभा ठराव क्रं.२४१ दिनांक १५.०४.२०११ नुसार मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे मार्फत सुरू आहे. रस्त्याचे काम प्रगतीपथावर असतांना सदरील रस्ता हा नारेगांव कचरा डेपो रोडवरील मनपा शाळेपर्यंत वाढविण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी केलेली आहे.

सदरील रस्ता हा महानगरपालिकेच्या कचरा डेपो पासून पुढे केंब्रीज शाळेजवळुन येणा-या या बायपास पर्यंत मिळत असल्याने या रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतुकीमुळे रस्त्यावर मोठमोठी खड्डे पडलेली असून पर्यायाने महानगरपालिकेच्या कचरा वाहतुक करणा-या

गाडयांचे वार्षिक देखभाल दुरूस्ती खर्चात वाढ होत आहे.तसेच नारेगांव कचरा डेपो हा मा.न्यायालयाच्या आदेशान्वये स्थलांतरीत करण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी केलेली आहे. परंतु इतरत्र ठिकाणी कचरा डेपो साठी पर्यायी जागा उपलब्ध न झाल्याने याच ठिकाणी कचरा डेपो कार्यान्वीत असल्याने सदर रस्त्याचे मजबुतीकरण होणे आवश्यक आहे.यासाठी उक्त रस्त्याचे वाढीव काम करणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २०१०-२०११ च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये ७.३५ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे,सदर वाढीव काम हे प्रगतीपथावर असलेल्या रस्त्यासोबतच करणे असल्याने या कामाचे मुळ गुत्तेदार मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे कडुन डिफर्ड पेमेंट धर्तीवरील विहीत अटी व शर्ती तसेच उक्त मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार मंजुर निविदा दराने करून घेण्यास तसेच सदर कामाच्या मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १९.७४ कोटी मध्ये रूपये ७.३५ कोटीची वाढ होणार असल्याने कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रूपये २७.०९ कोटीस मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे.

करीता उक्त नमुद बाबीनुसार वाढीव काम मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांचे कडुन डिफर्ड पेमेंट धर्तीवरील विहीत अटी व शर्ती तसेच मंजुर निविदा दरानुसार करणेसह कामाचे सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ तथापि मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी भागातील रस्त्यांचे डिफर्ड पेमेंट धर्तीवर डांबरीकरण व मजबुतीकरण करणेच्या कामाअंतर्गत चिकलठाणा एम.आय.डी.सी भागातील वोखार्ड कंपनी ते जयभवानी चौक नारेगांव या रस्त्याचे हे प्रगतीपथावर आहे.हा रसता नारेगांव कचरा डेपो वरील महानगरपालिका शाळेपर्यंत वाढविण्याची स्थानिक लोकांची मागणी असल्याने त्याचे अंदाजपत्रक रूपये ७.३५ कोटीने वाढत असल्यामुळे मुळ अंदाजपत्रक रक्कम २७.९ कोटीच्या सुधारित अंदाज पत्रकास मंजूरी देण्यात येते.तसेच प्रशासनाने प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे हे वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार यांचे कडुन डिफर्ड पेमेंट धर्तीवरील विहीत अटी व शर्ती तसेच उक्त मा.स्थायी समितीच्या ठरावानुसार मंजुर निविदा दराने नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक: ७३७/१**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आयडीबीआय बँकेकडुन रुपये २००.०० कोटी कर्ज प्रस्ताव मंजुरीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने सर्व आवश्यक ते अभिलेखे,दस्तावेज व करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे तसेच अटी व शर्ती निर्धारीत करण्याचे संपुर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना देणे बाबतचा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

The Mayor informed the General Council of Aurangabad Municipal Corporation (hereinafter “the Corporation”) the pursuant to the sanction Obtained from the Government of Maharashtra vide letter No.AMC/1111/728/Case No.349/UD-24 dated 27.01.2012 arrangements have Since been made with IDBI Bank Ltd. (IDBI Bank) for financial assistance

1) To utilized Rs.100,35,00,000/- (Rs. One hundred crores & thirty five lakhs only ) for payment to Maharashtra State electricity board

Towards overdue electricity charges under OTS approved by Government to Maharashtra.

2) To utilize Rs.94,50,00,000/- (Rs.Ninty four crores fifty lakhs only) for creating water payment reserve account against tender given to PPP operator for parallel water supply line.
3) To utilize Rs.5,15,00,000/- (Rupees five crores fifteen lakhs only) for making payments towards acquisition of land for above mentioned water supply line project.

And that IDBI Bank has agreed in principle, to grant to the corporation, Rupee Term Loan (RTL) of Rs. 200.00 Crores (Rs.Two hundred crores only) on the Terms and Conditions contained in the sanction letter No.IDBI/Aurangabad/11-12/18 Dated 21.12.2011 and letter of modification Ref. No. IDBI/Aurangabad/12-13/01 Dated 17.04.2012 issued by IDBI Bank.

After some discussions, the General Council of the Corporation passed the following resolutions.

**RESOLVED**

1. THAT the corporation do accept the offer IDBI Bank to grant to the Corporation RTL of Rs.200,00,00,000/- (Rupees Two hundred Crores only) (Hereinafter referred to as “ The Financial Assistance” )on the Terms and Conditions contained in the section letter No. IDBI/Aurangabad/11-12/18 Dated 21.12.2011 and letter of modification Ref.No. IDBI/Aurangabad/12-13/01 Dated 17.04.2012 received from IDBI Bank. (A Copy, whereof is duly signed by the Mayor of the Corporation for the purpose of identification, has been circulated to the General council / placed on the table of the meeting)
2. THAT Dr.Purushottam Bhapkar, Muncipal Commissioner of the Corporation, as empowered by the Bombay Provincial Municipal Corporation Act,1949, be and is hereby authorized to convey to IDBI Bank acceptance on behalf of the Corporation of the said offer for the financial assistance on the Terms and Conditions contained in the section letter reffered to above and agree to such changes and modifications in the said terms and conditions as may be suggested and acceptable to IDBI Bank from time to time and to execute such deeds, documents and other writings as may be necessary or required for this purpose.
3. THAT the Corporation do borrow from IDBI Bank the financial assistance on the Terms and Conditions set out in standard form of loan agreement in addition to the special terms and conditions mentioned in the Sanction Letter No.IDBI/Aurangabad/11-12/18

Dated 21/12/2011 and letter of modification Ref. No. IDBI/Aurangabad/12-13/01 Dated 17/04/2012 received from IDBI Bank (A copy, whereof duly signed by the Mayor of the Corporation for purpose of identification, has been circulated to the General Council/ Placed on the table of the meeting) and also avail of interim disbursement(s) from time to time as may be allowed by IDBI Bank.

4. THAT the aforesaid standard form of Loan Agreement be and is hereby approved and Dr.Purushottam Bhapkar, Municipal Commissioner of the Corporation is authorized to accept on behalf of the Corporation such modifications therein as may be acceptable to IDBI Bank and finalize the same.

5. THAT the *common seal of the Corporation be affixed to the stamped engrossment(s) in duplicate of the Loan agreement (as per the standard form with such modifications as may be agreed to between IDBI Bank and the Corporation) in the presence of Shri.Vijay Laxmanrao Waghchore & Shri.Agha Khan Miyan Khan the Members of standing Committee of the corporation Who shall sign/countersign the same in token thereof as required by the Bombay Provincial Municipal Corporation Act,1949.

6. THAT the Corporation shall execute the Loan Agreement relating to the above facilities within the period stipulated by IDBI Bank condition being that such Agreement is executed, there is no binding obligation or commitment on the part of IDBI Bank to advance any money or incur any obligation there under.

7. THAT the standard forms of the following documents namely,

   a) Loan Agreement
   b) Escrow Agreement
   c) Various undertaking/Agreements/ Rating Report/ Other Conditions as mentioned in the original sanction letter.
   d) Debt Service Reserve Account (DSRA) to the extent of 3 months Principal & Interest Payment to the bank.

   Duly initiated by the Mayor for purposes of identification and placed before the meeting be and are hereby approved and that Dr. Purushottam Bhapkar, Municipal Commissioner of the Corporation be and is hereby authorized to finalize, on behalf of the Corporation, the said documents and writings as may be required by IDBI Bank in connection with the above facilities.

8. THAT the Common seal* of the company be affixed to the stamped endorsements (s) of such other documents as may be required to be executed under the common seal of the company in favour of IDBI

Bank to secure the aforesaid facilities in the presence of Shri Vijay Laxmanrao Waghchore & Shri. Agha Khan Miyan Khan, the Members of standing committee of the corporation who shall sign/ countersign the same in token thereof as required by the Bombay Provincial Municipal Corporation Act.1949.

9. THAT Dr. Purushottam Bhapkar, Municipal Commissioner of the corporation be and is hereby serverally authorized to accept amendments to such executed Loan Agreements and other documents as and when become necessary and to sign letter (s) of undertaking, decleration agreements and others papers where the corporation may be required to sign for availing of the financial assistance and be required to sign for availing of the financial assistanced and if so required, the common seal of the company be affixed there to in the presence of any of the said Shri Vijay Laxmanrao Waghchore & Shri. Agha Khan Miyan Khan, the members of Standing Committee of the Corporation who shall sign /Coutersign the same in token thereof as required by the Bombay Provincial Municipal Corporation Act,1949.

10. Copies of the foregoing resolutions certified to be true copies by the Mayor/ Municipal Secretary of the Corporation be furnished to IDBI Bank and IDBI Bank be requested to act thereon.

**ठराव :-**

आयडीबीआय बँकेकडुन रुपये २००.०० कोटी कर्ज प्रस्ताव मंजुरीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने सर्व आवश्यक ते अभिलेखे,दस्तावेज व करारनाम्यावर स्वाक्षरी करण्याचे तसेच अटी व शर्ती निर्धारीत करण्याचे संपुर्ण अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना देण्यात येणे बाबतचा प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४०)

दिनांक २०/०४/२०१२ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४०) रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

**स.सदस्य श्री.राजु रामराव शिंदे :**

**प्रश्न क्र. १०९ :**

दि. १८/०२/२०१२ (का.प.क्र.३५) च्या सर्व साधारण सभेतील पिको-फॉल शिवणयंत्र खरेदीचा विषय क्र. ५६८ रद्द करणे बाबत मी सभागृहात मागणी केली होती,परंतु त्यास मंजुरी देण्यांत आली.

**उपआयुक्त (प्र):**

**उत्तर :**

**मा.सर्व साधारण सभेने सदर प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. हे बरोबर आहे.**

**प्रश्न क्र. ११० :**

पिको फॉल शिवणयंत्र खरेदीबाबत दि. १३/०२/२०१२ च्या शासन पत्र क्र. Spc/Rct/ Sewingmachine/०९/२०११/११-१२/B२०१९ अन्वये पिको-फॉल शिवणयंत्र खरेदीचे दर करार शासन स्तरावरुन निश्चित झालेले आहेत. हे संबंधितांना माहिती नव्हते का? खुलासा करण्यांत यावा.

**उत्तर :**

पिको फॉल शिवणयंत्र खरेदी बाबतचा प्रस्ताव दि. ११/०१/२०१२ चा मा.सर्वसाधारण सभेत ऐनवेळेचा प्रस्ताव या सदराखाली ठेवण्यात आलेला होता. प्रस्ताव ठेवतांना तसेच निविदा प्रक्रिया करण्यापुर्वी या बाबतचा दर करार शासन स्तरावर निश्चीत झालेले नव्हते.

दि. ११/०१/२०१२ ची मा.सर्वसाधारण सभा तहकूब झाल्यामुळे पुढे तोच प्रस्ताव जसास तसा दि. १८ फेब्रुवारी २०१२ च्या सर्व साधारण सभेत मांडण्यात आलेला होता. ज्यावेळी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यावेळी दर करार उपलब्ध नव्हता.

**प्रश्न क्र. १११ :**

या प्रकरणी शासन निर्णयाच्या प्रतिसह मी पत्राव्दारे आक्षेप घेतल्यानंतर शिवणयंत्र खरेदी संदर्भात चौकशी समिती गठीत करण्यांत आली . चौकशी समितीच्या अहवाला नुसार मनपाचे एकूण र.रु. ९,६३,८२०/- इतके नुकसान होणार

होते, याची जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिका-या विरुध्द काय कार्यवाही करणार आहात? याचा खुलासा व्हावा.

**उत्तर :**

खरेदी करतांना कुठलीही त्रुटी राहु नये म्हणून विभागाच्या शिफारसीनुसार खरेदीसंबंधी निर्णय घेण्यासाठी मा.आयुक्त यांनी उप आयुक्त (प्र.) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली.

दि.१३/०२/२०१२ रोजी पिको-फॉल शिवणयंत्राबाबत शासन स्तरावर दर करार निश्चीत करण्यात आले . त्या अनुषंगाने गठित समितीने दर करारानुसार खरेदी करणेबाबत प्रस्तावित केले व याबाबाबतचा अहवाल सर्व स. पदाधिका-यांना अवगत करण्यात आलेला आहे.

पिको-फॉल शिवणयंत्र खरेदीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर दर करार प्राप्त होण्यापुर्वी सादर केलेला होता. प्रस्ताव सादर झाल्यानंतर दर कराराची प्रत प्राप्त झाली. तसेच सदर दर कराराची प्रत प्राप्त झाली.तसेच सदर दर कराराप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधीत अधिका-या विरुध्द कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

**स.सदस्या श्रीमती साधना सुरडकर :**

**प्रश्न क्र. :११२ :**

प्रश्न ११२ प्रभाग क्र.८८ मधील दिपगनर परिसरातील प्लॉट क्र. १३ वर बांधकाम परवानगी देणेत आली आहे काय ? असल्यास किती क्षेत्रफळासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली? बांधकाम परवानगीची प्रत तसेच बांधकामाच्या नकाशाची प्रत देण्यात यावी. या ठिकाणी बांधकाम परवानगी नुसार बांधकाम करण्यात येत आहे काय ?

**सहाय्यक संचालक नगर रचना:**

**उत्तर :**

मोहल्ला दिपनगर भुखंड क्र. १३ सी.टी.एस. क्र.१६०३५/ब/२/२५ येथे परवाना क्र.११४७/२०११-१२ दि. १७/०३/२०१२ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आलेली आहे.

सदर बांधकाम परवानगी भुखंडाचे क्षेत्रफळ २०७.६० बांधीव क्षेत्रफळ १९४.०२ करिता देणेत आलेली आहे.

मंजुर बांधकाम परवानगी नकाशाची व आदेशाची छायाप्रत सोबत जोडली आहे.

**प्रश्न क्र. ११३ :**

प्रभाग क्र. ८८ मधील दिपगनर हौ.सो. मध्ये एस.बी.एच. बॅकेचे बांधकाम सुरु आहे. या ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे काय ? किती

क्षेत्रफळासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली ? त्याची बांधकाम परवानगीची प्रत/नकाशा इत्यादीसह सर्व माहिती देण्यात यावी .

**उत्तर :**

मोहल्ला दिपनगर भुखंड क्र. २१ न.भू.क्र .१६०३५/८/२/४ (एस.बी.एच.बॅक) येथे परवाना क्र. ६५४/२०११-१२ दि. ०/११/२०११ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आलेली आहे.

सदर बांधकाम परवानगी भुखंड क्षेत्रफळ ७९१.७१ चौ.मी., बांधीव क्षेत्रफळ ५६६.८२ चौ.मी. करिता देणेत आलेली आहे.

मंजुर बांधकाम परवानगी नकाशाची व आदेशाची छायाप्रत सोबत देणेत येत आहे.

**स.सदस्य श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** :

**प्रश्न क्र. ११४** :

सध्या स्थितीमध्ये किती LBT कर भरते?कंपनीने LBT कर भरणा कमी केला आहे काय ? कमी LBT कर भरणा झाल्यास त्याची कारणे काय ? याबाबत सविस्तर माहीती देण्या यावी .

**स्थानिक संस्था कर अधिकारी,**

**उत्तर :**

| अ.क्र. | प्रश्न | रक्कम | |
|---|---|---|---|
| १. | वोखार्ड कंपनी सुरवातीस किती LBT कर भरत होती | जुलै २०११ | ६४२७६५४ |
| | | ऑगस्ट -२०११ | ८८९३५४२ |
| | | सप्टेंबर -२०११ | ५३३०६३५ |
| | | एकुण | २०६५१८३१ |
| २ | सद्यस्थितीमध्ये किती LBT कर भरते | ऑक्टोंबर -२०११ | ५८२७५१ |
| | | नोव्हेंबर -२०११ | ४३७८५० |
| | | डिसेंबर -२०११ | ६३५९२३ |
| | | जानेवारी -२०१२ | ६२१९६२ |
| | | एकुण | २२७८४८६ |
| ३ | कंपनीने LBT कर भरणा कमी केला आहे काय? | होय | |
| ४ | कमी LBT कर भरणा झाल्यास त्याची कारणे काय ? | १. कंपनीने स्थानिक संस्था कर नियम २८(४) नुसार प्रक्रिया करण्यात येत असलेल्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मालावरील स्थानिक संस्था कर आकारणीतुन सुट दयावी म्हणून दि. १०/१०/२०११ रोजी पत्र दिले. त्याचा उत्तरी कार्यालयाने पत्र क्र.मनपा/ स्थासंक /२९०/२०११ दि. २९/११/२०११ नुसार नियम २८(४) मधील प्रक्रियेत समावेश होत नसल्याने विनंती मान्य करता येत नाही म्हणून कळविले आहे. | |
| | | २.कंपनी भारता बाहेर माल निर्यात करणेच्या नावाखाली नियम २८(६)नुसार अशा आयात मालावरील स्थानिक संस्था कर आकारणीतून सुट दयावी म्हणून दि. १०/११/२०११ रोजी विनंती पत्र दिले . त्याचा उत्तरी कार्यालयाचे पत्र क्र.क्र. मनपा/ स्थासंक/५०/२०१२ दि. १२/०१/२०१२ नुसार कपंनी विविध प्रकारच्या बल्कड्रग्ज,रसायने व त्याला पुरक लागणारा कच्चा माल या पासून निर्मिती प्रक्रियेव्दारे तयार होणारी औषधी, विक्रीव्दारे निर्यात करीत असल्याने या नियमानुसार सुट देता येणार नसल्याचे कळविले असून देखील कंपनीने माहे ऑक्टोंबर २०११ पासून LBT कराचा कमी भरणा करीत आहे. | |
| | | ३. कार्यालयाने दिलेल्या दि. १२/०१/२०१२ च्या पत्रा विरुध्द | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कंपनीने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिटयाचिका क्र. १४८०/२०१२ दाखल केलेली आहे. प्रकरणात मा॰उच्च न्यायालयाने कंपनीचे दि. १०/११/२०११ रोजीच्या पत्रावर महानगरपालिकेने प्रथम संबंधिताचे म्हणणे आयकून घ्यावे व त्यानंतरच आसदेश पारीत करावे. मा. न्यायालय त्यानंतर प्रकरणात निर्णय येइल असे आदेश पारीत केल्याने प्रकरणात सुनावणीची प्रक्रिया सुरु केली आहे. | |
| | | ४. दि. १७/०१/२०१२ रोजी कंपनीने दाखल केलेले सहामाही विवरणपत्र निर्धारणासाठी घेवून व त्या संदर्भाने सुनावणी अंती स्थानिक कर + व्याज असे एकूण १.२१ कोटी भरणा करणे बाबतचे निर्धारण आदेश स्वाक्षरीस्तव सादर करण्यात आलेले असून कंपनीचे वार्षिक विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याचे देखील निर्धारणाचे काम हाती घेण्यात येवून योग्य ते निर्धारण आदेश पारित करण्यात येतील. | |

**प्रश्न क्र.११५ :**

शहरातील एकुण मोठे नाले किती ? पावसाळा एक ते दिड महीना असतांना महानगरपालिकेच्या माध्यमातुन नाले सफाई ,गाळ काढणे,कचरा काढणे ,गटार साफ करणेसाठी काही उपाय योजना करण्यात आलेल्या आहे काय? शहरातील एकुण मोठया गटारी बाबत काय नियोजन केले? या बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**वार्ड अभियंता (वार्ड फ)**

**उत्तर :**

| अ.क्र. | मुख्य नाल्याचे नाव क्षेत्र (Start to end AMC area) | नाल्याची एकुण लांबी मीटरमध्ये | नाल्याची सरासरी रुंदी मीटरमध्ये | उपाययोजना |
|---|---|---|---|---|
| १ | वार्ड क्र ८६ अंतर्गत प्रियदर्शनी ते स्मशानभुमीपर्यंतचा नाला | ६००.०० | ३.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| २ | भानुदास नगर महोदय मंदिरापासुन ते झांबड इस्टेट पर्यंत | १५००.०० | ३.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ३ | झांबड इस्टेट ते उस्मानपुरा पोलिस स्टेशन पर्यंत | १४००.०० | ६.५० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ४ | उस्मानपुरा पोलिस स्टेशन ते द्वारकापुरी रेल्वे पटरी पर्यंत | १७००.०० | ७.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ५ | द्वारकापुरी रेल्वे पटरी ते हमालवाडा पर्यंत | १५००.०० | ९.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ६ | दिशा संकुल जवाहर नगर पोलिस स्टेशन ते शहानुर मियाँ दर्गा रोड पर्यंत | १५००.०० | ३.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आले आहे. |
| ७ | तिरुपती विहार ते चाणक्यपुरी पर्यंत | १२००.०० | २.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ८ | शिवाजी नगर रेल्वे पटरी ते गादिया विहार ते एकता चौका पर्यंत | १५००.०० | २.५० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ९ | शहानुर मियाँ दर्गा ते प्रताप नगर स्मशानभुमी ते द्वारकापुरी पर्यंत | १०००.०० | ६.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १० | सिल्कमील कॉलनी हमालवाडा येथील नाला | १३००.०० | ७.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ११ | ईटखेडा गावालगत असलेला नाला | १३००.०० | ८.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १२ | सादत नगर येथील नाला | १५००.०० | ८.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १३ | रचनाकार कॉलनी ते चक्रपाणी कॉलनी ते बालभारती पर्यंतचा नाला | ५००.०० | २.५० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | तयार करण्यात आले आहे. |
| १४ | स्वातंत्र सैनिक सकुल ते कांचनवाडी पर्यंत | १२००.०० | ३.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १५ | काबरा नगर येथील गटार | ८००.०० | १.५० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १६ | म्हाडा रेल्वे स्टेशन रोड येथील नाला | ३००.०० | ३.०० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १७ | बदक चौक ते मोतीवाला नाली | ७००.०० | --- | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| १८ | एम.जी.एम. कॉलेज ते कैलासनगर हनुमान मंदीर | १५००.०० | ४.५० | मान्सुनपुर्व नालेसफाईचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| | एकुण (लांबी मीटरमध्ये) | २१०००.०० | | |

अपेक्षित खर्च ७५.०० लाख

**<u>कार्यकारी अभियंता (वार्ड इ व फ)</u>**

प्रभाग ई अंतर्गत ३ मध्यम रुदीचे नाले व ०१ नदी वाहते : सद्या सदर नाल्यातील व नदीतील गाळ काढण्याचे अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही चालु असुन प्रशासकीय मंजुरी व निविदा प्रक्रियेनंतर दि. १/०५/२०१२ पासुन काम सुरु करण्यात येईल व दि. ३१/०५/२०१२ पर्यत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

**<u>वार्ड अभियंता (क)</u>**

**<u>उत्तर</u>**

वार्ड (क) अंतर्गत एकुण दोन मोठे नाले व तीन संलग्नीत उप नाले व मुख्य गटारी असुन पावसाळया पुर्वी नाल्यातील नाले सफाई, गाळ काढणे, व काढलेला गाळ इतरत्र वाहने साठी या पावसाळया पुर्वीच्या उपाय योजना करणे साठी व नाला परिसरातील रहिवाश्याच्या घरात पावसाचे पाणी शिरु नये, म्हणुन उपाय योजना म्हणुन व नाल्याचा प्रवाह पावसाळयात सुरळीत राहणे साठी सर्व नाले सफाईचे अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर करण्यांत आलेले. असून निविदा व कार्यादेश झाल्यानंतर पावसाळया पुर्वी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

करिता प्रश्नाच्या उत्तर स. सभागृह नेता यांना कळविणे साठी सादर करण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र. ११६ :</u>**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील मागील दहा वर्षा पासुनची वसुली व सन २०११-१२ वसुली व झालेला खर्चा बाबत तपशील देण्यात यावा . सध्या स्थितीत सिध्दार्थ जलतरण तलावाची काय स्थिती आहे.

**<u>अतिरिक्त शहर अभियंता</u>**

**<u>उत्तर</u>**

१.सिध्दार्थ जलतरणीकेवर सन २०११-१२ मध्ये लेखा विभागाच्या माहिती प्रमाणे झालेला खर्च खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| अ) | आस्थापनेवर रक्कम | रु.२१.०५ लक्ष रुपये |
| ब) | विद्युत देयकासाठी अंदाजे रक्कम | रु.०६.०० लक्ष रुपये |
| क) | रासायणीक खर्च रक्कम | रु.०३.०० लक्ष रुपये |
| ड) | देखभाल दुरुस्तीसह रक्कम | रु.०१.०० लक्ष रुपये |
| | एकुण रक्कम | रु.३१.०५ लक्ष रुपये |

२. सद्यस्थितीत जलतरण तलावावर मोठया प्रमाणावर सभासद पोहण्यास येतात. दि. १७/०४/२०१२ अखेर २०४२ सभासदांची तरण तलावावर नोंद झालेली आहे. व येत्या महिन्याभरात २८०० पर्यत सभासद संख्या वाढण्याची शक्यता आहे. जलतरण तलाव सुरळीत सुरु असुन सन १९९४ नंतर या सन २०११-२०१२ मध्ये १८ वर्षानंतर रक्कम रु. ५३,५५,६२५/- सभासद शुल्क प्राप्त होऊन जलतरण तलावात प्रथमच नफ्यामध्ये अला आहे.

सिध्दार्थ जलतरण तलाव, महानगरपालिका औरंगाबाद
सभासदांकडून जमा झालेल्या रकमेचा एकत्रित वर्षनिहाय व मासिक गोषवारा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | सन | व्यवस्थापक | रक्कम (लाखामध्ये) |
|---|---|---|---|
| १. | १.०४.२००० ते ३१.०३.२०११ | रावसाहेब मालोदे | १३,६५,५२५ |
| २. | १.०४.२००२ ते ३१.०३.२००२ | -------//------- | १०,५०,००५ |
| ३. | १.०४.२००२ ते ३१.०३.२००३ | -------//------- | १६,५४,९१० |
| ४. | १.०४.२००३ ते ३१.०३.२००४ | -------//------- | ६,७४,६३० |
| ५. | १.०४.२००४ ते ३१.०३.२००५ | -------//------- | ९,१३,५६० |
| ६. | १.०४.२००५ ते ३१.०३.२००६ | -------//------- | १०,५०,३१५ |
| ७. | १.०४.२००६ ते ३१.०३.२००७ | -------//------- | १३,२६,१२५ |
| ८. | १.०४.२००७ ते ३१.०३.२००८ | -------//------- | १२,५५,०८० |
| ९ | १.०४.२००८ ते ३१.०३.२००९ | -------//------- | १२,८१,१५३ |
| १० | १.०४.२००९ ते ३१.०३.२०१० | एस.टी.पहाडिये | २१,४१,००५ |
| ११ | १.०४.२०१० ते ०१.०३.२०११ | अभय देशमुख | ३६,१७,३६५ |
| १२ | १.०४.२०११ ते ०१.०३.२०१२ | अभय देशमुख | ५३,५५,६२५ |
| १३. | १.०४.२०१२ ते १७.०४.२०१३ | अभय देशमुख | ७,४८,८४०<br>दि. १७.४.१२<br>अखेर |

| दि. १७.०४.२०१२ अखेर एकूण सभासदांची संख्या | | |
|---|---|---|
| १. | आजीव सभासद | २२२ |
| २. | वार्षिक सभासद | ४७७ |
| ३. | त्रिमासिक सभासद | २९२ |
| ४. | कौटूंबिक सभासद | ६८ |
| ५. | मासिक सभासद | ९८३ |
| | एकूण सभासद संख्या | २०४२ |

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद